


# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, बुधवार ५ ऑगस्ट २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०




# गुंगी गुडिया वरून काँग्रेस-राष्ट्रवादीत जुंपली

**मुंबई/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यावर काँग्रेसने गुंगी गुडिया अशी टीका केल्यामुळे दोन काँग्रेसमध्ये संघर्षाची ठिणगी पडली आहे. या टीकेमुळे संतापलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी प्रदेश प्रवक्ते सूरज चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी कुलाबा येथील काँग्रेसच्या गांधी भवन कार्यालयात घुसून जोरदार घोषणाबाजी केली. ठाण्यातही राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या प्रतिमेला काळे फासले. सपकाळ यांनी मात्र टीकेचे समर्थन करताना ही टीका मान्य नसेल तर आपण गुंगी गुडिया नाही हे त्यांनी सिद्ध करावे असे आव्हान दिले आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या बीड दौ-यातील एक व्हीडीओ काँग्रेसने सोशल मीडियावर शेअर केला होता. या व्हीडीओमध्ये पत्रकार परिषदेत उपमख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना पत्रकार प्रश्न विचारत असताना राष्ट्रवादीचे आमदार धनंजय मुंडे हे पत्रकारांना प्रश्न विचारण्यापासून रोखत असल्याचे दिसत आहे. यावरून सुनेत्रा पवार अजून किती दिवस गुंगी गुडिया बनून राहणार? असा सवाल काँग्रेसने उपस्थित करत त्यांना लक्ष्य केले होते. या पोस्टवर राष्ट्रवादी काँग्रेसने तीव्र आक्षेप घेत तो महिलांचा अवमान असल्याचा आरोप करत आक्रमक भूमिका घेतली. दरम्यान, मंगळवारी दुपारी २ वाजता गांधी भवनात काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची पत्रकार परिषद सुरू असतानाच सूरज चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादीचे कार्यकर्ते कार्यालयात घुसले. यावेळी राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी काँग्रेसविरोधात घोषणाबाजी करत सुनेत्रा पवार यांची जाहीर माफी मागण्याची मागणी केली. तसेच सपकाळ यांच्याकडे या पोस्टबाबत जाब विचारण्याचाही प्रयत्न केला. यावेळी दोन्ही पक्षांचे समर्थक आमने सामने आल्याने तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती.

**काँग्रेसची वैचारीक पातळी घसरली : सुरज चव्हाण**

महिलांना कमी लेखण्याची काँग्रेसची वृत्ती आहे का, याचे उत्तर त्यांनी द्यावे, असे आव्हान देत सुनेत्रा पवार यांच्या कामामुळे काँग्रेस अस्वस्थ झाली असून गुंगी गुडियासारखा अपमानास्पद शब्द वापरणे ही काँग्रेसच्या घसरलेल्या वैचारिक पातळीचे द्योतक आहे अशी टीका सुरज चव्हाण यांनी केली. काँग्रेसने सुनेत्रा पवार यांची माफी न मागितल्यास राज्यभरात राष्ट्रवादीचे कार्यकर्ते काँग्रेस कार्यालयात घुसून जाब विचारतील असा इशारा त्यांनी दिला.



**गुंगी गुडिया हा अपशब्द नाही : सपकाळ**

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यावर आकसापोटी टिका केलेली नसून गुंगी गुडीया हा शब्द अपशब्द नाही, शिवी नाही किंवा तो असंसदीय शब्द नाही, असा खुलासा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला. पंतप्रधान इंदिरा गांधी यांनाही गुंगी गुडिया असे संबोधले गेले होते, पण त्यांनी त्यांच्या कर्तृत्वातून आपले कणखर नेतृत्व सिद्ध केल्याने अटलबिहारी वाजपेयी यांनी त्यांना दुर्गा म्हटले. त्यामुळे सुनेत्रा पवार यांनीही आपल्या कर्तृत्वातून दुर्गा असल्याचे दाखवून द्यावे, असेही सपकाळ म्हणाले. एक गुंड प्रवृत्तीचा लोकप्रतिनिधी प्रश्न विचारणा-या पत्रकाराला गप्प बसवतो, अशावेळी उपमुख्यमंत्री एक शब्दही बोलत नाहीत व पत्रकारांचे प्रश्नही घेत नाहीत, अशावेळी हाताची घडी व तोंडावर बोट ठेवले, म्हणून गुंगी गुडिया हा शब्द वापरला आहे, असेही सपकाळ म्हणाले.

**काँग्रेसची संस्कृती बिघडली : देवेंद्र फडणवीस**

काँग्रेस खालच्या स्तरावर उतरली आहे. त्यांना कोणीच विचारत नसल्याने बातम्यांमध्ये येण्यासाठी अशापद्धतीने ते काम करीत आहेत. महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीत इतक्या खालच्या स्तरावर जाणारे हे आपल्याला पहिल्यांदाच पाहायला मिळत आहेत, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काँग्रेसवर टिका केली.

## दहशतवादी हल्ल्याचा कट उधळला

**चंदिगड :** पंजाबमध्ये दहशतवादी हल्ला घडवून आणण्याचा मोठा कट पंजाब पोलिसांनी उधळून लावला आहे. पाकिस्तानची गुप्तचर संघटना



आयएसआयच्या इशा-यावर काम करत असल्याच्या आरोपाखाली चार अल्पवयीन मुलांसह एकूण नउ जणांना अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी या कारवाईत तीन बेकायदेशीर पिस्तूल, ९ जिवंत काडतुसे आणि पेट्रोल ब?म्ब तयार करण्यासाठी वापरल्या जाणा-या पेट्रोलच्या चार बाटल्या जप्त केल्या आहेत. प्राथमिक तपासात असे समोर आले आहे की, हे सर्व संशयित परदेशातील आयएसआयच्या हँडलर्सच्या संपर्कात होते आणि त्यांच्याच मार्गदर्शनाखाली काम करत होते. या तरुणांना दहशतवादी कारवाया करण्यासाठी प्रशिक्षित केले जात असल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. तसेच पंजाबमधील सुरक्षा यंत्रणांवर पाळत ठेवणे, बेकायदेशीर शस्त्रे जमा करणे आणि राज्यातील कायदा व सुव्यवस्था बिघडवणे ही जबाबदारी या संशयितांवर सोपवण्यात आली होती. तपासादरम्यान आरोपींनी सुरक्षा यंत्रणांच्या हालचाली टिपण्यासाठी आणि संवेदनशील ठिकाणांवर नजर ठेवण्यासाठी रेल्वे रुळांच्या बाजूला सीसीटीव्ही कॅमेरे बसवल्याची धक्कादायक माहितीही समोर आली आहे.

## टर्ब्युलन्समुळे एअर इंडियाच्या विमानात गोंधळ


**नवी दिल्ली :** फुकेटहून दिल्लीकडे येणा-या एअर इंडियाच्या विमानाला सोमवारी



हवेत टर्ब्युलन्स सामना करावा लागला. यावेळी विमानातील किमान १२ प्रवासी किरकोळ जखमी झाले. विविध वृत्तांनुसार, टर्ब्युलन्सदरम्यान विमान सुमारे ३०० फूट खाली आले होते. एअर इंडियाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, दिल्लीत विमान एआय २३७९ सुरक्षितपणे उतरल्यावर प्रवासी आणि कर्मचारी सुखरूप विमानातून बाहेर पडले. तसेच जखमी झालेल्या प्रवाशांना उपचारासाठी विमानतळावरील वैद्यकीय केंद्रात नेण्यात आले. आमच्या प्रवाशांची आणि कर्मचा-यांची सुरक्षितता हे एअर इंडियाचे सर्वोच्च प्राधान्य आहे. या घटनेमुळे प्रभावित झालेल्या सर्वांना आम्ही आवश्यक ती सर्व मदत पुरवत आहोत आणि या प्रकरणाच्या चौकशीसाठी संबंधित यंत्रणांना पूर्ण सहकार्य करत आहोत असे एअर इंडियाच्या प्रवक्त्यांनी सांगितले.

## लगान-गजनी फेम अभिनेते प्रदीप रावत यांचे निधन

**मुंबई/प्रतिनिधी :** लगान आणि गजनीसह अनेक चित्रपटांमध्ये दिसलेले अभिनेते प्रदीप रावत यांचे वयाच्या ७४ व्या



वर्षी मंगळवारी निधन झाले. त्यांच्या निधनाची माहिती लगानमध्ये त्यांच्यासोबत काम केलेल्या अभिनेते यशपाल शर्मा यांनी इंस्टाग्रामावर श्रद्धांजली वाहताना शेअर केली. हिंदुस्तान टाइम्सच्या वृत्तानुसार, प्रदीप रावत यांचे व्यवस्थापक सिद्धार्थ तिवारी यांनी त्यांच्या निधनाची पुष्टी केली आहे. त्यांनी सांगितले की, अभिनेते कर्करोगाने ग्रस्त होते आणि हा आजार पुन्हा बळावला होता. गेल्या एका महिन्यापासून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू होते. प्रदीप रावत यांचा शेवटचा हिंदी चित्रपट 'छावा' होता, जो १४ फेब्रुवारी २०२५ रोजी प्रदर्शित झाला.

**महाभारतात अश्वत्थामाची भूमिका साकारली होती-**प्रदीप रावत यांनी त्यांच्या अभिनय कारकिर्दीची सुरुवात बी.आर. चोप्रा यांच्या महाभारत या टीव्ही मालिकेत अश्वत्थामाची भूमिका साकारून केली होती. त्यानंतर त्यांनी हिंदी, तेलुगु, तमिळ, कन्नड, मल्याळम, बंगाली आणि भोजपुरी चित्रपटांमध्ये काम केले. हिंदी चित्रपटसृष्टीत ते लगान, सरफरोश, गजनी, बैजू बावरा, आवारापन आणि ग्रँड मस्ती यांसारख्या चित्रपटांमध्ये दिसले. तर, तेलुगु चित्रपट सई (Sye) मधून त्यांनी दक्षिण भारतीय चित्रपटसृष्टीत पदार्पण केले आणि अनेक अविस्मरणीय खलनायकाच्या भूमिका साकारल्या.

# पद्मश्री डॉ.डी.वाय.पाटील यांचे निधन

**कोल्हापूर /प्रतिनिधी :** पद्मश्री डॉ. ज्ञानदेव यशवंतराव तथा डॉ. डी. वाय. पाटील यांचे मंगळवारी निधन झाले. ते ९० वर्षांचे होते. ते ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ, राजकारणी आणि बिहार, त्रिपुरा व पश्चिम बंगालचे माजी राज्यपाल होते. महाराष्ट्रामध्ये शिक्षणसम्राट ह्या उपाधीने ओळखल्या जाणा-या डी. वाय.पाटील ह्यांना १९९१ साली पद्मश्री हा पुरस्कार देण्यात आला होता. त्यांचा जन्म २२ ऑक्टोबर १९३५ रोजी कोल्हापूरमधील अंबप गावात झाला होता. कोल्हापूरच्या मातीतले रांगडे व्यक्तिमत्त्व होते. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे सदस्य असलेले डी.वाय. पाटील १९५७ ते १९६२ दरम्यान कोल्हापूर शहराचे महापौर होते. १९६७ व १९७२ साली ते पन्हाळा विधानसभा



मतदारसंघामधून विधानसभेवर निवडून आले होते. सर्वसामान्य कार्यकर्त्यांपासून सुरु केलेली राजकीय कारकीर्द पुढे अनेक मोठमोठ्या पदांपर्यंत घेउन गेली. कार्यकर्ता, महापौर ते अगदी राज्याचे राज्यपाल, असा विस्मयचकित करणारा प्रवास डॉ. डी. वाय पाटील यांचा आहे.

भाजपप्रणित एनडीए सरकार केंद्रात सत्तेत आल्यानंतर अनेक राज्यातील राज्यपालांची उचलबांगडी करण्यात आली. त्यांच्या ठिकाणी नवे राज्यपाल नियुक्त करण्यात आले. मात्र, राजकारणाच्या पलिकडचे व्यक्तिमत्त्व असलेल्या डॉ. डी. वाय. पाटील यांचे राज्यपालपद कायम ठेवण्यात आले होते. तेव्हा डॉ. डी. वाय. पाटील हे बिहारचे राज्यपाल होते. देश-विदेशात शिक्षण आणि वैद्यकीय संस्था, तसेच नवी मुंबईतील खेळाचे भव्य मैदान असो, ज्या क्षेत्रात पाउल ठेवले. तिथे ठोस कामगिरी करत आपल्या नावाचं ब्रँड तयार केले. डी.वाय. पाटील ह्यांच्या नावाच्या अनेक संस्था महाराष्ट्रात आहेत. ➪(पान २ वर)

# रामाच्या नावाने चोरी करणा-यांनी देशाची माफी मागावी-विरोधी पक्षनेते

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** राम मंदिर देणगी घोटाळा आणि विद्यार्थ्यांवर झालेल्या अमानुष लाठीचार्जवर संसदेच्या दोन्ही सदनामध्ये चर्चेची मागणी विरोधकांनी लावून धरली आहे. अधिवेशनाच्या तिस-या आठवड्यातही याचे पडसाद उमटत असून राज्यसभेचे विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी मंगळवारी हा मुद्दा राज्यसभेत उपस्थित केला.

प्रभू श्रीरामाच्या नावाने चोरी करणा-यांनी संपूर्ण देशाची माफी मागावी आणि देशाची दिशाभूल करणे थांबवावे अशी मागणी मल्लिकार्जुन खरगे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नाव घेत केली. यावेळी विरोधकांनी जोरदार




घोषणाबाजी करत राज्यसभा दणाणून सोडली. यामुळे राज्यसभेचे कामकाज २ वाजेपर्यंत तहकूबही करण्यात आले. श्री राम जन्मभूमी ➪(पान २ वर)

# 7 वर्ष, 36 देश अन् 274 पसार गुन्हेगारांना भारतात आणले

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**परदेशात पळून जाउन लपलेल्या पळपुट्या गुन्हेगारांवर कारवाई करण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारने आखलेल्या धोरणाला मोठे यश आल्याचे समोर आले आहे. २०१९ पासून आतापर्यंत तब्बल ३६ देशांमधून तब्बल २७४ गुन्हेगारांना भारतात परत आणण्यात आले असल्याची माहिती केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी दिली आहे. यूपीए सरकारच्या काळात ही संख्या दरवर्षी केवळ चार एढी होती, असा टोलाही त्यांनी लगावला.



■ आतापर्यंत 17874 कोटींची संपत्ती जप्त

■ अमित शाह यांचा दावा

यासंदर्भात गृहमंत्री अमित शाह यांनी सोशल मीडिया प्लॅटफार्म 'एक्स'वर पोस्ट करत सांगितले की, 'गुन्हेगार व्यवस्थेतील त्रुटींचा फायदा घेउन पळून जाण्याचे दिवस आता संपले आहेत. नव्या भारताने नवीन कायदे, संस्था आणि जागतिक भागीदारीच्या माध्यमातून जुन्या व्यवस्थेतील प्रत्येक उणीव दूर केली आहे. तसेच एक मजबूत सुरक्षा कवच तयार केले आहे, जे भेदले जाउ शकत नाही.'

एका दुस-या पोस्टमध्ये शाह म्हणाले, 'मोदी सरकारच्या नेतृत्वाखाली, परदेशात लपलेल्या फरारी गुन्हेगारांना पकडण्यासाठी एक एकात्मिक, गुप्तचर माहितीवर आधारित आणि तंत्रज्ञानावर चालणारी मोहीम सुरू करण्यात आली आहे.' या तीन नवीन कायद्यांमधील अनुपस्थितीत खटला चालवण्याच्या तरतुदीमुळे, न्यायव्यवस्थेला फरार गुन्हेगारांविरुद्ध कारवाई सुरू करण्याचे अधिकार मिळाले आहेत. PMLA च्या कठोर तरतुदींमुळे १७८७४ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली असून १८७६२ कोटी रुपयांची वसुली करण्यात आली आहे. याशिवाय, 'भारतपोल' (BHARATPOL) सारख्या क्रांतिकारी यंत्रणेमुळे भारतातील तपास संस्था जागतिक पातळीवरील 'इंटरपोल'च्या नेटवर्कशी थेट जोडल्या गेल्या आहेत. यामुळे माहितीची देवाणघेवाण गतिमान होउन जगात कुठेही लपलेल्या गुन्हेगारांला पकडणे सोपे झाले आहे.

# तुमच्याकडे सत्ता असताना 30 वर्षांच्या तरूणाची धास्ती का?

## शिरसाटांच्या भेटीवरून अभिजित दीपकेंचा भाजपला टोला

**छ. संभाजीनगर /प्रतिनिधी-** सीजेपी पक्षाचे संस्थापक आणि विद्यार्थी आंदोलनाचा चेहरा बनलेले अभिजित दीपके यांनी सध्याच्या राजकीय घडामोडींवर आणि त्यांच्यावर होत असलेल्या आरोपांवर सविस्तर भाष्य केले आहे. शिवसेनेचे नेते संजय शिरसाट यांच्यासोबत झालेल्या भेटीवरून निर्माण झालेल्या राजकारणावर त्यांनी प्रत्युत्तर दिले आहे. संजय शिरसाट यांच्यासोबत झालेल्या भेटीबाबत बोलताना अभिजित दीपके म्हणाले,



एका ३० वर्षांच्या मुलापासून तुम्हाला एवढी भीती वाटते, यावर मी काय बोलू? संजय शिरसाट हे मला फक्त वैयक्तिक पातळीवर भेटायला आले होते आणि शुभेच्छा देण्यासाठी आले होते. यापलीकडे दुसरे काहीही नाही. आमचे कोणतेही राजकीय बोलणे झाले नाही. तुम्ही युवकांचा आणि देशाचा चांगला मुद्दा उचलला, असे म्हणून त्यांनी मला शुभेच्छा दिल्या.

याच मुद्यावरून भाजपला लक्ष्य करत दीपके म्हणाले, मी भाजपाला सांगू इच्छितो की, ➪(पान २ वर)

## SIR मोहिमेला 17 ऑगस्टपर्यंत मुदतवाढ

**मुंबई/प्रतिनिधी :**महाराष्ट्रातील मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेचे वेळापत्रक भारत निवडणूक आयोगाने पुन्हा एकदा बदलले आहे. बीएलओद्वारे घरोघरी जाउन केल्या जाणा-या मतदार पडताळणीची मुदत आणखी ९ दिवसांनी वाढवून १७ ऑगस्टपर्यंत करण्यात आली आहे. या नव्या बदलामुळे आता राज्यातील अंतिम मतदार यादीची प्रसिद्धी १९ ऑक्टोबरऐवजी २७ ऑक्टोबर २०२६ रोजी केली जाणार आहे. मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने मंगळवारी केलेल्या विनंतीनंतर निवडणूक आयोगाने हा निर्णय घेतला आहे. बूथ लेव्हल अधिका-यांमार्फत घरोघरी जाउन केली जाणारी मतदार पडताळणी आता १७ ऑगस्ट पर्यंत चालणार ➪(पान २ वर)

## अमेरिकेची सगळी मिसाइल्स संपली

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**इराणविरुद्ध गेल्या पाच महिन्यांपासून सुरू असलेल्या भीषण लष्करी संघर्षात अमेरिकेच्या सैन्याने आपल्या ताकदीचा मोठ्या प्रमाणावर वापर केला आहे. मात्र, या युद्धाचाअमेरिका आणि पेंटागानला मोठा फटका बसला असून, अमेरिकन सैन्याकडील लांब पल्ल्याच्या आणि अचूक मारा करणा-या क्षेपणास्त्रांचा मोठा साठा जवळजवळ संपुष्टात आला आहे. या तुटवड्यामुळे भविष्यातील लष्करी आव्हानांचा सामना करण्याच्या अमेरिकेच्या क्षमतेवर आणि युद्धसज्जतेवर गंभीर प्रश्नचिन्ह ➪(पान २ वर)

# आदित्य ठाकरेंच्या अडचणीत वाढ

**मुंबई/प्रतिनिधी :**दिशा सालियानच्या मृत्यूबाबत वडिलांनी संशय व्यक्त केला होता, तर पोलिसांनी एफआयआर का नोंदवला नाही? अपघाती मृत्यूचे प्रकरण का दाखल केले? कोणत्या बाबींमुळे पोलिसांना या प्रकरणाचा तपास करण्यापासून रोखण्यात आले? असा प्रश्न मुंबई उच्च न्यायालयाने सोमवारी मुंबई पोलिसांसमोर उपस्थित केला.

अभिनेता सुशांतसिंह राजपूत याची मॅनेजर असलेल्या दिशाचा ८ जून २०२० रोजी मालाड येथील एका निवासी इमारतीच्या १४ व्या मजल्यावरून पडून मृत्यू झाला होता. चौकशीअंती दिशाने जीव दिल्याचा निष्कर्ष काढला होता. मात्र, दिशाचे वडील सतीश सालियन यांनी गेल्या वर्षी याचिका करून आपल्या मुलीवर सामूहिक अत्याचार करण्यात आला आणि नंतर तिची हत्या करण्यात आली, असा आरोप केला आहे. या प्रकरणात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते आणि माजी मंत्री आदित्य ठाकरे यांच्याविरोधात एफआयआर नोंदवून सीबीआय तपासाचा आदेश देण्याची विनंतीही सालियन यांनी ॲड. निलेश ओझा यांच्यामार्फत केली आहे.



याविषयी न्या. भारती डांगरे व न्या. मंजुषा देशपांडे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. मुख्य सरकारी वकील शिशिर हिरे यांनी बाजू मांडली. शिशिर हिरे यांनी न्यायालयाला सांगितले की, या प्रकरणाची नोंद अपघाती मृत्यू अशी करण्यात आली होती आणि दोनदा चौकशी करण्यात आली; दोन्ही वेळा तिने जीव दिल्याचेच निष्पन्न झाले. या प्रकरणातील साक्षीदारांनी दिलेल्या जबाबांवरूनही या निष्कर्षाला दुजोरा मिळाला, असे ते म्हणाले.

**फोटोनुसार दिशाच्या डोक्याला दुखापत-** न्यायालयाच्या खंडपीठाने असाही प्रश्न उपस्थित केला की, शवविच्छेदन अहवालानुसार, इतक्या उंचावरून पडूनही संबंधित व्यक्तीच्या ➪(पान २ वर)

## नक्षल सप्ताहाच्या पार्श्वभूमीवर गडचिरोली पोलिसांची मोठी कारवाई

# जंगलात पुरून ठेवलेली 14 अग्निशस्त्रे, स्फोटके जप्त

**गडचिरोली /प्रतिनिधी :** नक्षल सप्ताहाच्या पार्श्वभूमीवर सुरक्षा दलांवर घातपात घडवून आणण्याच्या उद्देशाने जंगलात जमिनीत पुरून ठेवलेला






शस्त्रसाठा आणि स्फोटक साहित्य गडचिरोली पोलीस व केंद्रीय राखीव पोलीस दलाने (सीआरपीएफ) संयुक्त कारवाईत जप्त केला. महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेवरील कुमनार जंगल परिसरात झालेल्या या कारवाईत एकूण १४ अग्निशस्त्रे, आयईडीसह स्फोटक साहित्य आणि अन्य साहित्य हस्तगत करण्यात आले. विशेष म्हणजे, नव्याने स्थापन करण्यात आलेल्या बंगाडी पोलीस मदत केंद्राच्या हद्दीतील ही महत्त्वपूर्ण कारवाई मानली जात आहे. गडचिरोली जिल्ह्यात नक्षलविरोधी मोहिमेला सातत्याने यश मिळत असून, नक्षलवादी संघटना कमकुवत झाल्यानंतरही जंगलात लपवून ठेवलेल्या शस्त्रसाठ्याचा शोध घेण्याची मोहीम सुरू आहे. यापूर्वी २३ मे, २७ मे आणि २७ जून रोजी अशाच स्वरूपाच्या कारवाया करण्यात आल्या होत्या. त्यानंतर १ ऑगस्ट रोजीही पोलीस आणि सीआरपीएफने आणखी एक यशस्वी कारवाई करत मोठा शस्त्रसाठा जप्त केला.

गोपनीय माहितीच्या आधारे महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेलगतच्या कुमनार जंगल परिसरात नक्षलवाद्यांनी मोठ्या प्रमाणावर शस्त्रे आणि स्फोटके पुरून ठेवल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार ३१ जुलै रोजी पोलिस अधीक्षक एम. रमेश यांच्या मार्गदर्शनाखाली प्राणहिता विशेष अभियान पथकाच्या चार तुकड्या, बाम्ब शोधक व नाशक पथक (बीडीडीएस) आणि सीआरपीएफचे जवान शोधमोहिमेसाठी रवाना झाले.

**मोठा शस्त्रसाठा जप्त-**१ ऑगस्ट रोजी जंगल परिसराची कसून तपासणी करण्यात आली. या वेळी जमिनीत लपवून ठेवलेली एक एसएलआर रायफल, एक .३०३ रायफल, सात १२-बोअर रायफल, तीन सिंगल शाट रायफल, दोन बीजीएल लाँचर्स, तीन एसएलआर मॅगझिन, एक आयईडी आणि दोन बॅट-या असा मोठा शस्त्रसाठा जप्त करण्यात आला. सर्व साहित्य पंचनामा करून ताब्यात घेण्यात आले.

**पोलीस अधीक्षकांनी केले कौतुक-** ही कारवाई पोलीस अधीक्षक एम. रमेश यांच्या मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधीक्षक (अभियान) कार्तिक मधिरा, अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन) गोकुल राज जी., अपर पोलीस अधीक्षक, अहेरी (प्राणहिता) हर्षवर्धन बी. जे., पोलीस उपअधीक्षक (अभियान) सुनील उईके यांच्या देखरेखीखाली विशेष अभियान पथक, गुप्तवार्ता शाखा, बीडीडीएस आणि सीआरपीएफच्या जवानांनी संयुक्तपणे पार पाडली. या कारवाईतील जवानांचे पोलीस अधीक्षकांनी कौतुक केले आहे.



# मुख्यमंत्री सहाय्यता निधीमुळे शक्य झाले यकृत प्रत्यारोपण

## पत्नीच्या यकृतदानातून पतीला मिळाले नवजीवन

**मुंबई :** आर्थिक परिस्थिती प्रतिकूल असल्यामुळे यकृत प्रत्यारोपणाचा खर्च उचलणे अशक्य झाले होते. उपचारासाठी तब्बल २५ ते ३० लाख रुपयांची आवश्यकता असताना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी आणि टाटा ट्रस्टच्या आर्थिक मदतीमुळे अकोला येथील प्रशांत इंगळे (वय ४७) यांच्यावर मुंबईतील नानावटी रुग्णालयात यशस्वी यकृत प्रत्यारोपण करण्यात आले. या प्रत्यारोपण शस्त्रक्रियेत त्यांच्या पत्नी वर्षा इंगळे यांनी स्वतःच्या यकृताचा काही भाग दान करून पतीला नवजीवन दिले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून प्रशांत इंगळे यांच्यासाठी २ लाख रुपयांची मदत मंजूर करण्यात आली. तसेच मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे टाटा ट्रस्टकडून १९ लाख ६० हजार रुपयांची आर्थिक मदतही उपलब्ध झाली. त्यामुळे एकूण २१ लाख ६० हजार रुपयांचा निधी उभारला गेला आणि अत्यंत खार्चिक असलेले यकृत प्रत्यारोपण शक्य झाले.

प्रशांत इंगळे हे अकोला येथे केबल टाकण्याचे काम करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. त्यांच्या कुटुंबात वृद्ध आई-वडील, पत्नी, महाविद्यालयीन शिक्षण घेणारी मुलगी आणि दहावीत शिकणारा मुलगा आहे. सप्टेंबर-ऑक्टोबर २०२५ दरम्यान त्यांना पोटदुखीचा त्रास सुरू झाला. अकोला आणि नागपूर येथे झालेल्या वैद्यकीय तपासण्यांनंतर त्यांचे यकृत गंभीररीत्या निकामी होत असल्याचे निदान झाले. डॉक्टरांनी तातडीने यकृत प्रत्यारोपणाचा सल्ला दिला. मात्र, लाखो रुपयांचा उपचार खर्च कुटुंबाच्या आर्थिक क्षमतेबाहेर होता.

अशा कठीण परिस्थितीत पत्नी वर्षा इंगळे यांनी कुटुंबीयांसह अकोल्याच्या आमदारांची भेट घेतली. त्यांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीबाबत माहिती देत मुंबईत उपचारासाठी जाण्याचा सल्ला दिला. त्यानंतर इंगळे कुटुंबीयांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांची भेट घेतली. नाईक यांनी प्रकरणाची तातडीने दखल घेत आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी तसेच टाटा ट्रस्टकडून आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी प्रभावी पाठपुरावा केला.

या आर्थिक सहाय्यामुळे २५ जून २०२६ रोजी मुंबईतील नानावटी रुग्णालयात यशस्वी यकृत प्रत्यारोपण करण्यात आले. शस्त्रक्रियेनंतर प्रकृतीत समाधानकारक सुधारणा झाल्याने १३ जुलै २०२६ रोजी प्रशांत इंगळे यांना रुग्णालयातून घरी सोडण्यात आले. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असून ते हळूहळू पूर्णपणे बरे होत आहेत.

वेळेवर मिळालेल्या आर्थिक मदतीमुळे आपल्याला नवजीवन मिळाल्याची भावना व्यक्त करत इंगळे कुटुंबीयांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक तसेच टाटा ट्रस्ट यांचे मनःपूर्वक आभार मानले.

> मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून आर्थिक अडचणींमुळे कोणत्याही गरजू रुग्णाचा उपचार पैशांअभावी थांबू नये, या उद्देशाने मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष सातत्याने कार्यरत आहे. त्याच भावनेतून प्रशांत इंगळे यांना वेळेत आवश्यक आर्थिक मदत उपलब्ध करून देता आली, याचा आम्हाला आनंद आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीबाबत अधिक माहितीसाठी नागरिकांनी १८०० १२३ २२११ या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.
>
> **-रामेश्वर नाईक,** कक्ष प्रमुख, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष

## १ व १० वरिल उर्वरित

### पद्मश्री डॉ.डी.वाय.पाटील

त्यामध्ये पद्मश्री डी.वाय. पाटील विद्यापीठ, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई, डॉ. डी.वाय. पाटील विद्यापीठ, पुणे, डॉ. डी.वाय. पाटील विद्यापीठ, कोल्हापूर, डॉ. डी.वाय. पाटील विद्यापीठ, पुणे, आंबी या विद्यापीठांचा समावेश आहे. शेकडो शिक्षण संस्थांचेव्यापक नेटवर्क असलेला व गुणवत्तेमुळेराज्यातच नव्हे, तर देशभरात ओळखला जाणारा डी. वाय. पाटील ग्रुप शैक्षणिक वटवृक्ष बनला आहे. ग्रुपच्या विविध संस्थांमधून शिक्षण घेउन बाहेर पडलेलेलाखो विद्यार्थी आज देश-विदेशांत उच्चपदावर कार्यरत आहेत. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याला आकार देतानाच परंपरा जतन करून सुजाण नागरिक बनवण्यासाठी ग्रुपतर्फे नेहमीच प्रयत्न केला जातो

### रामाच्या नावाने चोरी

तीर्थ क्षेत्र ट्रस्टमध्ये मौल्यवान भेटवस्तू, रोख दान, जमीन खरेदी आणि व्यवस्थापनाबाबत गंभीर आरोप समोर आले आहेत. हा कोट्यवधी भाविकांच्या श्रद्धेचा आणि आस्थेचा विषय आहे. या ट्रस्टची स्थापना केंद्र सरकारने केली असून त्याची घोषणा खुद्द पंतप्रधान मोदी यांनी संसदेत केली होती. केंद्र सरकारने ७० एकराहून अधिक जमीन या ट्रस्टकडे सोपवली आहे आणि पंतप्रधान मोदी भूमिपूजनापासून ते प्राणप्रतिष्ठेपर्यंतच्या प्रत्येक महत्त्वाच्या प्रसंगात सहभागी राहिले आहेत असे खरगे राज्यसभेत म्हणाले.

**शाह, मोदी पळ काढतायेत-** दानातील चोरीसह इतर गंभीर आरोपांबाबत पंतप्रधान स्वतःच्या उत्तरदायित्वापासून पळ काढू शकत नाहीत. ईडी, सीबीआय, आयकर विभागासह इतर तपास यंत्रणा नेमक्या कुठे आहेत, याचे स्पष्टीकरण त्यांनी संसदेत दिले पाहिजे. प्रभू रामाच्या नावावर लूट करणा-यांनी संपूर्ण देशाची माफी मागितली पाहिजे आणि देशवासीयांची दिशाभूल करण्याचे काम त्वरित बंद झाले पाहिजे, अशी मागणीही खरगे यांनी केली.

### तुमच्याकडे सत्ता असताना

एवढी घाबरण्याची गरज नाही. ईडी, सीबीआय सगळं काही तुमच्याकडेच आहे, आमच्याकडे काहीच नाही. आम्हाला लोकं केवळ वैयक्तिकरीत्या भेटायला येतात आणि चांगल्या कामासाठी शुभेच्छा देतात.

अतुल लिमये यांनी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला देशद्रोही आणि संविधानविरोधी म्हटल्याच्या प्रश्नावर अभिजित दीपके यांनी प्रत्युत्तर दिले. ते म्हणाले, ज्या लोकांनी आयुष्यभर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना विरोध केला, त्या लोकांनी आम्हाला संविधानावर लेक्चर देउ नये.

नुकतीच दिल्लीत दीपकेंविरोधात एक तक्रार दाखल करण्यात आली आहे. यावर प्रतिक्रिया देताना ते म्हणाले की, हे सर्व फक्त पब्लिसिटी मिळवण्यासाठी केले जात आहे, बाकी यात काहीही तथ्य नाही. तसेच, ई-२० च्या मुद्यावर आम आदमी पक्षाचे जे आंदोलन सुरू आहे, त्यासह सर्व लोकशाहीवादी आंदोलनांना आपला पाठिंबा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

तरुणांशी बोलण्यासाठी तरुण चेहरेच हवेत

राजकारणातील युवा वर्गाच्या सहभागावर दीपके यांनी आग्रही भूमिका मांडली. मला असे वाटते की, तरुण लोकांनी तरुणांशी बोलले तर ते अधिक चांगले होईल. जोपर्यंत तुम्ही युवा आणि शिकलेले चेहरे पुढे आणणार नाही, तोपर्यंत काही अर्थ नाही, असे ते म्हणाले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जेन झी सोबत संवाद साधणार असल्याच्या चर्चेवर ते म्हणाले की, जर मोहन भागवत संवाद साधणार असतील तर ती चांगलीच गोष्ट आहे, पण त्यासाठी त्यांनीही नवीन चेहरे पुढे आणले पाहिजेत.

### SIR मोहिमेला १७ ऑगस्टपर्यंत

आहे. त्यानंतर २४ ऑगस्ट रोजी ड्राफ्ट मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल. या यादीवर नागरिकांना आपल्या हरकती २४ ऑगस्ट ते २३ सप्टेंबर या कालावधीत नोंदवता येतील. या हरकतींवर सुनावणी घेउन त्या सोडवणे आणि नोटीस देण्याची प्रक्रिया २२ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण केली जाईल. तर अखेर २७ ऑक्टोबर रोजी राज्याची अंतिम सुधारित मतदार यादी अधिकृतपणे प्रसिद्ध केली जाणार आहे.

निवडणूक आयोगाने महाराष्ट्राच्या मुख्य निवडणूक अधिका-यांना या नव्या वेळापत्रकाबाबत संबंधित सर्व अधिका-यांना तात्काळ माहिती देण्याचे, माध्यमांतून प्रसिद्धी करण्याचे आणि राजकीय पक्षांना पत्राद्वारे कळवण्याचे निर्देश दिले आहेत.

महिन्याभरात दुसरी मुदतवाढ

एसआयआरसाठी निवडणूक आयोगाने दिलेली ही दुसरी मुदतवाढ आहे. यापूर्वी १७ जुलै रोजी राज्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे मुख्य निवडणूक अधिका-यांनी मुदत वाढवून मागितली होती. त्यावेळी मुदत २९ जुलैवरून ८ ऑगस्टपर्यंत वाढवण्यात आली होती. मात्र, आता यात पुन्हा सुधारणा करण्यात आली आहे.

मुंबईत १० हजार बीएलओंवर जबाबदारी

मुंबई शहर आणि उपनगर या दोन्ही जिल्ह्यांमध्ये मिळून सुमारे १०,००० बीएलओ काम करत आहेत. प्रत्येक बीएलओकडे ९०० ते १,२०० मतदारांच्या पडताळणीची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. बीएलओंना मतदारांपर्यंत त्यांचे अर्ज पोहोचवणे, माहिती तपास, मतदारांच्या स्वाक्ष-या घेणे आणि ही सर्व माहिती डिजिटल प्लॅटफ?र्मवर अपलोड करण्याचे काम करावे लागत आहे. बीएलओने किमान तीन वेळा त्याच्या घरी भेट देणे बंधनकारक करण्यात आले आहे. निवडणूक आयोगाच्या या निर्णयामुळे प्रशासकीय कर्मचा-यांवरील ताण कमी होण्यास मदत होणार आहे.

### अमेरिकेची सगळी मिसाइल्स

निर्माण झाले आहे.अमेरिकन सैन्याकडे जमीनवरून जमिनीवर मारा करणा-या 'आर्मी टॅक्टिकल क्षेपणास्त्र प्रणाली' आणि अत्यंत प्रगत अशा 'प्रिसिजन स्ट्राइक मिसाइल'चा मोठा साठा होता. या क्षेपणास्त्रांची किंमत प्रति नग १ दशलक्ष डालरपेक्षा जास्त आहे. सुरक्षित अंतरावरून शत्रूच्या तळांवर अचूक निशाणा साधण्यासाठी ही शस्त्रे अत्यंत महत्त्वाची मानली जातात. युक्रेन युद्धातही या क्षेपणास्त्रांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती; परंतु इराण युद्धातील सततच्या वापरामुळे पँटाग?नकडील हा साठा आता जवळपास रिकामा झाला आहे. फेब्रुवारीच्या शेवटी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इस्त्रायलच्या साथीने इराणविरोधात लष्करी मोहीम सुरू केली होती. हे युद्ध अल्पावधीत संपेल असा दोन्ही देशांचा अंदाज होता; परंतु संघर्ष लांबल्यामुळे अमेरिकेची संसाधने वेगाने संपली. अचूक क्षेपणास्त्रांची कमतरता निर्माण झाल्यामुळे, ट्रम्प प्रशासनाने इराणवर पुन्हा मोठे हल्ले करण्याचे ठरवल्यास त्यांना फायटर जेट्स आणि बाम्बर्स विमानांसारख्या अधिक जोखमीच्या पर्यायांवर अवलंबून राहावे लागेल. यामुळे अमेरिकन वैमानिकांचा जीव धोक्यात येण्याची शक्यता वाढली आहे. याशिवाय क्षेपणास्त्रांच्या कमतरतेमुळे चीन आणि रशियासारख्या जागतिक प्रतिस्पर्ध्यांना रोखण्याच्या अमेरिकेच्या लष्करी क्षमतेवरही विपरीत परिणाम होण्याची भीती संरक्षण तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

### आदित्य ठाकरेंच्या अडचणीत

शरीरावर कोणतीही दुखापत का आढळली नाही. जर एखादी व्यक्ती १४ मजल्यांच्या उंचीवरून खाली पडली, तर तिच्या शरीरावर काहीच जखमा होणार नाहीत का? असा प्रश्न न्यायमूर्ती डांगरे यांनी विचारला. त्यावर हिरे यांनी सांगितले की, छायाचित्रांनुसार संबंधित व्यक्तीच्या डोक्याला दुखापत झाली होती. पुढील सुनावणी २४ ऑगस्टला आहे.

### मुथूट फिनकॉर्प शाखेत कोट्यवधीचा

माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. ग्राहकांच्या तक्रारी नोंदवून प्राथमिक चौकशी सुरू करण्यात आली आहे. कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही या प्रकाराची माहिती देण्यात आली असून, व्यवस्थापकाचा शोध घेण्यासाठी पोलीस आणि कंपनी प्रशासनाकडून हालचाली सुरू आहेत.

या प्रकरणात नेमकी किती रक्कम आणि किती प्रमाणात सोने गायब झाले आहे, याचा अधिकृत आकडा अद्याप जाहीर करण्यात आलेला नाही. मात्र, कोट्यवधी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याची चर्चा सुरू असून, तपासानंतरच संपूर्ण चित्र स्पष्ट होणार आहे.

दरम्यान, आपल्या गहाण ठेवलेल्या सोन्याचे आणि गुंतवलेल्या पैशांचे काय होणार, या चिंतेने ग्राहक हवालदिल झाले असून दोषींवर कठोर कारवाई करून नुकसानभरपाई मिळावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. पोलिसांनी चौकशी सुरू केली असून नेमके किती जणांची फसवणूक झाली किंवा नेमके काय झाले आहे याबाबत चौकशी सुरू असल्याची माहिती सहायक पोलीस आयुक्त संजय खताळे यांनी दिली.

### मायेचे अनोखे दानः सासूच्या

नेफरोलॉजिस्ट डॉ. हितेश गुल्हाने, युरो सर्जन डॉ. राहुल पोटोडे, डॉ. विक्रम देशमुख यांच्यासह भूलशास्त्रज्ञ, परिचारिका आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या चमूने या शस्त्रक्रियेसाठी विशेष परिश्रम घेतले.

'सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये दुसऱ्यांदा किडनी प्रत्यारोपणाची अत्यंत गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वी झाली आहे. अशा जटिल उपचारांसाठी आता मुंबई किंवा नागपूरला जाण्याची गरज नसून अमरावतीतच अत्याधुनिक सुविधा मोफत उपलब्ध आहेत.'

**-डॉ. हितेश गुल्हाने (नेफरोलॉजिस्ट)**

### लोतवाडा येथे कौशल्य विकासाच्या

उपायुक्त दत्तात्रय लक्ष्मण ठाकरे यांनी डिसेंबर २५ मध्ये प्रशिक्षण केंद्राची प्रत्यक्ष पाहणी केली. पाहणीदरम्यान प्रशिक्षणार्थी किंवा प्रशिक्षक कोणीही उपस्थित नसल्याचे निदर्शनास आल्याने अधिक सखोल चौकशीचे आदेश देण्यात आले. त्यानुसार हा तपास यवतमाळ येथिल उपायुक्तांकडे सोपविण्यात आला. त्यांच्या चौकशीतही प्रत्यक्ष प्रशिक्षण सुरू नसल्याचे समोर आले .

चौकशी अहवालात प्रशिक्षण न देता शासनाच्या निधीची उचल करण्यात आल्याचा तसेच कौशल्य प्रशिक्षणाच्या आशेवर असलेल्या सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींची फसवणूक झाली. त्यामुळे शासनाच्या रोजगाराभिमुख योजनांच्या विश्वासार्हतेवरही परिणाम झाल्याची चर्चा आहे. विशेष म्हणजे, अशाच प्रकारचे कथित गैरव्यवहार इतर प्रशिक्षण केंद्रांमध्येही झाले असण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने संपूर्ण प्रकरणाची व्याप्ती वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

कौशल्य विकास योजना ही युवकांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या मुख्य प्रवाहात आणणारी महत्त्वाची योजना मानली जाते. मात्र, कागदोपत्री प्रशिक्षण दाखवून निधी उचलला जात असल्याने फसवणूक होत असून त्याचा सर्वाधिक फटका रोजगाराच्या प्रतिक्षेत असलेल्या युवकांना बसला. शासनाच्या कल्याणकारी योजनांवरील विश्वासही डळमळीत होऊ शकतो.

दरम्यान, उपायुक्त दत्तात्रय ठाकरे यांनी चौकशी अहवाल शासनाकडे सादर केल्यानंतर शासनाच्या आदेशानुसार येवदा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास येवदाचे ठाणेदार प्रफुल्ल गाडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून, या कथित गैरव्यवहारामागील संपूर्ण साखळी उघडकीस येण्याची शक्यता व्यक्त केल्या जात आहे.

### विश्वकर्मा योजनेच्या नावाने

तिच्यावर विश्वास बसला. फिर्यादीने विश्वास ठेवून वेळोवेळी फोन-पे द्वारे व रोख स्वरूपात एकूण ९ लाख १२ हजार रुपये आरोपीला दिले. एवढ्यावरच न थांबता फिर्यादीची मुलगी नर्सिंग कोर्स करत असल्याचे कळताच, तिला अचलपूर येथील सरकारी दवाखान्यात सुपरवायझर पदावर नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून ५ लाखांची मागणी केली. फिर्यादीने बचत गटातून कर्ज काढून त्यापैकी ३ लाख रुपये दि. २४ मे रोजी साक्षीदार समक्ष परतवाडा येथे आरोपीच्या घरी जाऊन रोख दिले.सुरक्षेचे कारण सांगून आरोपीने फिर्यादीचे सेंट्रल बँक अंजनगाव शाखेचे ४ आणि बँक ऑफ महाराष्ट्र अंजनगाव शाखेचे १० असे एकूण १४ सह्या केलेले कोरे चेक, बँक पासबुक आणि काही कोऱ्या फॉर्मवर सह्या घेऊन स्वतःच्या ताब्यात ठेवले. अनेक दिवस उलटूनही ना कर्ज मिळाले, ना नोकरी लागली आणि ना पैसे परत मिळाले. पैसे परत मागितले असता 'मला फोन करून त्रास देऊ नका, नाहीतर मी माझ्या जीवाचे बरेवाईट करून तुम्हाला खोट्या केसमध्ये फसवीन' अशी धमकी दिल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. फिर्यादीसह त्यांच्या सहकारी कविता प्रदीप अनोकार आणि स्नेहल आशिष काळपांडे, दोन्ही रा. निमखेड बाजार यांची देखील प्रत्येकी १,५६,००० रुपयांची फसवणूक झाल्याचे तक्रारीत नमूद आहे.फिर्यादीच्या तक्रार अर्जावरून दि. ०१ ऑगस्ट रोजी पोलीस ठाणे अंजनगाव सुर्जी येथे कलम ३१८(४), ३१६(२), ३५१(२) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात आरोपी महिला सारिका राऊत हिला दि. ०३ ऑगस्ट रोजी अटक करण्यात आली असून न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने तिला एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे. गुन्ह्याचा पुढील तपास ठाणेदार सूरज बोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनी विशाल पोळ व पोहेकॉ नितीन इंगळे हे करीत आहेत.दरम्यान,या फसवणुकीत आणखी किती महिला बळी पडल्या आहेत, याचा तपास पोलीस करत असून आणखी तक्रारी समोर येण्याची शक्यता आहे.

### घराच्या पाठीमागे लावलेली गांजाची

छापा टाकून झडती घेण्यात आली. झडतीदरम्यान घराच्या पाठीमागे लावलेली एकूण ५ गांजाची झाडे आढळून आली. सदर झाडे पंचनामा करून जप्त करण्यात आली. न्यायसहायक वैज्ञानिक पथकाने प्राथमिक तपासणीमध्ये जप्त झाडे गांजा असल्याचे निष्पन्न केले. या प्रकरणी आरोपीविरुद्ध NDPS Act कलम ८(ब), २०(अ)(i) अन्वये पोलीस स्टेशन मोर्शी येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक, निकेतन कदम, अप्पर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड व उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक राहुल आठवले यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक तुषार चव्हाण, पोलीस अंमलदार छत्रपती करपते, स्वप्नील बायस्कर ,अथर्व कोहळे इतर पोलीस कर्मचारी व तपास पथक राजपत्रित अधिकारी न्यायसहायक वैज्ञानिक पथक यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

### मनपा आयुक्तांच्या नावाने

आल्यास त्वरित सायबर गुन्हे शाखेकडे तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

अशा फसवणुकीच्या जाळ्यात अडकू नये, संशयास्पद संदेशांची खातरजमा करावी आणि नागरिकांनी अधिक सतर्क राहावे, असे आवाहन अमरावती महानगरपालिका आयुक्त डॉ.मंगेश गोंदावले यांनी केले आहे.

### घरफोडीच्या गुन्ह्यातील फरार

आठवले यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक तुषार चव्हाण, पोलीस अंमलदार छत्रपती करपते, स्वप्नील बायस्कर , अथर्व कोहळे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

### राज्य माहिती आयोगात तीन

राज्य माहिती आयुक्तांना इतर खंडपीठांमध्ये नियुक्त करण्याचे अथवा काही द्वितीय अपीले त्यांच्या कार्यक्षेत्रात हस्तांतरित करण्याचे अधिकार राज्य मुख्य माहिती आयुक्तांना देण्यात आले आहेत. बाह्य यंत्रणेमार्फत पदे भरताना वित्त विभागाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यात येणार आहे.

या निर्णयामुळे राज्य माहिती आयोगातील प्रलंबित द्वितीय अपीलांच्या निपटाऱ्याला गती मिळून नागरिकांना माहितीचा अधिकार कायद्यांतर्गत अपीलांवर अधिक जलद आणि प्रभावी न्याय मिळण्यास मदत होणार आहे.

### BHMS-CCMP डॉक्टरांच्या MMC

सेवा बंद आंदोलन सुरू करण्यात आले आहे. हे आंदोलन उद्या ५ ऑगस्ट सकाळी ६ वाजेपर्यंत चालणार आहे.

IMA अमरावतीचे अध्यक्ष डॉ. दिनेश वाघाडे आणि सचिव डॉ. विक्रम वानखडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, BHMS-CCMP डॉक्टरांना MMC मध्ये नोंदणी देणे म्हणजे सर्वोपचार म्हणजेच Allopathic वैद्यकीय क्षेत्रातील दर्जा, प्रामाणिकरण आणि वैज्ञानिक आधाराला धक्का आहे. यामुळे सार्वजनिक आरोग्य आणि रुग्ण सुरक्षिततेवर दीर्घकालीन गंभीर परिणाम होऊ शकतात.

'आम्ही यासंबंधात शासकीय विभाग आणि मंत्रालयाकडे अनेकदा निवेदने, पत्रव्यवहार आणि पत्रकार परिषदांद्वारे आमची चिंता मांडली आहे. मात्र त्याकडे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे हा निर्णय घ्यावा लागला आहे,' असे डॉ. वाघाडे म्हणाले.

IMA च्या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की हा निषेध रुग्णांविरुद्ध नाही. रुग्णांच्या सुरक्षिततेसाठी, सार्वजनिक आरोग्याच्या हितासाठी आणि वैद्यकीय क्षेत्रातील वैज्ञानिक व नैतिक मानके जपण्यासाठी हा लढा आहे.

जर BHMS-CCMP डॉक्टरांच्या नोंदणी प्रक्रिया सुरू झाली, तर हे सेवा बंद आंदोलन अनिश्चित काळासाठी सुरू ठेवण्यात येईल, असा इशाराही IMA अमरावतीने दिला आहे.

IMA ने मुख्यमंत्र्यांना विनंती केली आहे की CCMP अर्हता धारक डॉक्टरांना MMC मध्ये नोंदणी देऊ नये.

### नियमभंग करणाऱ्या दोन

या आस्थापनाकडून उघड्यावर कचरा टाकून तो जाळल्याचे आढळून आल्याने ५ हजारांचा दंड आकारण्यात आला. तसेच संजय रिफ्रेशमेंट येथे प्रतिबंधित प्लास्टिक आढळल्यामुळे ५ हजारांचा दंड ठोठावण्यात आला. या मोहिमेत एकूण १० हजारांचा दंड वसूल करण्यात आला.

या विशेष मोहिमेत प्लास्टिक नोडल अधिकारी ए. के. गोहर, ज्येष्ठ स्वास्थ्य निरीक्षक श्रीकांत डवरे, स्वास्थ्य निरीक्षक मिथुन उसरे, धनीराम कलोसे, सचिन सैनी, अजिंक्य जवंजाळ, मिथुन वाघमारे, पवन चावरे, शक्ती पीवाल यांनी सहभाग घेतला.

महानगरपालिकेने नागरिक व व्यावसायिकांनी प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर टाळावा, कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावावी आणि स्वच्छता नियमांचे पालन करावे, असे आवाहन केले आहे.

### मनपा कर्मचारी संघटनेचे

समस्या प्रशासन तसेच राज्य शासनासमोर खंबीरपणे मांडण्यात प्रल्हाद कोतवाल यांचा मोलाचा वाटा राहिला. कामगारांच्या हितासाठी आयुष्यभर तत्परतेने लढा देणारे सर्वसमावेशक नेतृत्व म्हणून त्यांची विशेष ओळख होती.

त्यांच्या या अचानक जाण्याने महापालिका वर्तुळात आणि कोतवाल कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

### मालमत्ता कर वसुलीला अधिक

विशेष लक्ष द्यावे, असे त्यांनी स्पष्ट केले.

या बैठकीत अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, उपायुक्त भाग्यश्री बोरेकर, मुख्यलेखाधिकारी शिल्पा पवार, सहाय्यक संचालक नगर रचना अधिकारी वैशाली गाठे, सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले, भुषण पुसतकर, नितीन बोबडे, धनंजय शिंदे, मनोज शहाळे, सहाय्यक क्षेत्रीय अधिकारी नर्मदा चव्हाण, प्रविण ठाकरे, अतिक्रमण पथक प्रमुख अजय बन्सेले, हरीष संतोसिया, मनपा कर्मचारी उपस्थित होते.

### तरुणीची गळफास घेऊन

असल्याची माहिती मिळताच कुटुंबीय तातडीने तिच्या राहत्या घराकडे धावले. घराचा दरवाजा आतून बंद असल्याने खिडकीतून डोकावून पाहिले असता ती ओढणीच्या सहाय्याने छताच्या पंख्याला लटकलेल्या अवस्थेत दिसून आली.

यानंतर पोलिसांच्या मदतीने दरवाजा उघडून तिला तातडीने रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीनंतर तिला मृत घोषित केले. या प्रकरणी राजापेठ पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून आत्महत्येचे कारण शोधण्यासाठी पुढील तपास सुरू आहे.

### प्रेमभंगातून झालेल्या आत्महत्या

दोघांमध्ये मतभेद वाढले आणि अखेर लग्नास नकार देण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

मृताचे वडील भास्कर पुंडलीकराव वाढोकर (रा. सातेगाव, ता. अंजनगाव सुर्जी) यांनी दिलेल्या तक्रारीत, मुलगा गेल्या काही महिन्यांपासून तीव्र मानसिक तणावाखाली होता. वारंवार आत्महत्येचा उल्लेख करत असल्याने त्याची समजूत काढण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, संबंधितांकडून होत असलेल्या मानसिक त्रासामुळे त्याने हे टोकाचे पाऊल उचलल्याचा आरोप करण्यात आला आहे. १७ जुलै रोजी अजयने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. घटनास्थळी पोलिसांना त्याने लिहिलेली सुसाईड नोट मिळाली. या नोटीतील मजकूर आणि तक्रारीतील आरोपांच्या आधारे संबंधित तरुणी, तिचे वडील संजय पेटे, भाऊ तेजस पेटे तसेच एका महिलेविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०८ व ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, गाडगेनगर पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करीत आहेत.

## राजेंद्र खेतान यांचे निधन

**अचलपूर/प्रतिनिधीः-** परतवाडा शहरातील स्टेट बँक कॉलनी, कोर्ट रोड परिसरातील रहिवासी राजेंद्र नंदलाल खेतान यांचे सोमवार ३ ऑगस्ट २०२६ रोजी निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा मंगळवार, ४ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता त्यांच्या स्टेट बँक कॉलनी, कोर्ट रोड, परतवाडा येथील निवासस्थानातून निघाली.ते आपल्या आपल्या मागे मुलं गोपाल खेतान, स्वप्नील खेतान, ऋषी खेतान यांच्यासह बराच आप्त परिवार सोडून गेले आहे. त्यांच्या निधनाने शोक संवेदना व्यक्त केल्या जात आहे.यावेळी अचलपूर - परतवाडा जुळ्या शहरातील व्यापारी ,प्रतिष्ठित नागरिक,सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.




**दिनांक २८/०७/२०२६ रोजी प्रतिदिन वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या जाहीर नोटीसला खुलासा**

सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, **अब्बासअली अहतेशाम हुसेन हाजी, रा.अमरावती** कडून ॲड. मौशिक अब्दुल शफीक (रजि.नं.महा/१२९४/२०१७) यांच्या मार्फत दिलेली जाहीर नोटीस ही तथ्यहीन, बनावटी मुद्यांवर आधारित खोटी असून मला अमान्य व नाकबुल आहे.अब्बासअली अहतेशाम हुसेन हाजी यांनी त्यांच्या जाहीर नोटीस मध्ये नमुद केलेल्या मालमत्तेचे वर्णन :-

**अमरावती येथे स्थित कॅम्प शिट नं.१३, नझुल प्लॉट नं.२०/१, चा पुर्व पश्चिम विभाजनाचा पश्चिम बाजुला स्थित ३४३५.२५ चौ.मी.(३६९९७.०० चौ.फुट) क्षेत्रफळ भूखंड ज्यामध्ये सुमारे ८० वर्षापूर्वी बांधलेले आणि एकूण ८१५.५८ चौ.मी. (८७७९.०० चौ.फुट) बांधकाम क्षेत्रफळ असलेला हाजी मॅन्शन नावाने प्रसिध्द असलेला दोन मजली निवासी बंगला.**

सदर्हू नोटीस देणारा यांचा सदर्हू मालमत्तेशी कोणताही संबंध नसून ती खोटी व बनावटी आधारे नोटीस प्रसिध्द करुन लोकांची दिशाभूल करत आहे.

वास्तविक त्याचा आमचे पक्षकार व मालमत्तेशी कोणताही संबंध नाही.

या जाहीर खुलाशाव्दारे सुचित करण्यात येते की, दिनांक २८/०७/२०२६ रोजी दिलेल्या जाहीर नोटीसवर कोणीही कोणत्याही प्रकारचा विश्वास ठेवू नये. सदर नोटीस माझा पक्षकारावर बंधनकारक नाही.

याकरिता जाहीर नोटीसला खुलासा सादर.

**ठिकाण :- अमरावती**
**दिनांक :- ०३.०८.२०२६**

**(ॲड.बी.एस.तिवारी)**
**मोरबाग, अमरावती**
**मो.९४०५३५०८११**



**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**जाहीरनामा/सायटेशन**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१४६५/२०२६
**श्रीमती जागृती अधिक दोन विरुध्द निरंक**
पुढील ता.३१.०८.२०२६

अर्जदार :
1. **Jagruti wd/o Shailesh Mehta,** Age 56 Yrs. Occu.: Household
2. **Karan s/o Shailesh Mehta,** Age 30 Yrs. Occu.: Business
   1 to 2 R/o. Mahavir Marg, Near Jaistambh Chowk, Navi Vasti, Badnera, Tq. & Dist. Amravati- 444701
3. **Nilesh s/o. Shailesh Mehta,** Age 36 Yrs. Occu.: Private Job
   R/o. 1708, Joyville Co-operative Housing Society, Building No.6, Nanbhat Road, Bolinj, PO : Virar, Dist. Palghar- 401303

**-- विरुध्द --**

गैरअर्जदार : **निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत हे **Shailesh s/o Harilal Mehta** हे दिनांक **१९.०१.२०२४** रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **जागृती अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्रीमती जागृती अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२८.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

# ‘तुझा मुलगा मरणार आहे का?’ सीएमओच्या कथित अमानुष वक्तव्याने खळबळ!

■ प्रतिनिधी | अकोला ■

शासकीय रुग्णालयात गरीब आणि सर्वसामान्य रुग्णांना माणुसकीची वागणूक मिळते की अपमानाची, असा संतप्त सवाल उपस्थित करणारी धक्कादायक घटना अकोल्यातील जिल्हा सर्वोपचार रुग्णालयात घडल्याचा गंभीर आरोप पुढे आला आहे. उपचारासाठी आलेल्या एका आजारी चिमुकल्याच्या आईला ‘तुझा मुलगा मरणार आहे का? मला सलाईन लावता येणार नाही... तुला जेथे तक्रार करायची आहे तेथे कर!’ असे कथितपणे सुनावणाऱ्या मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्याविरुद्ध संतापाची लाट उसळली आहे.

- सफाई कामगार महिलेचा गंभीर आरोप
- आमदार साजिद पठाण आक्रमक
- सीएमओ च्या तात्काळ निलंबनाची मागणी

विशेष म्हणजे, ही तक्रार करणारी महिला दुसरी-तिसरी कोणी नसून, त्याच शासकीय रुग्णालयात सफाई कामगार म्हणून सेवा बजावणारी आशा शेख बशीर आहे. स्वतः रुग्णालयातील कर्मचारी महिलेलाच अशी अपमानास्पद वागणूक मिळत असेल, तर सामान्य रुग्णांचे काय होत असेल, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

तक्रारीनुसार, ४ ऑगस्ट रोजी सकाळी सुमारे सात वाजता आपल्या मुलाला लूज मोशनचा त्रास होत असल्याने आशा शेख बशीर या उपचारासाठी अपघात कक्षात पोहोचल्या. त्यावेळी OPD सुरू झाली नसल्याने त्यांनी CMO डॉ. पुरुषोत्तम यांच्याकडे मुलाला दाखविले. त्यांनी चौथ्या क्रमांकाच्या वॉर्डमध्ये जाण्याचे सांगितले. मात्र, तेथे डॉक्टरच उपस्थित नसल्याने त्या पुन्हा अपघात कक्षात परतल्या. मुलाची प्रकृती बिघडत असल्याने त्यांनी किमान इंजेक्शन किंवा सलाईन



लावण्याची विनंती केली. मात्र, त्यावर CMO यांनी कथितपणे ‘तुझा मुलगा मरणार आहे का? मी सलाईन लावू शकत नाही. तुला जेथे तक्रार करायची आहे तेथे कर,’ असे अपमानास्पद शब्द वापरत

### आमदार पठाणांचा थेट हस्तक्षेप; निलंबनाची मागणी

प्रकरणाची गंभीरता लक्षात घेऊन आमदार साजिद खान पठाण यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठात्यांना अधिकृत पत्र पाठवून संबंधित ण्श्ध विरोधातील तक्रारीची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. एवढ्यावरच न थांबता, चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित अधिकाऱ्याला तात्काळ सेवेतून निलंबित करावे आणि त्याबाबतचा अहवाल आपल्या कार्यालयाला सादर करावा, असे स्पष्ट निर्देशही त्यांनी पत्रातून दिले आहेत.

डीन यांचा मोबाईल क्रमांक हातात दिल्याचा गंभीर आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या घटनेने संतप्त झालेल्या आशा शेख बशीर यांनी थेट अकोला पश्चिमचे आमदार साजिद खान पठाण यांच्याकडे धाव घेत लेखी तक्रार सादर केली. तक्रारीत त्यांनी आपण अनुसूचित जातीतील महिला असून आपल्या सामाजिक पार्श्वभूमीमुळेही अपमानास्पद वागणूक मिळाल्याची भावना व्यक्त केली आहे. तसेच, सात दिवसांत कारवाई झाली नाही तर आत्मदहन करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

### रुग्णसेवा की मुजोरी?

गरीब रुग्णांच्या उपचारासाठी उभारलेल्या शासकीय रुग्णालयात जर एका आजारी मुलाच्या आईला अशा प्रकारे हिणवले जात असेल, तर ही केवळ एका महिलेची तक्रार नसून संपूर्ण आरोग्य व्यवस्थेच्या संवेदनशीलतेवर प्रश्नचिन्ह उभे करणारी बाब आहे. आपत्कालीन विभागात आलेल्या रुग्णाला उपचार देण्याऐवजी अशा प्रकारची भाषा वापरणे, हे वैद्यकीय सेवेच्या मूलभूत तत्त्वांनाच हरताळ फासणारे असल्याची चर्चा सुरू झाली आहे. आता जीएमसी प्रशासन या गंभीर आरोपांची निष्पक्ष चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करते की प्रकरण दडपण्याचा प्रयत्न होतो, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

---

## अनुसूचित जातीतील अ.ब.क.ड उपवर्गीकरण आरक्षणाचा निर्णय रद्द करा -विलास राऊत



■ प्रतिनिधी | कारंजा ■

अनुसूचित जातीतील अ,ब,क,ड अशा प्रकारे उपवर्गीकरण आरक्षणचा निर्णय तात्काळ रद्द करणे बाबतचे निवेदन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे यांना पीपल्स रिपब्लिकन पार्टी वाशिम जिल्हा संपर्कप्रमुख तथा कारंजा तालुका अध्यक्ष विलास राऊत यांच्या नेतृत्वात बहुसंख्येने उपस्थित पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिकांच्या उपस्थितीत उपस्थितीत तहसीलदार कारंजा (लाड), जिल्हा वाशिम यांच्या मार्फत देण्यात आले.

पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष लॉंगमार्च चे प्रणेते तथा मा.खा.प्रा.जोगेन्द्रजी कवाडे सर यांच्या नेतृत्वाखालील पिपल्स रिपब्लिकन पार्टी महाराष्ट्र प्रदेशच्या वतीने आरक्षण उपवर्गीकरणाच्या विरोधात मंगळवार दि.०४ऑगस्ट २०२६ रोजी पुरकारण्यात आलेल्या राज्यव्यापी प्रचंड आंदोलनाचे पार्श्वभुमीवर भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकाजवळील अशोक नगर येथील तथागत गौतम बुद्ध, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून झाल्यानंतर नामांतर लढ्यामध्ये शहीद झालेल्या भीमसैनिकांना आदरांजली अर्पण केल्यानंतर धरणे आंदोलन करून उपवर्गीकरणाचा निर्णय रद्द करणे बाबत मुख्यमंत्री तथा उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना बहुसंख्येने स्वाक्षरी असलेले निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात नमूद केल्यानुसार शासनस्तरावर अनुसूचित जातीतील अ,ब,क,ड अशा प्रकारे उपवर्गीकरण करुन बौध्द व मातंग अशा दोन समाजामध्ये फुट पाडण्याचा होत असलेला प्रयत्न अत्यंत निषेधार्थ असा असून या निर्णयाचा आज रोजी करण्यात आलेल्या प्रचंड आंदोलनाच्या माध्यमातून तीव्र निषेध करण्यात आला. उपस्थितांना मार्गदर्शन करताना विलास राऊत यांनी मनोगत व्यक्त केली की आरक्षण उपवर्गीकरणाच्या संदर्भात असंविधानिकरित्या शासनकृत घेतलेया जाणारा आणि अनुसूचित जातीकरीता सामाजिकदृष्ट्या अत्यंत घातक ठरणाऱ्या या निर्णयामुळे आंबेडकरी सामाजामध्ये राज्य शासनाच्याप्रती प्रचंड असा असंतोष उफाळल्या जात असून राज्यात सर्वत्र उपवर्गीकरण विरोधी आंदोलनाचा वणवा पेटत आहे. विशेष म्हणजे अनुसूचित जाती मधील ५९ जातीतील केवळ एका जातीचा मातंग समुह उपवर्गीकरणाच्या समर्थनात ठामपणे उभा ठाकलेला आहे. अशावेळी केवळ एका समाजाला खुश करण्यासाठी उपवर्गीकरण लागू करुन बहुसंख्य ५८ अनुसूची जातीतील समुहावर सामाजिक अन्याय करण्याचा कुटील प्रयत्न जर शासनाकडून केल्या गेला तर अनुसूचित जातीतील हा सामाजिक संघर्ष हा अधिक पेटण्याची शक्यता नाकारता येत नाही.

---

## महावितरण प्रशासनाने विनापरवाना बसविला डिजिटल स्मार्ट मीटर!

### महिला ग्राहकाकडून जुना मीटर पूर्ववत बसविण्याची मागणी



**मानोरा :** तालुक्यातील मौजे आसोला खुर्द येथील माझ्या घरी बसविलेला जुना मीटर परवानगीशिवाय पूर्वसूचना न देता महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी काढून स्मार्ट डिजिटल वीज मीटर बसविला आहे. सदरील मीटर तात्काळ हटवून जुनाच मीटर बसविण्यात यावे, असे निवेदन दि. ३१ जुलै रोजी महावितरणचे विद्युत अभियंता यांना विद्युत ग्राहक छाया श्रीराम राठोड दिले आहे.

निवेदनात नमूद केले आहे की, माझ्या घरावरील वीज जोडणीवर कोणतीही पूर्वसूचना न देता, आम्हाला विश्वासात न घेता तसेच आमची परवानगी न घेता डिजिटल स्मार्ट मीटर जबरदस्तीने बसविण्यात आले आहे. सदर डिजिटल स्मार्ट मीटर बसविण्याबत आम्हाला कोणतीही लेखी कल्पना देण्यात आली नाही. तसेच आमची संमती किंवा परवानगी घेण्यात आलेली नाही. सदर मीटर आम्हाला नको असून, आमच्या इच्छेविरुद्ध तो बसविण्यात आलेला आहे. त्यामुळे सदर डिजिटल मीटर तात्काळ काढून घेऊन पूर्वीची जुनी वीज मीटर व्यवस्था पूर्ववत करण्यात यावी, आमची लेखी संमती व परवानगी न घेता अशा प्रकारे कोणतीही कारवाई करण्यात येऊ नये. असे दिलेल्या निवेदनाद्वारे कळविले आहे.

**ग्राहकांमध्ये नाराजी!**

वीज कंपनीकडून स्मार्ट डिजिटल मीटर बसविण्याची मोहीम जोरात सुरू आहे. मात्र ग्राहकांना विश्वासात न घेता, माहिती न देता मीटर बदलल्याने ग्रामीण भागात नाराजीचा सूर उमटू लागला आहे.

---

## अखेर... खेट्रीतील पावसामुळे पडलेल्या भिंतींचा पंचनामा

### शिवसेना शिंदे गटाच्या सोशल मीडिया तालुका प्रमुखाच्या तक्रारीची दखल; नुकसानग्रस्तांना दिलासा

IMPACT जनमाध्यम IMPACT



■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील खेट्री येथे मुसळधार पावसामुळे घरांच्या भिंती कोसळूनही चार ते पाच दिवस संबंधित महसूल यंत्रणेकडून पंचनामा करण्यात टाळाटाळ होत असल्याची तक्रार अखेर प्रशासनाने गांभीर्याने घेतली. दैनिक जनमध्यमने या संदर्भातील वृत्त ४ ऑगस्टच्या अंकात प्रकाशित करताच महसूल विभाग खडबडून जागा झाला आणि त्याच दिवशी तलाठी व ग्रामसचिव यांनी घटनास्थळी भेट देत पंचनामा पूर्ण केला.

यापूर्वी, नुकसानग्रस्तांच्या वतीने शिवसेना (शिंदे गट)चे तालुका सोशल मीडिया प्रमुख शेख साजीद यांच्या नेतृत्वाखाली ३ ऑगस्ट रोजी पातूरच्या तहसीलदारांना निवेदन देण्यात आले होते. पावसामुळे घरांच्या भिंती कोसळूनही पंचनामा न झाल्याने शासनाकडून मिळणाऱ्या मदतीपासून नुकसानग्रस्त वंचित राहण्याची भीती व्यक्त करण्यात आली होती.

या प्रकरणी दैनिक जनमाध्यमने वस्तुस्थिती मांडल्यानंतर तहसीलदारांनी संबंधित कर्मचाऱ्यांना तातडीने पंचनामा करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले. त्यानुसार ४ ऑगस्ट रोजी तलाठी व ग्रामसचिव यांनी प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामा पूर्ण करत अहवाल सादर केला.

या कारवाईमुळे नुकसानग्रस्तांना दिलासा मिळाला असून, शासनाच्या मदतीचा मार्ग मोकळा होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. स्थानिक नागरिकांनीही वेळेवर दखल घेतल्याबद्दल प्रशासन आणि जनमाध्यमचे आभार व्यक्त केले आहेत.

---

## गुणवंत विद्यार्थ्यांसह आई-वडील व गुरुजनांचा महाराष्ट्र बहुजन पत्रकार संघातर्फे सत्कार

### चाणक्य फाउंडेशनचे संस्थापक संचालक प्रा. मिलिंद लाहे यांचे स्पर्धा परीक्षेच्या तयारीबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

■ प्रतिनिधी | कारंजा ■

महाराष्ट्र बहुजन पत्रकार संघाच्या वतीने तालुक्यातील गुणवंत विद्यार्थ्यांसह त्यांना घडविणाऱ्या आई-वडील व गुरुजनांचा भव्य सत्कार सोहळा स्थानिक बाबासाहेब धाबेकर सभागृहात उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. पंकज काटोले होते.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून अदिती अर्बन बँकेचे संस्थापक तथा दैनिक महाभूमीचे संपादक सुरेश देवकर, पोलीस उपविभागीय अधिकारी मनीष ठाकरे, विद्याभारती महाविद्यालयाचे प्राचार्य आर. एम. पाटील, वनपरिक्षेत्र अधिकारी गिरीश जतकर, पोलीस निरीक्षक अमर चोरे, गटशिक्षणाधिकारी श्रीकांत माने, चाणक्य फाउंडेशनचे संस्थापक




संचालक प्रा. मिलिंद लाहे, महाराष्ट्र बहुजन पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष बंडूभाऊ इंगोले, आजतकचे वाशिम-बुलढाणा प्रतिनिधी जका खान, इम्रान पोपटे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी चाणक्य फाउंडेशनचे संस्थापक संचालक प्रा. मिलिंद लाहे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना ’स्पर्धा परीक्षांची पूर्वतयारी, अभ्यास आणि नियोजन’ या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळविण्यासाठी योग्य नियोजन, सातत्यपूर्ण अभ्यास आणि ध्येय निश्चिती यावर भर देण्याचे आवाहन त्यांनी केले.

महाराष्ट्र बहुजन पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष बंडूभाऊ इंगोले यांनी प्रास्ताविकातून पत्रकार संघाच्या कार्याची माहिती देत पत्रकार संघाची सामाजिक भूमिका आणि गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्याचा उद्देश स्पष्ट केला. या कार्यक्रमात तालुक्यातील विविध विद्यालये तसेच उच्च माध्यमिक महाविद्यालयांतील सुमारे १५० गुणवंत विद्यार्थ्यांचा, तसेच त्यांना घडविणाऱ्या आई-वडील व शिक्षकांचा शाल, पुष्पगुच्छ, फाईल, मोमेंटो आणि प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यासोबतच त्यांच्या यशामागे असलेल्या पालक व गुरुजनांच्या योगदानाचा गौरव करण्यात आल्याने या उपक्रमाचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हेमंत पापळे यांनी केले, तर आभार विजय भड यांनी मानले.

---

## सीसीआरटीच्या राष्ट्रीय प्रशिक्षणासाठी वाशिमच्या शिक्षकाची निवड

### सुनील खोटे यांचा उजळणी अभ्यासक्रमात सहभाग

**वाशिम :** सांस्कृतिक मंत्रालय, भारत सरकारच्या अधिपत्याखालील सांस्कृतिक संसाधन आणि प्रशिक्षण केंद्र (CCRT), नवी दिल्ली यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पाच दिवसीय उजळणी अभ्यासक्रमासाठी देशभरातील १७ राज्यांमधून निवड झालेल्या १२१ शिक्षकांमध्ये वाशिम जिल्ह्यातील मोप येथील श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे शिक्षक सुनील खोटे यांचा समावेश होता. दि. २७ ते ३१ जुलै या कालावधीत हा प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या प्रशिक्षणादरम्यान शिक्षण, कला, संस्कृती, काव्य, नाटक, बाहुलीकला, शिल्पकला, नवोपक्रम, आरोग्य आणि योग आदी विविध विषयांवर तज्ज्ञांच्या कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या.

---

## देऊळगावच्या बेपत्ता युवकाचा पठार नाल्यात आढळला मृतदेह



■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोट तालुक्यातील धनकवाडी परिसरातील पठार नाल्यात सोमवारी सकाळी एका युवकाचा मृतदेह आढळल्याने परिसरात खळबळ उडाली. मृत युवकाची ओळख देऊळगाव येथील बेपत्ता असलेल्या अंकुश भटकर (वय अंदाजे ३० ते ३५) अशी झाल्याची माहिती पोलिसांनी दिली.

धनकवाडी येथील ब्रह्मा पांडे यांच्या शेताजवळून जाणाऱ्या पठार नाल्यात पाण्यावर तरंगत असलेला मृतदेह नागरिकांच्या निदर्शनास आला. याबाबत अकोट ग्रामीण पोलिसांना माहिती देण्यात आल्यानंतर ठाणेदार श्रीधर गुट्टे यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले.

मृतदेह पाण्यातून बाहेर काढण्यासाठी पोपटखेड येथील एकलव्य बचाव पथकाची मदत घेण्यात आली. त्यानंतर पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी अकोट ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला. प्राथमिक माहितीनुसार, मृतदेहावर फक्त पॅन्ट होती. घटनास्थळी कोणतेही ठोस परिस्थितीजन्य पुरावे आढळून आले नसल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, देऊळगाव येथील अंकुश भटकर हा युवक गेल्या काही दिवसांपासून बेपत्ता असल्याची तक्रार अकोट ग्रामीण पोलिस ठाण्यात दाखल होती. मृतदेहाची ओळख पटविण्यासाठी नातेवाईकांना बोलावण्यात आले असता त्यांनी तो अंकुश भटकर याचाच असल्याचे सांगितले. मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदन अहवालानंतर स्पष्ट होणार असून, आत्महत्या की अन्य काही कारण, याबाबतसर्व बाजूंनी तपास सुरू आहे. या प्रकरणाचा तपास ठाणेदार श्रीधर गुट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली सावरा बिटचे जमादार सुधीर झटाले, उमेश सोळंके, सचिन कुलट, रितेश जायभाये व इतर पोलीस कर्मचारी करीत आहेत.

---

## शेलुबाजारमध्ये युरिया खतासाठी शेतक-यांची फरफट

## ऑनलाइन साठा असूनही ‘खत नाही’चा दावा

### शेलुबाजार परिसरात युरिया खताची जादा दराने विक्री संबंधित विभागाची संशयास्पद भूमिका

**मंगरूळपीर :** खरीप हंगाम ऐन भरात असताना मंगरूळपीर तालुक्यातील शेलुबाजार परिसरातील शेतकऱ्यांना युरिया खतासाठी मोठी धावपळ करावी लागत असल्याचे चित्र आहे. काही कृषी सेवा केंद्रांमध्ये ऑनलाइन प्रणालीवर युरिया खताचा साठा उपलब्ध असल्याचे दिसत असतानाही प्रत्यक्षात शेतकऱ्यांना ’युरिया उपलब्ध नाही’ असे सांगून परत पाठवले जात असल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली आहे.

सध्या परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतात हळद, सोयाबीन, तूर, कापूस, उडीद, मूग व फळबागा असल्यामुळे आदी पिके जोमात असून या पिकांना वेळेवर युरिया खताची आवश्यकता आहे. मात्र आवश्यक वेळी खत न मिळाल्यास पिकांच्या वाढीवर आणि उत्पादनावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता



शेतकरी व्यक्त करत आहेत.

शेतकऱ्यांचा आरोप आहे की, संबंधित कृषी सेवा केंद्रांमध्ये ऑनलाइन नोंदीनुसार खताचा साठा उपलब्ध असतानाही प्रत्यक्ष विक्री केली जात नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना वारंवार फेऱ्या माराव्या लागत असून त्यांचा वेळ आणि आर्थिक खर्चही वाढत आहे.

या प्रकरणाची कृषी विभागाने तातडीने दखल घेऊन संबंधित कृषी सेवा केंद्रांची तपासणी करावी, ऑनलाइन साठा आणि प्रत्यक्ष उपलब्ध साठ्याची पडताळणी करावी तसेच दोषी आढळणाऱ्यांवर नियमानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. तसेच पात्र शेतकऱ्यांना युरिया खताचा सुरळीत पुरवठा करून त्यांची गैरसोय दूर करावी, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात येत आहे.

**शेलुबाजार येथील कृषी दुकानांमध्ये तीन** दिवसापासून युरियासाठी चकरा मारत आहे. आमच्या मुलाने ऑनलाईन प्रणालीवर शेलुबाजार मध्ये एरिया कुठल्या दुकानावर मिळेल असे पाहिले असता बऱ्याच दुकानावर ऑनलाईन मध्ये आज दिनांक ३ ऑगस्ट रोजी युरिया खताचा स्टॉक ऑनलाईन प्रणालीवर पुष्कळ प्रमाणात आहे. तरीही संबंधित कृषी सेवा केंद्र धारक शेतकऱ्याला युरिया नाही म्हणून असे सांगत आहे संबंधित विभागाने तात्काळ आज ऑनलाईन युरिया उपलब्ध असलेल्या सर्व कृषी केंद्रचा स्टॉक व ऑनलाइन राहणारा स्टॉक चेक करून दोषीवर कारवाई करावी ही आम्हा शेतकऱ्याची मागणी आहे.

**दयाराम तायडे,** शेतकरी

..........................

शेलुबाजार परिसरामध्ये काही कृषी सेवा केंद्रावर युरिया उपलब्ध आहे शेतकऱ्यांनी गरजेनुसार कृषी केंद्रावरून शासनमान्य २६६:५० रुपयाला ४५ किलो ची गोणी या दराने युरिया खरेदी करावा तसेच कृषी सेवा केंद्र धारकाजवळ स्टॉक उपलब्ध असतानाही शेतकऱ्यांना युरिया देण्याकरिता काही अडथळा निर्माण करत असतील तर पंचायत समिती कृषी विभाग व कृषी विभागाचे गुण नियंत्रण यांच्याशी संपर्क साधावा...

**आकाश इंगोले,** तालुका कृषी अधिकारी

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २४९ ■ बुधवार, ५ ऑगस्ट २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## नागलवाडीचा '१०० टक्के सोलरग्राम' म्हणून गौरव

**कारंजा (घा.) जनमाध्यम** : तालुक्यातील भलेवाडी ग्रामपंचायतीअंतर्गत येणाऱ्या नागलवाडीने शाश्वत ऊर्जा वापराच्या दिशेने उल्लेखनीय कामगिरी करत '१०० टक्के सोलरग्राम' हा मानाचा सन्मान मिळविला आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत मिळालेल्या या यशाची दखल घेत भारत सरकारच्या नीती आयोगाच्या पथकाने गावाला भेट देऊन ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांचे आणि ग्रामस्थांचे कौतुक केले.

यावेळी नीती आयोगाचे प्रतिनिधी रविकिरण उबाळे, गटविकास अधिकारी प्रवीण देशमुख, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा सरिता गाखरे, बाल विकास प्रकल्प अधिकारी जिनेवार, विस्तार अधिकारी कैलास वानखेडे आदी उपस्थित होते.

## दोन दिवसांच्या शोधानंतर महिला, युवक मृतावस्थेत आढळले

### हिंगणघाट तालुक्यातील वालधूर शिवारातील घटना

### आत्महत्या की घातपात?





**हिंगणघाट जनमाध्यम** : दोन दिवसांपासून बेपत्ता असलेली विवाहित महिला आणि युवकाचा मृतदेह मंगळवारी पहाटे वालधूर शिवारातील पिंलगाव–येडे उमरी मार्गावरील एका शेतातील विहिरीत आढळून आल्याने हिंगणघाट तालुक्यात खळबळ उडाली. विशेष म्हणजे दोघांचेही मृतदेह एकमेकांच्या कमरेला दुपट्ट्याने बांधलेल्या अवस्थेत आढळल्याने या घटनेने गूढ निर्माण झाले असून आत्महत्या की घातपात, याबाबत विविध तर्कवितर्कांना उधाण आले आहे.

मृतांमध्ये गुंजन प्रशांत इंगळे (३८) आणि मंगेश भुजग खेरे (३४, दोघेही रा. संत तुकडोजी वॉर्ड, हिंगणघाट) यांचा समावेश आहे.

गुंजन इंगळे या विवाहित असून त्यांना चार वर्षांची मुलगी आहे. रविवारी त्या मंगेश खेरे यांच्यासोबत दुचाकीवरून घराबाहेर पडल्या होत्या. त्यानंतर दोघेही परत न आल्याने नातेवाईकांनी हिंगणघाट पोलिस ठाण्यात बेपत्ता असल्याची तक्रार नोंदविली होती.

पोलिस आणि नातेवाईकांकडून दोघांचा शोध सुरू असतानाच मंगळवारी पहाटे विहिरीत दोघांचे मृतदेह आढळले. घटनास्थळी दोघांचे मोबाईल फोन विहिरीजवळील स्टार्टरजवळ सापडल्याने या प्रकरणाला आणखी गूढ वळण मिळाले आहे.

प्राथमिक तपासात आत्महत्येची शक्यता वर्तविण्यात येत असली, तरी मृत्यूमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. दोघांमध्ये वैयक्तिक संबंध असल्याची चर्चा परिसरात सुरू असली, तरी पोलिसांनी त्याबाबत कोणतीही अधिकृत माहिती दिलेली नाही. शवविच्छेदन अहवाल आणि तांत्रिक तपासानंतरच मृत्यूचे कारण स्पष्ट होणार असल्याचे सांगण्यात आले.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक प्रवीण देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली संग्राम मुंडे करीत आहेत.

## पोस्ट पेमेंट बँकेला चार महिन्यांचे कुलूप; खातेदारांची फरफट

### आष्टी तालुक्यातील IPPB सेवा ठप्प

केंद्र ममदापुरात हलविल्याची चर्चा, नागरिकांचा संताप अनावर

**आष्टी (शहीद) जनमाध्यम** : डिजिटल बँकिंग आणि आर्थिक समावेशनाच्या घोषणा करणाऱ्या यंत्रणेचे वास्तव आष्टी येथे उघड झाले आहे. तालुक्याचे मुख्यालय असलेल्या आष्टी पोस्ट कार्यालयातील इंडिया पोस्ट पेमेंट बँक (घ्इइँ) सेवा गेल्या तब्बल चार महिन्यांपासून बंद असल्याने हजारो खातेदारांना स्वतःच्या पैशांसाठी हेलपाटे मारावे लागत आहेत. सेवा उपलब्ध नसल्याने पोस्ट कार्यालयातून ग्राहकांना रिकाम्या हाताने परत पाठविले जात असून नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

शासनाच्या आवाहनाला प्रतिसाद देत अनेक नागरिकांनी पोस्ट पेमेंट बँकेत खाती उघडली. सुरुवातीला सर्व व्यवहार सुरळीत सुरू होते. मात्र, सेवा देणाऱ्या महिला कर्मचाऱ्याची ममदापूर येथे बदली झाल्यानंतर आष्टीतील सेवा पूर्णपणे ठप्प झाल्याची चर्चा आहे. त्यानंतर पर्यायी कर्मचारी नियुक्त न केल्याने पैसे जमा करणे, काढणे तसेच शासकीय योजनांचे लाभ घेणेही अनेकांसाठी अडचणीचे ठरत आहे.

तालुक्याच्या मुख्यालयातच ही अवस्था असेल, तर दुर्गम भागातील नागरिकांनी कुठे जावे, असा सवाल उपस्थित होत आहे. चार महिन्यांपासून सेवा बंद असतानाही संबंधित विभागाने कोणतीही पर्यायी व्यवस्था न करणे ही गंभीर प्रशासकीय उदासीनता असल्याची टीका होत आहे. नागरिकांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून आष्टी येथे तातडीने IPPB सेवा पूर्ववत करावी. कायमस्वरूपी कर्मचारी नियुक्त करावा आणि खातेदारांची होणारी आर्थिक गैरसोय त्वरित दूर करावी, अशी मागणी केली आहे. अन्यथा ग्राहकांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.



शासनाच्या विश्वासावर पोस्ट पेमेंट बँकेत खाते उघडले. कार्ड मिळाले; पण पैसे काढण्यासाठी गेल्यावर प्रत्येक वेळी सेवा बंद असेच उत्तर मिळाले. महिनाभर पायपीट केल्यानंतर केंद्र ममदापूरला हलविल्याचे समजले. आष्टी तालुक्यात तातडीने घ्इइँ सेवा सुरू करून खातेदारांची फरफट थांबवावी.

**-सुचिता धंडाळे खातेदार, आष्टी**

## केळझरमध्ये ५२६ ग्रॅम गांजा जप्त पिता-पुत्र एलसीबीच्या जाळ्यात

### २६ हजार ८५० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत

**सेलू जनमाध्यम:** स्थानिक गुन्हे शाखेने सेलू तालुक्यातील केळझर येथे सोमवारी धडक कारवाई करत ५२६ ग्रॅम गांजा जप्त केला. या कारवाईत गांजा, रोख रक्कम व मोबाईलसह एकूण २६ हजार ८५० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून गांजा विक्रीप्रकरणी पिता-पुत्राविरुद्ध सेलू पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांच्या निर्देशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पथक सेलू पोलिस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत होते. त्यावेळी केळझर येथील गणेशनगर परिसरात गांजा विक्री सुरू असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. माहितीच्या आधारे पथकाने तातडीने रूखा भूजाजी धनवे यांच्या घरावर छापा टाकला.

या कारवाईदरम्यान रूखा भूजाजी धनवे आणि त्यांचा मुलगा आशीद धनवे हे दोघे गांजा विक्री करताना आढळून आले. झडतीत त्यांच्या ताब्यातून ५२६ ग्रॅम गांजा, विक्रीतून मिळालेली रोख रक्कम तसेच मोबाईल जप्त करण्यात आला. जप्त मुद्देमालाची एकूण किंमत २६ हजार ८५० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.



या प्रकरणी दोन्ही आरोपींविरुद्ध एनडीपीएस कायद्यान्वये सेलू पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक विनोद चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक सलाम कुरेशी तसेच अरविंद येनुरकर, रोशन निंबोळकर, रवी पुरोहित आणि सागर भोसले यांनी ही कारवाई केली.

## दुर्मीळ शस्त्रक्रियेतून १७ वर्षीय तरुणाला नवे आयुष्य

### जेएनएमसी-एव्हीबीआरएचमध्ये दोन्ही कूल्ह्यांचे यशस्वी प्रत्यारोपण

**वर्धा जनमाध्यम** :अनेक वर्षांपासून अंथरुणाला खिळलेल्या १७ वर्षीय तरुणाला जवाहरलाल नेहरू वैद्यकीय महाविद्यालय (जेएनएमसी) व आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय (एव्हीबीआरएच), सावंगी (मेघे) येथील अस्थिरोग विभागाने दोन्ही कूल्ह्यांचे (बिलॅटरल टोटल हिप रिप्लेसमेंट) यशस्वी प्रत्यारोपण करून नवजीवन दिले आहे.



हा तरुण ज्युवेनाईल रुमेटॉइड आर्थ्रायटिस आणि एचएलए-बी२७ पॉझिटिव्ह अँकिलोझिंग स्पॉन्डिलायटिस या गंभीर आजारांनी ग्रस्त होता. त्यामुळे त्याच्या दोन्ही कूल्ह्यांचे सांधे पूर्णपणे जुळून गेले होते. तीव्र वेदना, शरीरातील विकृती आणि स्नायूंची कमजोरी यामुळे तो अनेक वर्षांपासून अंथरुणाला खिळला होता.

अस्थिरोग विभागाचे प्रमुख व प्राध्यापक डॉ. गजानन एल. पिसुळकर यांच्या नेतृत्वाखाली तज्ज्ञ डॉक्टरांच्या चमूने १५ दिवसांच्या अंतराने दोन टप्प्यांत शस्त्रक्रिया केली. अत्याधुनिक इम्प्लांट्सचा वापर करून दोन्ही कूल्ह्यांचे प्रत्यारोपण यशस्वीपणे करण्यात आले.

## रस्त्यावरच्या गिट्टीने ऑटो पलटी विद्यार्थ्याचा हात फ्रॅक्चर, अनेक जखमी

**सेलू जनमाध्यम** : सुरगाव-सेलू मार्गावरील अपूर्ण रस्ते काम आणि रस्त्यावर पसरलेल्या सैल गिट्टीमुळे मंगळवारी सकाळी किनकर कॉलेजजवळ विद्यार्थ्यांची ऑटो (एमएच ३१ सीव्ही ७४०१) पलटी झाली.

या अपघातात नववीतील आदित्य प्रशांत पाटील (१५) याचा हात फ्रॅक्चर झाला असून, त्याला पुढील उपचारासाठी सेवाग्राम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. श्रेयस विनोद पुनवटकर याच्या पायात गिट्टीचे तुकडे घुसल्याने तोही जखमी झाला, तर अन्य चार-पाच विद्यार्थ्यांना किरकोळ दुखापत झाली.





माहितीनुसार, सुरगाव येथील गोलू कंगाले हे ११ विद्यार्थ्यांना घेऊन सेलूकडे जात असताना किनकर कॉलेजजवळील पुलावर ऑटोचे चाक रस्त्यावरील सैल गिट्टीत रुतल्याने वाहनावरील नियंत्रण सुटले आणि ऑटो उलटला.

घटनेनंतर कंत्राटदाराने अपघातस्थळी घाईघाईने गिट्टीवर चुरी टाकून परिस्थिती सावरण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप नागरिकांनी केला. सुरगाव-सेलू मार्गावरील रखडलेल्या कामामुळे यापूर्वीही अपघात घडल्याचे सांगत संतप्त पालक व नागरिकांनी संबंधित कंत्राटदारावर कठोर कारवाई करून रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी केली आहे.

## कुऱ्हाडीने हल्ला प्रकरणी दोघांना सहा महिन्यांचा कारावास



**हिंगणघाट जनमाध्यम** : दहा वर्षांपूर्वी घडलेल्या कुऱ्हाडीने हल्ला करून मारहाण केल्याच्या प्रकरणात हिंगणघाट येथील प्रथम श्रेणी न्यायालयाने दोन्ही आरोपींना दोषी ठरवत सहा महिन्यांच्या साध्या कारावासाची तसेच प्रत्येकी ५०० रुपयांच्या दंडाची शिक्षा सुनावली. दंड न भरल्यास १५ दिवसांचा अतिरिक्त साधा कारावास भोगावा लागणार आहे.

हिंगणघाट पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २०१५ मध्ये इंदिरा गांधी वॉर्ड येथील उमेश गुलाबराव परचाके यांच्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला होता. फिर्यादीने घराचा दरवाजा उघडताच आरोपी संदीप मुरलीधर पराते (वय ३१) व मुरलीधर पराते (वय ६४, दोघेही रा. कोपरी, ता. राळेगाव, जि. यवतमाळ) यांनी संगनमत करून हल्ला केला. यावेळी संदीप पराते याने कुऱ्हाडीने पाठीवर वार करून जखमी केले, तर मुरलीधर पराते याने फिर्यादीला पकडून ठेवत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

या प्रकरणी हिंगणघाट पोलिस ठाण्यात भारतीय दंड संहितेच्या कलम ३२४ व ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपास तत्कालीन पोलीस हवालदार मारोती वाघाडे यांनी करून न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले. सरकार पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता रवीकुमार चौधरी यांनी प्रभावी युक्तिवाद केला. पैरवी अंमलदार सीमा जांगडेकर यांनी साक्षीदार न्यायालयात हजर राहण्यासाठी समन्वय साधला. तसेच ठाणेदार पोलीस निरीक्षक राऊत यांनीही साक्षीदारांना मार्गदर्शन केले. या प्रकरणाचा निकाल देताना प्रथम श्रेणी न्यायालयाचे न्यायाधीश ए. बी. इंगोले यांनी दोन्ही आरोपींना कलम ३२४, ३४ अंतर्गत दोषी ठरवत सहा महिन्यांचा साधा कारावास व प्रत्येकी ५०० रुपयांचा दंड अशी शिक्षा सुनावली.

## सेवाग्राम पोलिसांची मोठी कारवाई; ११.१५ लाखांचा विदेशी दारूसाठा जप्त

### दत्तपूर बायपासवर नाकाबंदीदरम्यान चालक कार टाकून पसार; ७ लाखांची कारही जप्त

**वर्धा जनमाध्यम** : सेवाग्राम पोलिसांनी दत्तपूर येथील उड्डाण पुलाखाली बायपास रोडवर धडक कारवाई करत मध्यप्रदेशातून अवैधरीत्या आणला जात असलेला विदेशी दारूचा मोठा साठा जप्त केला. या कारवाईत ११ लाख १५ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून, चालक पोलिसांचा पाठलाग चुकवत कार सोडून पसार झाला.

पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे २ ऑगस्ट रोजी रात्री उशिरा दत्तपूर बायपास परिसरात नाकाबंदी करण्यात आली. त्यावेळी एमएच-२८-व्ही-९४६५ क्रमांकाची पांढऱ्या रंगाची हुंडाई कार संशयास्पदरीत्या येताना दिसली. पोलिसांनी थांबविण्याचा प्रयत्न केला असता चालकाने भरधाव वेगाने कार पळवून नेली. पोलिसांनी पाठलाग सुरू केल्यानंतर पकड टाळण्यासाठी चालकाने कार व त्यातील मुद्देमाल जागेवरच सोडून अंधाराचा फायदा घेत पसार झाला.



पंचांसमक्ष कारची तपासणी केली असता त्यामध्ये विविध कंपन्यांच्या विदेशी दारूच्या २८ पेट्या आढळून आल्या. पोलिसांनी सुमारे ७ लाख रुपये किमतीची कार आणि ४ लाख १५ हजार ८०० रुपयांचा विदेशी दारूसाठा असा एकूण ११ लाख १५ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी अज्ञात चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील मंडलिक यांच्या मार्गदर्शनाखाली सेवाग्रामचे ठाणेदार देवेंद्र ठाकूर यांच्या नेतृत्वात पोलीस पथकाने केली.

## अधिवासाच्या शोधात पट्टेदाराची आर्वीकडे झेप; गाजापूर (वाई) परिसरात वाघाचे पगमार्क

### वनविभाग अलर्ट मोडवर; ग्रामस्थांना सतर्कतेचा इशारा, गस्त वाढविली

**वर्धा जनमाध्यम** : अधिवासाच्या शोधात जंगलातून प्रदीर्घ भटकंती करणाऱ्या पट्टेदार नर वाघाने आता आर्वी वनपरिक्षेत्रात प्रवेश केल्याची शक्यता बळावली आहे. रोहणा नजीकच्या गाजापूर (वाई) परिसरात सोमवारी वाघाचे ताजे पगमार्क आढळून आल्याने वनविभागाने तातडीने सतर्कतेचा इशारा जारी केला आहे. वाघाच्या हालचालींमुळे परिसरातील गावांमध्ये सावधगिरीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांनी वनविभागाच्या सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

यापूर्वी हा पट्टेदार नर वाघ वर्धा वनपरिक्षेत्रातील धामणगाव-वाठोडा परिसरात मुक्तपणे संचार करत असल्याचे निदर्शनास आले होते. त्यानंतर मानव-वन्यजीव संघर्षाची शक्यता लक्षात घेऊन वनविभागाने तातडीने विशेष पथके तैनात केली होती.

वाघाच्या प्रत्येक हालचालीवर नजर ठेवण्यासाठी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकडून दिवसरात्र गस्त घालण्यात येत होती. काही काळानंतर वाघ जंगलाच्या दिशेने निघून गेल्याने त्याचा मागोवा घेणे कठीण झाले. मात्र, खबरदारीचा उपाय म्हणून धामणगाव-वाठोडा परिसरातील दहा गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला होता.

दरम्यान, सोमवारी रोहणा जवळील गाजापूर (वाई) परिसरात आढळलेल्या पगमार्कमुळे संबंधित वाघाने आर्वी वनपरिक्षेत्राची हद्द गाठल्याचे स्पष्ट संकेत मिळाले आहेत.

या पार्श्वभूमीवर आर्वीचे वनपरिक्षेत्र अधिकारी सुरेश गवारले यांनी वनकर्मचाऱ्यांना विशेष दक्षतेच्या सूचना देत गस्त अधिक तीव्र करण्याचे आदेश दिले आहेत.

वाघाच्या हालचालींचा मागोवा घेण्यासाठी विविध पथके कार्यरत करण्यात आली असून परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवले जात आहे.



वनविभागाने नागरिकांना रात्रीच्या वेळी शेतात किंवा जंगलालगतच्या भागात एकटे जाणे टाळावे, जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावीत, लहान मुलांना जंगल परिसरात एकटे पाठवू नये आणि वाघ दिसल्यास किंवा त्याच्या हालचालींची माहिती मिळाल्यास तत्काळ वनविभागाला कळवावे, असे आवाहन केले आहे.

अधिवासाच्या शोधात वाघाचा प्रवास सुरू असल्याने रोहणा, गाजापूर (वाई) आणि आसपासच्या गावांतील नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता सतर्क राहावे, असे वनविभागाने स्पष्ट केले आहे. वाघावर सातत्याने लक्ष ठेवले जात असून कोणतीही अनुचित घटना घडू नये, यासाठी प्रशासनाने सर्व आवश्यक उपाययोजना सुरू केल्या आहेत.


### नावात बदल

माझे पूर्वी **ANITA GOWARDHANSETH KATIYARI** असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड वरील ANITA GOWARDHAN KATYARI नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता: शिवाजी वॉर्ड आर्वी जिल्हा वर्धा ४४२२०१**

### नावात बदल

माझे पासपोर्ट नंबर L6752481वरील माझे **SHEKHAR GOWARDHANSETH KATIYARI** असे नाव होते. माझ्या पॅन कार्ड व बँक पासबुक वरील **SHEKHAR GOWARDHAN KATYARI** नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

पत्ता: शिवाजी वॉर्ड आर्वी वर्धा ४४२२०१

### नावात बदल

माझे पूर्वी **GOWARDHANSETH KATIYARI** असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड वरील **GOWARDHAN SADHURAM KATYARI** नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

पत्ता :- शिवाजी वॉर्ड आर्वी जिल्हा वर्धा ४४२२०१

# अधिवेशनात आमदार सावजी शोधतात, कुणी आजारी पडत नाही

## ▪ तुकाराम मुंढे यांना कुणी सुपारी दिली? ▪ समाजमाध्यमांवर संतप्त प्रतिक्रिया

**नागपूर/प्रतिनिधी :** अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मी सावजी खाल्ला तर एक महिना आजारी पडेन या वक्तव्यानंतर समाजमाध्यमांवर संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात आमदार आणि त्यांचे कार्यकर्ते आवर्जून सावजी भोजनालय शोधतात, तरी कुणी आजारी पडल्याचे ऐकिवात नाही. मुंढे साहेब, एकदा तरी सावजी खाउन पाहा, अशा आशयाच्या पोस्ट मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहेत.





**समाजमाध्यमांवर नेमक्या कोणत्या प्रतिक्रिया उमटत आहेत?**

मुंढे यांच्या वक्तव्यानंतर फेसबुक, व्हाट्सअप, इन्स्टाग्राम आणि एक्सवर संतप्त प्रतिक्रियांचा पूर आला आहे. अनेकांनी सावजी भोजनाचे फोटो, व्हिडिओ आणि स्वताचे अनुभव शेअर करत विदर्भाच्या खाद्यसंस्कृतीच्या समर्थनार्थ भूमिका मांडली आहे.

**कोणती पोस्ट सर्वाधिक चर्चेत आहे?-** हलबा उद्योजक ग्रपवर एक पोस्ट चर्चेत आहे. त्यात नागपूर अधिवेशनात आमदार व त्यांचे कार्यकर्ते सावजी भोजनालय शोधत असतात. कोणीही आजारी पडल्याचे ऐकिवात नाही. मुंढे साहेबांना कुणी सुपारी दिली वाटते. एकदा तरी सावजी खाउन तर पाहा, अशा आशयाची पोस्ट मोठ्या प्रमाणावर शेअर होत आहे. या पोस्टवर शेकडो प्रतिक्रिया आणि समर्थनाच्या टिप्पण्याही दिसून येत आहेत.

**आणखी काय प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत?-** सावजी आमचा अभिमान, विदर्भाची ओळख सावजी, सावजीवर टीका मान्य नाही, सावजी म्हणजे परंपरा अशा आशयाच्या पोस्ट मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहेत. अनेकांनी सावजी, #Savji यांसारखे हॅशटॅग वापरत सावजी भोजनाचे फोटो आणि व्हिडिओही शेअर केले आहेत.

**नागपूर अधिवेशनाचा संदर्भ का दिला जात आहे?-** प्रतिक्रिया देणा-यांचे म्हणणे आहे की, राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन नागपुरात होत असताना राज्यभरातून येणारे मंत्री, आमदार आणि त्यांचे कार्यकर्ते सावजी भोजनालयांमध्ये आवर्जून भोजन करतात. त्यामुळे सावजीवर केलेल्या वक्तव्याशी अनेकांनी असहमती व्यक्त केली आहे.

## माफी मागा, नाहीतर कोर्टात भेटू
## तुकाराम मुंढेंविरोधात सावजी समाज आक्रमक

**नागपूर/प्रतिनिधी :** नागपूरच्या खाद्यसंस्कृतीची ओळख असलेल्या सावजी मटणावर अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी केलेल्या वक्तव्यावरून वाद निर्माण झाला आहे. माझ्यासारख्या माणसाने सावजी जेवण खाल्ले तर किमान महिनाभर रुग्णालयात जावे लागेल, असे वक्तव्य करत त्यांनी तेलकट व तिखट अन्नपदार्थांपासून दूर राहण्याचा सल्ला दिला होता. या विधानामुळे सावजी हाटेल व्यावसायिक, सावजी समाज आणि खाद्यप्रेमींमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून, मुंढे यांनी माफी मागावी, अन्यथा मानहानीचा दावा दाखल करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

**नागपुरात हजारांहून अधिक सावजी भोजनालये-** नागपूरमध्ये सुमारे एक हजारांहून अधिक सावजी भोजनालये असून, हा केवळ खाद्यपदार्थ नसून शहराच्या सांस्कृतिक ओळखीचा भाग असल्याचे व्यावसायिकांचे म्हणणे आहे. सावजी आरोग्यासाठी इतकेच घातक असते, तर नागपूरमधील सर्व रुग्णालये रुग्णांनी भरली असती. सावजी हा आमचा ब्रँड आहे आणि अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह त्यावर अवलंबून आहे, अशी प्रतिक्रिया एका व्यावसायिकाने दिली. काही व्यावसायिकांनी मुंढे यांना मूळ सावजी पदार्थाची चव घेण्याचे निमंत्रणही दिले. ते आमच्या घरी येउन सावजी खावेत किंवा आम्ही त्यांच्या घरी जाउन पारंपरिक पद्धतीने सावजी बनवून दाखवू. प्रत्यक्ष अनुभव घेतल्यानंतरच मत व्यक्त करावे, असेही त्यांनी म्हटले. सावजी समाजाच्या प्रतिनिधींनी मुंढे यांच्या वक्तव्यामुळे सावजी ब्रँडची प्रतिमा मलिन झाल्याचा आरोप केला आहे. पिढ्यान् पिढ्या हा व्यवसाय करणा-या कुटुंबांच्या उपजीविकेवर अशा विधानांचा परिणाम होउ शकतो, असे सांगत त्यांनी सार्वजनिक माफीची मागणी केली आहे. माफी न मागितल्यास न्यायालयात मानहानीचा दावा दाखल करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. या वादात दुसरी बाजूही पुढे आली आहे. सावजीच्या नावाखाली अनेक ठिकाणी अत्यधिक तेल आणि तिखट वापरून पदार्थ तयार केले जात असल्याचे मान्य केले जात आहे. त्यामुळे काही ग्राहकांना आरोग्याच्या तक्रारी जाणवतात. मात्र, ही पारंपरिक सावजी पाककृती नसून चुकीच्या पद्धतीने तयार होणा-या पदार्थांमुळे संपूर्ण सावजी खाद्यसंस्कृतीला दोष देणे योग्य नसल्याचे व्यावसायिकांचे म्हणणे आहे.

## तुकाराम मुंढेंच्या विधानावर विदर्भ राज्य आंदोलन समिती आक्रमक

**नागपूर/प्रतिनिधी :** अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सावजी जेवणाबाबत केलेल्या वक्तव्यावरून आता सामाजिक आणि राजकीय प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या युवा आघाडीने मुंढे यांच्या वक्तव्याचा निषेध करत ते तातडीने मागे घ्यावे आणि विदर्भातील जनतेची जाहीर माफी मागावी, अशी मागणी केली आहे.

समितीचे युवा आघाडीचे प्रांताध्यक्ष मुकेश मासुरकर यांनी प्रसिद्धीपत्रकातून तुकाराम मुंढे यांच्या वक्तव्याचा तीव्र निषेध केला आहे. सावजी जेवण ही केवळ खाद्यपद्धती नसून नागपूर आणि संपूर्ण विदर्भाच्या सांस्कृतिक परंपरेचा, खाद्यसंस्कृतीचा आणि अस्मितेचा अविभाज्य भाग असल्याचे त्यांनी म्हटले आहे. त्यामुळे अशा परंपरेबाबत अवमानकारक किंवा सर्वसाधारण स्वरूपाची विधाने करणे दुर्दैवी असल्याचे त्यांनी नमूद केले. मुकेश मासुरकर म्हणाले, कोल्हापूरमधील नागरिकही अतितिखट खाद्यपदार्थ खातात. ते अनेकदा सावजी जेवणापेक्षाही अधिक तिखट मानले जातात. मग त्यांना हृदयविकाराचा झटका का येत नाही, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. एखाद्या व्यक्तीचा वैयक्तिक अनुभव संपूर्ण खाद्यसंस्कृतीवर लादणे योग्य नसल्याचेही त्यांनी म्हटले.सार्वजनिक जीवनातील व्यक्तींनी कोणत्याही प्रदेशाची संस्कृती, परंपरा आणि स्थानिक भावनांचा आदर राखून वक्तव्य करावे, असे आवाहन समितीने केले आहे. मतभेद व्यक्त करण्याचा प्रत्येकाला अधिकार असला, तरी त्यातून एखाद्या प्रदेशाच्या अस्मितेचा अवमान होणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक असल्याचे मासुरकर यांनी म्हटले.

तुकाराम मुंढे यांनी सावजीबाबत केलेले वक्तव्य तातडीने मागे घ्यावे आणि विदर्भातील जनतेची जाहीर माफी मागावी, अशी मागणी विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या युवा आघाडीने केली आहे.वादाची पार्श्वभूमी काय? एका कार्यक्रमातील मी सावजी खाल्ला तर एक महिना आजारी पडेन या तुकाराम मुंढे यांच्या वक्तव्याचा व्हिडिओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाल्यानंतर त्यावर विविध स्तरांतून प्रतिक्रिया उमटत आहेत. हलबा-कोष्टी समाज, सावजी भोजनालय चालक, खाद्यप्रेमी आणि विविध संघटनांनी सावजी ही विदर्भाच्या खाद्यसंस्कृतीची ओळख असल्याचे सांगत या वक्तव्यावर आक्षेप नोंदवला आहे. समाजमाध्यमांवरही मुंढे यांच्या वक्तव्याविरोधात मोठ्या प्रमाणावर पोस्ट आणि प्रतिक्रिया प्रसारित होत आहेत.

## UPI पेमेंट संदर्भात मोठा बदल होणार?
# 2000 पेक्षा जास्तीच्या व्यवहारांवर 'मर्चंट चार्ज' आकारण्याची तयारी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** तुम्ही रोजच्या व्यवहारांसाठी UPI चा वापर करता का? येत्या काही दिवसांत युपीआय पेमेंटच्या नियमांमध्ये एक मोठा बदल पाहायला मिळू शकतो. केंद्र सरकार २ हजार रुपये किंवा त्यापेक्षा जास्त रकमेच्या 'UPI मर्चंट ट्रान्झॅक्शन'वर (व्यापा-यांसोबतचे व्यवहार) मर्चंट डिस्काउंट रेट (MDR) पुन्हा लागू करण्याच्या विचारात आहे. यासंदर्भातील अंतिम निर्णय पुढील एक महिन्यात घेतला जाउ शकतो, अशी माहिती समोर आली आहे.

**२ हजारांपेक्षा जास्त UPI व्यवहारांवर MDR?-** मिळालेल्या माहितीनुसार, केंद्र सरकार २,००० रुपये किंवा त्यापेक्षा अधिक रकमेच्या UPI मर्चंट व्यवहारांवर MDR पुन्हा लागू करण्याच्या प्रस्तावावर विचार करत आहे. मात्र, हा नियम सर्व प्रकारच्या छ्क्ष व्यवहारांसाठी लागू होईल असे नाही. प्रस्तावानुसार, मोठ्या व्यापा-यांकडे करण्यात येणा-या २,००० रुपये किंवा त्यापेक्षा जास्त रकमेच्या छ्क्ष पेमेंटवर ग्क्ड आकारला जाउ शकतो. याबाबत सरकार येत्या काही आठवड्यांत निर्णय घेउ शकते, असा दावा केला जात आहे.

**कोणत्या व्यापा-यांवर होउ शकतो परिणाम?-** प्रस्तावानुसार, वार्षिक उलाढाल १.५ कोटी रुपयांपर्यंत असलेल्या छोट्या व्यापा-यांना या शुल्कातून दिलासा मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे ग्क्ड लागू करण्याचा निर्णय झाल्यास त्याचा प्रमुख परिणाम मोठ्या व्यापारी आणि व्यावसायिक आस्थापनांवर होउ शकतो. मात्र, नेमकी उलाढालीची मर्यादा, व्यवहाराची रक्कम आणि कोणत्या श्रेणीतील व्यापा-यांना हा नियम लागू होईल, हे सरकारच्या अंतिम निर्णयानंतरच स्पष्ट होईल.

**MDR म्हणजे नेमके काय?**

MDR म्हणजे Merchant Discount Rate. एखादा ग्राहक डिजिटल पद्धतीने पेमेंट करतो, तेव्हा




संबंधित व्यवहार स्वीकारण्यासाठी व्यापा-याकडून बँक किंवा पेमेंट सेवा पुरवठादाराला आकारले जाणारे शुल्क म्हणजे MDR. डिजिटल पेमेंटची पायाभूत सुविधा चालवणे, व्यवहारांची प्रक्रिया करणे आणि संपूर्ण पेमेंट नेटवर्कची देखभाल करण्यासाठी या शुल्काचा उपयोग केला जातो.

**किती MDR आकारला जाउ शकतो?**


मिळालेल्या माहितीनुसार, मोठ्या व्यापा-यांकडे करण्यात येणा-या २,००० रुपये किंवा त्यापेक्षा जास्त रकमेच्या UPI व्यवहारांवर ०.५ टक्क्यांपर्यंत MDR आकारण्याचा विचार केला जाउ शकतो. उदाहरणार्थ, १०,००० रुपयांच्या पात्र छ्क्ष मर्चंट व्यवहारावर ०.५ टक्के दर लागू झाल्यास MDR ची रक्कम ५० रुपये होईल. मात्र, हे शुल्क ग्राहकाने भरायचे की व्यापा-याच्या व्यवहार खर्चाचा भाग असेल, याबाबत अंतिम नियम महत्त्वाचे ठरणार आहेत.

**सर्वसामान्य UPI ग्राहकांना पैसे मोजावे लागणार?-** सध्याच्या माहितीनुसार, प्रस्तावित MDR हा थेट ग्राहकांवर आकारण्यात येणारा चार्ज नाही. तो पात्र व्यापा-यांकडून आकारला जाणारा शुल्क प्रकार आहे. त्यामुळे एखाद्या व्यक्तीने दुस-या व्यक्तीला UPI द्वारे पैसे पाठवल्यास त्या Person-to-Person (P2P) व्यवहारावर या प्रस्तावाचा थेट परिणाम अपेक्षित नाही.त्याचप्रमाणे, सध्याच्या व्यवस्थेनुसार सामान्य UPI व्यवहारांसाठी ग्राहकांना वेगळे शुल्क द्यावे लागत नाही. त्यामुळे केवळ २,००० रुपयांपेक्षा जास्त रक्कम UPI द्वारे पाठवली म्हणून ग्राहकाच्या खात्यातून अतिरिक्त ग्क्ड कापला जाईल, असा याचा अर्थ नाही.

**व्यापा-यांवर अप्रत्यक्ष परिणाम होण्याची शक्यता-** MDR थेट व्यापा-यांकडून आकारला गेला, तरी मोठ्या व्यवसायांच्या डिजिटल व्यवहार खर्चात वाढ होउ शकते. काही व्यापारी हा अतिरिक्त खर्च वस्तू किंवा सेवांच्या किमतीत समाविष्ट करण्याचा प्रयत्न करू शकतात. त्यामुळे ग्राहकांवर अप्रत्यक्ष परिणाम होण्याची शक्यता पूर्णपणे नाकारता येत नाही. दरम्यान, UPI मर्चंट व्यवहारांवर MDR पुन्हा लागू करण्याबाबतचा अंतिम निर्णय अद्याप झालेला नसल्याचे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. सरकारकडून अधिकृत निर्णय आणि त्यासंबंधी नियम जाहीर झाल्यानंतरच याबाबतचे संपूर्ण चित्र स्पष्ट होईल.

## खरातच्या 100 बनावट खाते प्रकरणात पतसंस्था व्यवस्थापक अटक; 7 पर्यंत कोठडी

**राहाता/प्रतिनिधी :** समता पतसंस्थेच्या येथील शाखेत शंभर बनावट खाते प्रकरणात पोलिसांच्या शिर्डी एसआयटीने मोठी कारवाई करत, पतसंस्थेच्या राहाता शाखेचा व्यवस्थापक मिलिंद बनकर याला अटक केली. त्याला आज, मंगळवारी न्यायालयाने ४ दिवसांची (दि. ७) पोलिस कोठडी सुनावल्याची





माहिती एसआयटीचे तपास अधिकारी तथा शिर्डीचे उपविभागीय अधिकारी अमोल भारती यांनी दिली.

मुख्य आरोपी भोंदू अशोक खरात याच्या चौकशीतून समोर आलेल्या धागेदो-यांच्या आधारे ही कारवाई करण्यात आली आहे. राहाता येथील समता पतसंस्थेत तब्बल ५७ व्यक्तींच्या नावावर १०२ बनावट खाती उघडण्यात आली होती. विशेष म्हणजे या सर्व खात्यांमध्ये भोंदू अशोक खरात याचेच नाव वारसदार म्हणून नोंदविण्यात आले होते. या खात्यांमधून कोट्यवधी रुपयांची आर्थिक उलाढाल झाल्याचा संशय तपास यंत्रणेला आहे.शिर्डी पोलिसांनी संबंधित खातेदारांची चौकशी केली असता, सर्वांनी आपण कोणतेही खाते उघडले नसल्याचे स्पष्ट सांगितले. त्यामुळे बनावट कागदपत्रांच्या आधारे ही खाती उघडण्यात आल्याचा संशय अधिक बळावला आहे. या खात्यांमधून कोट्यवधी रुपयांचे आर्थिक व्यवहार झाल्याचा तपास सुरू आहे. बनावट खाती उघडण्यासाठी पतसंस्थेतील अधिकारी आणि कर्मचा-यांची भूमिका काय होती, याचाही शोध घेतला जात आहे.या संर्दभात पतसंसंथेत १०२ खाते उघडतांना सह्या कोणी केल्या, या उघडलेल्या खात्यांवर रोख रक्कमा कोणी भरल्या, नंतर पैसे काढतांना खातेदारांच्या सह्या कोणी केल्या असा युक्तीवाद तपासी अधिकारी भारती यांनी न्यायालयासमोर केला. हा युक्तीवाद ग्राह्य धरून अधिक तपास करण्यासाठी व्यवस्थापक मिलिंद बनकर याला ४ दिवसांची पोलिस कोठडी न्यायालयाने दिली. दरम्यान, मुख्य आरोपी अशोक खरात याला न्यायालयाने सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावल्याने त्याच्या चौकशीतून मिळालेल्या माहितीनंतर राहाता शाखेचा व्यवस्थापक मिलिंद बनकरला अटक करण्यात आल्याने तो चौकशीत काय माहिती देतो त्यानंतरच आणखी काही जणांवरही कारवाई होण्याची शक्यता तपास यंत्रणांकडून व्यक्त केली जात आहे. समता पतसंस्थेतील या कथित आर्थिक गैरव्यवहारात आणखी कोणती नवी माहिती समोर येते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. या प्रकरणी दिनेश परब यांनी राहाता पोलीस ठाण्यात अशोक खरात विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केलेला आहे.

### *नागपुरात कन्हान पुलावर मध्यरात्री घडला थरार*
# आशी डेची हत्या, आरोपी अटकेत

**नागपूर/प्रतिनिधी :** शहरातील वादग्रस्त तरुणी अश्विनी उर्फ आशी डे हिचा मृतदेह सोमवारी पहाटे कान्हान नदीच्या पुलाखाली पाण्यात आढळून आल्याने खळबळ उडाली. त्यानंतर ही आत्महत्या नसून तरुणीचा खून झाल्याचा निष्कर्षापर्यंत पोलिसांचा तपास पोहचला आहे. पोलिसांनी या प्रकरणात मारेक-याला ताब्यात घेतले आहे. जुन्या प्रेमप्रकरणानंतर झालेल्या वादातून ही हत्या झाल्याचे पोलिसांनी सांगितले.





या खून प्रकरणात आशिष उर्फ मोनू किशोर मनपिया या आरोपीला कन्हान पोलिसांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या मदतीने ताब्यात घेतले आहे.आशी डे हीचा रात्री ३ वाजता कन्हान नदीवरील पुलावरून खाली ढकलून खून झाल्याचे स्पष्ट झाले. धक्कादायक बाब म्हणजे ज्यावेळी आरोपीने तिला खाली लोटून दिले त्यावेळी रेल्वेच्या ट्रॅकमनला काहीतरी खाली कोसळल्याचा आवाज आला होता. त्यानंतर त्याने टॉर्चचा लाईट टाकून पाहिले असता तरुणी खाली पडल्याचे दिसले.

**काय घडली होती घटना?**

सोमवारी पहाटे सुमारे तीनच्या सुमारास कान्हान पोलिसांना नदीत महिलेचा मृतदेह तरंगत असल्याची माहिती मिळाली. घटनास्थळी पोहोचलेल्या पोलिसांनी मृतदेह बाहेर काढला. सुरु वातीला ओळख पटणे कठीण गेले, मात्र उपलब्ध छायाचित्रे आणि इतर माहितीच्या आधारे मृतदेह आशी डे हिचाच असल्याची माहिती समोर आली.

**जुन्या वादातून झाली हत्या-** तपासादरम्यान पोलिसांनी आशी डे हिचे जुने वाद, वैयक्तिक संबंध, आर्थिक व्यवहार तसेच अलीकडील हालचालींची माहिती गोळा केली. डे या तरुणीने राणा प्रताप नगर आणि यशोधरा नगर पोलीस ठाण्यात आशिष उर्फ मोनू किशोर मनपिया विरोधात दोन तक्रारी केल्या होत्या. पोलिसांनी या प्रकरणात गुन्हा दाखल केला होता. त्याच वादातून आरोपी आशिषने तीला तोडगा काढण्याच्या बहाण्याने दुचाकीवरून कन्हान कडे नेले होते. त्यानंतर त्याने आशी हिला मध्यरात्री पुलावरून खाली ढकलून दिले होते.

**रेल्वेच्या ट्रॅकमॅनने पाहिली घटना-** पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार आशी डे हीचा कन्हान नदीच्या रेल्वे पुलावरून ढकलून देत खून करण्यात आला. मध्यरात्री तीनच्या सुमारास रेल्वेच्या रुळाची पाहणी करणा-या ट्रॅकमॅनने एकाला कोणीतही ढकलून देत असल्याचे दिसले. त्यानंतर कोणीतही खाली कोसळल्याचा आवाज आल्याने ट्रॅकमॅनने रात्रीच्या अंधारात टार्चच्या प्रकाशात खाली पाहिले असता त्याला मृतदेह दिसला. ट्रॅकमॅन हा घटनेचा प्रत्यक्षदर्शी साक्षिदार असल्याने पोलीस तपासाला दिशा मिळाली होती.

## गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा योजनेला आणखी तीन वर्षाची मुदतवाढ


**मुंबई/प्रतिनिधी-** गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेस आणखी तीन वर्षांची मुदतवाढ देण्यास तसेच या योजनेत पात्र भूमिहीन शेतमजूर व महिला शेतक-यांचा समावेश करण्याचा निर्णय आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. यापूर्वी ही



योजना कुटुंबातील दोनच सदस्यांना लागू होती, आता ही योजना शेतक-यांच्या कुटुंबातील सर्व सदस्यांना लागू होणार आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी २०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात येणार आहे. शेती करताना होणारे अपघात, वीज पडणे, पूर, सर्पदंश, विंचूदंश, विजेचा धक्का बसणे इत्यादी नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे अपघात, रस्त्यावरील अपघात, वाहन अपघात, तसेच, अन्य कोणत्याही कारणांमुळे होणारे अपघात, यामुळे मृत्यू ओढवतो किंवा अपंगत्व येते. घरातील कर्त्या व्यक्तीस झालेल्या अपघातामुळे कुटुंबाचे उत्पन्नाचे साधन बंद होउन अडचणीची परिस्थिती निर्माण होते. अशा अपघातग्रस्त शेतक-यांस किंवा त्यांच्या कुटुंबास आर्थिक लाभ देण्याकरिता राज्यातील सर्व शेतकरी व खातेदार म्हणून नोंद नसलेल्या, शेतक-याच्या कुटुंबातील १० ते ७५ वर्ष वयोगटातील कोणताही १ सदस्य (आई-वडील, शेतक-याची पति/पत्नी, मुलगा व अविवाहित मुलगी यापैकी कोणतीही एक व्यक्ती) अशा एकूण २ जणांकरिता २०२३-२४ पासून गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना राबविण्यात येत होती. यात मृत्यू आणि अपंगत्व आल्यास दोन लाख ते एक लाखांपर्यंतची आर्थिक मदत देण्यात येते. या योजनेस ३१ मार्च २०३१ पर्यंत मुदतवाढ देण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. शेतीमध्ये प्रत्यक्ष राबणा-या भूमिहीन शेतमजूरांचा वाटा मोठा असून, कामाच्या ठिकाणी त्यांनाही अपघाताचा धोका असतो. भूमिहीन शेतमजूरांचा अपघाती मृत्यू किंवा अपंगत्व आल्यास त्यांच्या कुटुंबावर आर्थिक संकट ओढवते. ही बाब विचारात घेता, या योजनेचे संरक्षण भूमिहीन शेतमजुरांनाही देण्यात येणार आहे. योजनेत अपघातामुळे झालेला अंतर्गत रक्तस्त्राव आणि उष्माघात या अपघातांचा नव्याने समावेश करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. योजनेसाठी यापुढे अपीलिय समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी यांच्या ऐवजी अपर जिल्हाधिकारी राहतील. तसेच या योजनेत आर्थिक मदतीसाठीचा प्रस्ताव स्वीकारण्यासाठी दोन महिन्यांची मुदत राहणार आहे. आर्थिक मदत थेट लाभ हस्तांतरण पद्धतीने लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात येईल. त्यासाठी इंटिग्रेटेड ऑनलाईन पोर्टल सुरु करण्यात येणार आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी २०० कोटी रुपयांची तरतूद करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

## पत्नीला जीवननिर्वाहाचा खर्च न देणे म्हणजे तिचा 'आर्थिक छळ'च !

**नागपूर /प्रतिनिधी-** पती-पत्नी कौटुंबिक कारणांमुळे विभक्त राहत असले, तरी पत्नीला दैनंदिन गरजा आणि उदरनिर्वाहासाठी लागणारा खर्च न देणे हा कौटुंबिक हिंसाचार कायद्यांतर्गत आर्थिक छळच मानला जाईल, असा महत्त्वपूर्ण निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिला आहे.प्रकरणातील पती यवतमाळ, तर पत्नी बुलडाणा जिल्ह्यातील रहिवासी आहे. ते २०१४ पासून एकमेकांपासून वेगळे राहत आहेत. दरम्यान,



पत्नीने कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायद्यांतर्गत बुलडाणा सत्र न्यायालयात अर्ज करून पतीकडून पोटगीची मागणी केली होती. सत्र न्यायालयाने पत्नीच्या बाजूने निकाल देत दरमहा १५ हजार रुपयांची पोटगी मंजूर केली. या निर्णयाला पतीने उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. पत्नीने शारीरिक, मानसिक छळ किंवा हुंड्याची मागणी सिद्ध केलेली नाही. त्यामुळे हे प्रकरण कौटुंबिक हिंसाचाराच्या व्याख्येत बसत नाही आणि केवळ पतीने कोणतीही आर्थिक मदत केली नाही, या एका विधानाच्या आधारावर पोटगी मंजूर करणे चुकीचे आहे. तसेच, अशा परिस्थितीत पत्नी ही कायद्यानुसार पीडित व्यक्ती ठरत नाही, असा दावा पतीने केला होता. उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती एम. एम. नेरलीकर यांनी दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आणि पुराव्यांची तपासणी करून पतीची याचिका फेटाळून लावली व सत्र न्यायालयाचा आदेश कायम ठेवला. पतीच्या उलटतपासणीत त्याने २०१४ ते २०२२ या काळात पत्नीला अन्न, वस्त्र, औषधोपचार किंवा उदरनिर्वाहासाठी कोणतीही आर्थिक मदत दिली नाही, हे स्वतः कबूल केले. त्यामुळे उच्च न्यायालयाने कौटुंबिक हिंसाचार कायद्याचा संदर्भ देत, आर्थिक छळ म्हणजे केवळ घरगुती गरजा नाकारणे नव्हे, तर कायद्यानुसार मिळणा-या आर्थिक सवलती, स्त्रीधन, पोटगी किंवा उदरनिर्वाहाच्या साधनांपासून वंचित ठेवणे हासुद्धा आर्थिक छळच आहे, असे स्पष्ट केले.

## तलाठी व सीईटी परीक्षेत मोठा घोळ!

**मुंबई / प्रतिनिधी-** स्पर्धा परीक्षा आणि सीईटी प्रक्रियेमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार सुरू असून, यात मंत्री आणि अधिकारी सामील असल्याचा गंभीर आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केला आहे. मुंबईत घेतलेल्या पत्रकार परिषदेत बोलताना रोहित पवार म्हणाले की, दहावी आणि बारावीमध्ये ८० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवणारे विद्यार्थी पूर्वी सीईटीमध्येही उत्तम गुण मिळवायचे. मात्र, २०२३ नंतर यामध्ये अचानक मोठी तफावत



दिसून येउ लागली आहे. एकाच घरातील आणि एकाच केंद्रावरील मुलांना समान पर्सेंटाईल मिळणे किंवा २०० पैकी १०४ गुण मिळूनही विद्यार्थ्याचे पर्सेंटाईल केवळ ९ येणे, हे सामान्य नाही. या प्रक्रियेत मोठा घोळ असून नार्मलायझेशन आणि पर्सेंटाईलच्या नावाखाली विद्यार्थ्यांची फसवणूक केली जात आहे. याप्रसंगी रोहित पवार म्हणाले,राज्यात इंजिनीअरिंग, फार्मसी आणि कृषी अभ्यासक्रमासाठी घेण्यात येणा-या टाळ->B³ ऑनलाईन परीक्षेतच घोळ होत असून त्याऐवजी पूर्वीप्रमाणे ऑफलाईन परीक्षा घेणे आवश्यक आहे. एमएचवी-सीईटी ऑनलाईन परीक्षेत अनेक गैरप्रकार झाले असून ही परीक्षा घेणारी एडुस्पार्क ही कंपनी परीक्षेचं टेंडर मिळवण्यासाठी कसा गैरव्यवहार करते याची पोलखोल बिहारसह अनेक राज्यांनी केली आहे. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळण्याचाच हा प्रकार असून यामुळे गुणवान आणि प्रामाणिक विद्यार्थ्यांवर अन्याय होतो. त्यामुळे परीक्षेच्या निकालाचे फारेन्सिक ऑडिट करून २०२३ पासून सीईटी परीक्षेच्या निकालाची आणि या कंपनीला दिलेल्या सर्व टेंडरची सखोल चौकशी झाली पाहिजे. हा मुद्दा लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा असून त्याचा आम्ही अखेरपर्यंत पाठपुरावा करू !

## हिंसा पसरवणा-या राष्ट्रवादी काँग्रेसला भाजप व पोलिसांची साथ

**मुंबई /प्रतिनिधी-** राष्ट्रवादी काँग्रेसच्या काही गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी काँग्रेसचे कार्यालय गांधी भवनमध्ये घुसून धुडगुस घातला. यामागे भारतीय जनता पक्ष व पोलिसांची फूस होती. एखाद्या पक्षाच्या कार्यालयात घुसून अशा पद्धतीने भ्याड हल्ला करण्याचा हा चुकीचा पायंडा पाडला जात आहे. आरे ला कारे म्हणता येते पण काँग्रेस पक्ष गांधींचा मार्ग सोडणार नाही. सांगून आले असते तर संविधान देउन त्यांचे स्वागत केले असते असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन



सपकाळ यांनी म्हटले आहे. गांधी भवन मध्ये घुसून राष्ट्रवादी काँग्रेसच्या काही कार्यकर्त्यांनी हिंसा करण्याचा प्रयत्न केला, या भ्याड हल्ल्याचा निषेध करत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष पुढे म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेसचे काही कार्यकर्ते काँग्रेस कार्यालयात आले होते पण त्याची भनक पोलिसांना लागली नाही यावर विश्वास बसत नाही, पोलिसांची भूमिका ही सदरक्षणाय, खलनिग्रहणाय नसून खलरक्षणाय अशी होती. काँग्रेस कार्यालय गांधी भवनला पोलिस सुरक्षा नव्हती, पोलिसांच्या नाकर्तेपणाचाही काँग्रेस पक्ष निषेध करतो. आमच्यावर कितीही हल्ले केले तरी आम्ही विरोधी पक्षाची भूमिका सोडणार नाही, सभ्यता व संस्कृती सोडणार नाही. पण असेच सुरु राहिले तर कोणीही कोणाच्या घरात घुसेल.आम्हालाही त्यांना प्रतिक्रिया देता येते पण आम्ही आमचा मार्ग व संस्कृती सोडणार नाही. त्यांना काँग्रेस कार्यालयात हिंसाचार करायचा होता, ज्या व्यक्तीने हा धूडगुस घातला, त्याची अजित पवार यांनी पदावरून हकालपट्टी केली होती. काँग्रेस नेते व पंतप्रधान डॉ मनमोहन सिंग यांना मौनी बाबा म्हटले होते तर इंदिरा गांधी यांना गुंगी गुडिया म्हटले होते पण त्यांनी त्यांच्या कार्यकर्तृत्वाने राष्ट्रनिर्मितीत मोठे योगदान दिलेले आहे, त्यांनी आपल्या कार्यातून उत्तर दिले. सुनेत्रा पवार यांनीही आपल्या कार्यातून उत्तर द्यावे.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## धर्मांतरावर कठोर कायदा

महाराष्ट्राच्या विधिमंडळाने संमत केलेल्या 'महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य २०२६' विधेयकावर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी शिक्कामोर्तब केले आणि राज्यात बेकायदा धर्मस्वातंत्र्य करण्यावर चाप लावणारा कायदा आता अंमलात आला आहे. धर्मांतरावर कठोर कायद्याने निर्बंध लावणारे महाराष्ट्र हे देशातील १४ वे राज्य आहे. भारतीय जनता पक्षाने निवडणुकीत जनतेला दिलेल्या आणखी एका वचनाची अंमलबजावणी या कायद्याने राज्यात सुरू झाली. सामाजिक सुरक्षा व सामाजिक न्याय, यासाठी देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने उचललेले हे महत्त्वाचे पाऊल आहे. समाजातील सर्व घटकांना निर्भयपणे जीवन जगता यावे, प्रलोभनाने किंवा धमक्या देऊन किंवा दहशत निर्माण करून कोणाही व्यक्तीचे धर्मांतर होऊ नये, यासाठी सरकारने केलेल्या कायद्याला राष्ट्रपतींनी मंजुरी दिली. विधिमंडळाने संमत केलेले विधेयक अगोदर मंजुरीसाठी राज्यपालांकडे पाठविले गेले, त्यांच्या मंजुरीनंतर ते राष्ट्रपतींकडे पाठविण्यात आले. या विधेयकाचे कायद्यात रूपांतर झाल्याचे राज्याच्या ३० जुलैच्या राजपत्रात प्रसिद्ध झाले आहे. बळजबरीने, फसवणूक करून, धाक दाखवून, धमकी देऊन, दहशत निर्माण करून यापुढे राज्यात कुठेही व कोणासही धर्मांतर करता येणार नाही. बेकायदा धर्मांतर झालेच, तर तो अजामीनपात्र गुन्हा ठरेल. जे कोणी दोषी असतील त्यांना ७ वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा देण्याची कायद्यात तरतूद आहे. धर्मांतरित महिला जर अल्पवयीन वा अनुसूचित जाती-जमातीतील असेल, तर कठोर शिक्षा देण्याची तरतूद आहे. पुन्हा गुन्हा केल्याचे आढळले, तर १० वर्षे तुरुंगवास व ५ लाख दंड ठोठावला जाईल. विवाह करण्यासाठी केलेले धर्मांतरही या कायद्यानुसार बेकायदेशीर ठरविण्यात आले. मात्र, धर्मांतर केलेल्या दाम्प? त्याला झालेल्या मुलांना या कायद्यात संरक्षण आहे. एक म्हणजे या मुलांचा त्यांच्या आईचा विवाहपूर्व धर्म मानण्यात येईल व दुसरे म्हणजे धर्मांतरित आई-वडिलांच्या मालमत्तेत त्यांचा पूर्ण अधिकार असेल. कायद्याने मुलांच्या भविव्याची काळजी घेतली आहे. मुलांची कस्टडी आईकडेच असेल, अशीही कायद्यात तरतूद आहे. या तरतुदीमुळे आई-वडिलांच्या चुकीचा वा चुकीच्या निर्णयाचा फटका मुलांना बसण्यापासून संरक्षण मिळेल. कोणाला स्वेच्छेने धर्मांतर करायचे असेल, तर ६० दिवस अगोदर जिल्हा न्यायदंडाधिकारी यांना तशी सूचना द्यावी लागेल. पोलिस चौकशी होईल. कोणाचा आक्षेप असेल, तर सार्वजनिक हरकती मागविण्यात येतील. स्वेच्छेने धर्मांतर केल्यानंतर तसे २१ दिवसांत सार्वजनिक रूपात ते जाहीर करण्याचे बंधनही या कायद्यात आहे. धर्मांतराच्या विरोधात त्या संबंधित व्यक्तीचे नातेवाईक, भाऊ-बहीण किंवा रक्ताचे नातेवाईक तक्रार करू शकतील. अशा कठोर बंधनांमुळे महाराष्ट्रात बेलगाम बेकायदेशीर धर्मांतरांना निश्चितच चाप बसू शकेल, असा विश्वास वाटतो. भारतीय घटनेने प्रत्येक नागरिकाला धर्म स्वीकारण्याचा व आचारण करण्याचा अधिकार दिलेला आहे. मात्र, सार्वजनिक सुव्यवस्था व नैतिकता यांच्या अधीन राहूनच हा अधिकार बजावता येईल. १९६७ मध्ये सर्वप्रथम ओडिशा राज्यात धर्मांतरविरोधी कायदा आला. त्यानंतर मध्य प्रदेश, छत्तीसगड, गुजरात, हिमाचल प्रदेश, झारखंड, उत्तराखंड, उत्तर प्रदेश, हरियाणा व आता महाराष्ट्र राज्यात धर्मांतराला चाप लावणारा कायदा झाला. कर्नाटकात असा कायदा झाला व नंतर राज्य सरकारने रद्द केला. आज ज्या राज्यांत धर्मांतरविरोधी कायदा आहे त्यातला एखाददुसरा अपवाद वगळता, त्या बहुतेक राज्यांत भाजपची सत्ता आहे. समान नागरी कायदा व हिंदुत्वाचा आग्रह हा भाजपचा अजेंडा आहे. त्यादृष्टीनेच ज्या राज्यात पक्ष सत्तेवर आहे, तेथे याच मार्गावरून तेथील सरकारची वाटचाल आहे. देशात मतदार रचना आणि त्याला दुखावून चालणार नाही, हे विरोधी पक्षांच्याही लक्षात आले आहे. म्हणूनच धर्मांतरविरोधी कायद्याला विरोधी पक्ष उघड विरोध करीत नसला तरी मनापासून किती पाठिंबा देतो, असे चित्र देशात कुठेही बघायला मिळत नाही. देशात कित्येक वर्षे गोरगरीब, अतिमागासलेले, आदिवासी, उपेक्षितांना कधी पैसे, कधी अन्न-धान्य, तर कधी औषधोपचार यांचे प्रलोभन दाखवून धर्मांतर होत आहे. त्याला लगाम घालण्यासाठी कठोर कायद्याची आवश्यकता आहे. काही विशिष्ट धर्मांकडून आमिषे किंवा प्रलोभने दाखवून धर्मांतर केले जाते. याच धर्मांतरातून अल्पसंख्य असलेल्या समाजाची लोकसंख्या लक्षणीय वाढत आहे. त्यातून सामाजिक समस्या निर्माण होतात. शिवाय, धर्माच्या नावाखाली व्होट बँक उभी केली जाते. अल्पसंख्य म्हणून शासनाच्या सवलती मिळवायच्या व दुसरीकडे धर्मांतराच्या मोहिमा चालवायच्या, ही प्रवृत्ती वाढू लागली आहे. धर्मांतरबंदी कायद्याला काही समाजातील नेत्यांकडून विरोध होणार, हे अपेक्षितच होते. स्वेच्छेने धर्मांतर करण्यावर बंधने नसली, तर त्यावर कडक निर्बंध लागू केले आहेत. बेकायदा धर्मांतर करणाऱ्यांवर कायद्याचा व समाजाचा धाक असला पाहिजे. महाराष्ट्रात धर्मांतरावर बंदी घालणारा कायदा लागू झाल्याने अशा घटनांना चाप बसेल, अशी आशा आहे. मूळ कोणत्याही धर्माच्या धार्मिक व सांस्कृतिक परंपरांचे संरक्षण करणारा हा कायदा स्वागतार्ह आहे. धर्म हा विषय राज्य सरकारच्या अखत्यारीतील नाही, असे कारण देऊन वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकरांनी न्यायालयात आव्हान देण्याचे ठरवले आहे. धर्मांतर केल्यावर ते सार्वजनिक केले पाहिजे हे बंधन म्हणजे वैयक्तिक स्वातंत्र्यावर गदा आहे, असे काहींचे मत आहे. काही प्रकरणांत निरपराध व्यक्तींवर धर्मांतर केले म्हणून गुन्हे दाखल होऊ शकतात, अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे. आंतरधर्मीय विवाह करणाऱ्यांवर विनाकारण संशय निर्माण होईल, अशीही शक्यता आहे. देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने अनेक प्रकरणांत निर्णय देताना स्पष्ट केले आहे की, धर्माचा प्रचार करण्याचा अधिकार आहे; पण फसवणुकीने किंवा जबरदस्तीने कुणाचे धर्मांतर करण्याचा कुणालाही अधिकार नाही. गोरगरीब जनतेच्या असहायतेचा लाभ उठवून त्यांचे धर्मांतर केले जात असल्यामुळेच हा राष्ट्रीय मुद्दा बनला आहे. ज्या राज्यात कायदा नाही, तेथे धर्मांतराचा गैरफायदा घेतला जाऊ शकतो. अर्थात, या नव्या कायद्याचा सन्मान राखणे तितकेच महत्त्वाचे आहे. कायद्याच्या आडून तो हातात घेण्याचा प्रकार घडू शकतो. हा कायदा सक्तीच्या, बेकायदा आणि जबरदस्तीच्या धर्मांतराला बंदी घालतो; पण तो नियमानुसार धर्मांतराचा हक्क डावलत नाही, हे लक्षात घेतले पाहिजे.

---

**पेपरफुटीनंतर विद्यार्थी आंदोलनाने मंत्र्यांचा राजीनामा मिळवला; आता पुढील खरी लढाई पारदर्शक, स्वायत्त आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण व्यवस्थेसाठी आहे.**

# राजीनामा झाला, पुढे काय?

नीट पेपरफुटीच्या प्रकरणाने देशभरातील लाखो विद्यार्थी रस्त्यावर उतरले. सोशल मीडियावरील रिल्स, व्हॉट्सअॅप आणि डिजिटल विश्वात रमणारी जेन झी पिढी प्रत्यक्ष रस्त्यावर आली आणि अखेर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा द्यावा लागला. एका केंद्रीय मंत्र्याचा राजीनामा म्हणजे विद्यार्थी लढयाची शेवट की नव्या लढयाची सुरुवात, हा प्रश्न या आंदोलनानंतर अधिक तीव्रतेने उभा राहतो. राजीनामा झाला, ते योग्यच झाले. मात्र, राजीनामा म्हणजे व्यवस्थेतील दोष संपल्याची हमी नसते. प्रधान गेले, जोशी आले, तरी व्यवस्था बदलली नाही तर विद्यार्थ्यांचा विजय अपुरा ठरेल. म्हणून आज एका व्यक्तीच्या बदलापेक्षा संपूर्ण शिक्षण व्यवस्थेच्या पुनर्बांधणीची गरज आहे.

इतिहासात अशी सामाजिक आणि नैतिक 'स्पेस' वारंवार निर्माण होत नाही. पुन्हा एखादे नीटसारखे प्रकरण घडेल, मग आंदोलन करू, अशी वाट पाहणे ही मोठी चूक ठरेल. आज आंदोलनामुळे निर्माण झालेली ऊर्जा उद्याच्या धोरणात्मक बदलात रूपांतरित झाली नाही, तर या आंदोलनाची नोंद केवळ एका मंत्र्याच्या राजीनाम्यापुरतीच मर्यादित राहील. त्यामुळे विद्यार्थ्यांनी स्वतःला हा प्रश्न विचारायला हवा- आपल्याला फक्त राजीनामा हवा होता की शिक्षण व्यवस्था बदलायची आहे?

**पेपरफुटी हा प्रश्नाचा फक्त एक भाग**

नीट पेपरफुटी हे केवळ निमित्त ठरले. त्यापलीकडे शिक्षणक्षेत्र अनेक गंभीर समस्यांनी ग्रासलेले आहे. वाढते बाजारीकरण, प्रवेश परीक्षांचे वाढते वर्चस्व, कोचिंग उद्योग, महागडे होत जाणारे खासगी शिक्षण, केंद्रीकृत परीक्षा व्यवस्था आणि विद्यापीठांची घटती स्वायत्तता यामुळे विद्यार्थी आणि पालक दोघेही प्रचंड तणावाखाली आहेत. अनेक विद्यार्थी दोन-तीन वर्षे प्रवेश परीक्षांची तयारी करतात. पालक आयुष्याची बचत कोचिंगवर खर्च करतात आणि परीक्षा प्रक्रियेतील एखादी त्रुटी त्यांच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह उभे करते. आपण परीक्षा व्यवस्थेवर प्रचंड भर देतो; मात्र शिक्षणाच्या गुणवत्तेवर तितकी चर्चा होताना दिसत नाही.

**धोरण मोठे, अंमलबजावणी कमकुवत**

मोठ्या अपेक्षांसह आणलेल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात बहुविद्याशाखीय शिक्षण, संशोधन आणि जागतिक दर्जाच्या संस्थांची भाषा आहे. मात्र, प्रत्यक्षात अनेक विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकांची पदे रिक्त आहेत. प्रयोगशाळांची अवस्था समाधानकारक नाही. संशोधनासाठी आवश्यक निधी अत्यंत मर्यादित आहे. नियंत्रक आणि महालेखा परीक्षकांच्या विविध अहवालांनी अपुरा निधी, संशोधन अनुदानातील दिरंगाई आणि आर्थिक अनियमिततेकडे वेधले आहे. गुणवत्तेपेक्षा पैशाचे महत्व वाढत असल्याची भावना विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली आहे. त्यामुळेच देशभरातील विद्यार्थ्यांनी 'जंतर-मंतर'चा रस्ता धरला.

**आंदोलनानंतरची खरी जबाबदारी**

या आंदोलनातून विद्यार्थ्यांना ताकद मिळाली असली, तरी आता समाजाचा विश्वास जिंकण्याची जबाबदारी त्यांच्यावर आहे. एका मोर्चाने किंवा आंदोलनाने तो विश्वास मिळत नाही. त्यासाठी सातत्यपूर्ण कार्यक्रम आवश्यक असतो, पालक, शिक्षक, संशोधक, उद्योगक्षेत्र आणि सामान्य नागरिक यांना सोबत



घेऊन शिक्षणातील बदलांची व्यापक चळवळ उभी करावी लागेल. यापुढची पावले अधिक संयमी आणि विधायक असली पाहिजेत. आता केवळ घोषणांपेक्षा धोरणांवर काम करण्याची गरज आहे. सरकारला प्रश्न विचारावे लागतील, पण त्याचबरोबर पर्यायही द्यावे लागतील.

**अभ्यासगटांची गरज**

या आंदोलनाचे रूपांतर आता अभ्यासू चळवळीत व्हायला हवे. त्यासाठी प्रत्येक विद्यापीठात, महाविद्यालयात आणि जिल्हास्तरावर स्वतंत्र विद्यार्थी अभ्यासगट उभे राहणे आवश्यक आहे. हे गट शिक्षण धोरणाचा अभ्यास करतील, परीक्षा पद्धतीतील त्रुटींचे विश्लेषण करतील आणि पर्यायी उपाय सुचवतील. माहितीच्या अधिकाराचा प्रभावी वापर करून विद्यापीठातील रिक्त प्राध्यापक पदे, संशोधनासाठी मिळालेला निधी, विद्यार्थी कल्याण योजनांचा वापर, प्रयोगशाळा, ग्रंथालये आणि वसतिगृहांची स्थिती याबाबत माहिती मागवली जाऊ शकते.

विद्यापीठांची स्वायत्तता पुन्हा केंद्रस्थानी उच्च शिक्षणातील आणखी एक गंभीर प्रश्न म्हणजे विद्यापीठांची घटती स्वायत्तता. कुलगुरूंच्या नियुक्त्या, अभ्यासक्रमातील बदल, निमंत्रित वक्त्यांची निवड अशा अनेक प्रश्नांवर विद्यापीठऐवजी बाह्य दबाव वाढल्याची चर्चा होते. ही परिस्थिती ज्ञानकेंद्रांच्या स्वातंत्र्यासाठी धोकादायक आहे. सिनेट, व्यवस्थापन परिषद आणि इतर प्राधिकरणांचे काम शैक्षणिक धोरण निश्चित करणे असताना, अनेकदा त्यांच्या बैठका गौण वादांत अडकतात. विद्यापीठ म्हणजे मतभेद व्यक्त करण्याची, विचारांची देवाणघेवाण करण्याची आणि ज्ञाननिर्मितीची जागा, त्या जागेतील लोकशाही मजबूत असेल, तरच विद्यार्थ्यांचा आवाज संस्थात्मक पातळीवर पोहोचेल. अनेक वर्षांपासून विद्यार्थी संघटनांच्या निवडणुका नियमित होत नाहीत. त्यामुळे विद्यर्थ्यांचे निवडून आलेले प्रतिनिधीच उरलेले नाहीत, शिक्षणातील लोकशाही पुनर्स्थापित करायची असेल, तर हा प्रश्न टाळून चालणार नाही.

**संशोधनाचे महत्त्व**

उच्च शिक्षणाची खरी ओळख पदव्यांमुळे नव्हे, तर संशोधनामुळे निर्माण होते. आज जग कृत्रिम बुद्धिमत्ता, जैवतंत्रज्ञान, क्वांटम संगणक आणि हरित ऊर्जेसारख्या क्षेत्रांत झपाट्याने पुढे जात आहे.

मात्र, भारतातील अनेक विद्यापीठांमध्ये संशोधनासाठी आवश्यक सुविधा, निधी आणि शैक्षणिक स्वातंत्र्य यांचा अभाव अजूनही जाणवतो. या प्रक्रियेत प्राध्यापक, संशोधक आणि शिक्षणतज्ज्ञ सार्वजनिक चर्चेत अधिक सक्रिय झाले पाहिजेत.

**डिजिटल पिढीची नवी जबाबदारी**

ही जेन झी पिढी माहितीच्या अमर्याद साधनांसह वाढलेली आहे. सोशल मीडिया, डिजिटल प्लॅटफॉर्म आणि मुक्त माहितीची साधने तिच्या हातात आहेत. त्यांचा उपयोग केवळ ट्रेंड तयार करण्यासाठी न करता शिक्षणावरील सार्वजनिक चर्चेसाठी व्हायला हवा. डिजिटल मोहिमा, विद्यार्थी अहवाल, धोरणांचे मसुदे, सार्वजनिक संवाद आणि लोकशाही मार्गाने दबाव निर्माण करणे हीच पुढील टप्प्यातील चळवळ असावी. आंदोलनाने जेन झी पिढी स्वतःच्या हक्कांविषयी जागरूक आहे, हे सिद्ध केले. आता ती अभ्यास करणारी, पर्याय मांडणारी आणि धोरण बदलण्याची क्षमता असलेली पिढी आहे, हे सिद्ध करण्याची वेळ आली आहे. एका मंत्र्याचा राजीनामा ही बातमी होते. पण शिक्षण व्यवस्थेतील बदल हा इतिहास उरतो. आजची जेन झी बातमी निर्माण करून थांबणार की इतिहास घडवणार, हा प्रश्न आता तिच्यासमोर आहे. पुढील पिढयांना अधिक न्यय, पारदर्शक आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणव्यवस्था मिळवून देण्यात अर्थ आहे. इतिहास प्रत्येक पिढीला अशी संधी देत नाही. ही संधी हातातून जाऊ दिली, तर भविष्यातील विद्यार्थ्यांसमोर आपली जबाबदारी

आपण पार पाडली नाही, अशी खंत कायम राहील.(साभार : मटा)

**डॉ. सुनील पाटील**

---

# तरुणांच्या राजकीय आंदोलनात माध्यमांनी निर्णायक भूमिका

सीजेपी, जन आंदोलने, सोशल मिडिया प्लॅटफॉर्म, अमेरिका स्थित, मक्तेदार टेक ऑलिगॉर्क कॉर्पोरेट, दमनकारी शासन यंत्रणा. इत्यादी. कॉक्रोच जनता पार्टीने भारतीय राजकार णाचे आर्किटेक्चर किमान आजतरी बदलले आहे. भविष्यात काय होईल ते काळच ठरवेल. त्यांनी जे काही करून दाखवले त्यात प्रामुख्याने इंस्टाग्राम व इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा निर्णायक हात आहे हे तर सर्वाना माहित आहे. एवढेच नाही तर अलीकडच्या काळात इतर देशात झालेल्या तरुणांच्या राजकीय आंदोलनात देखील याच माध्यमांनी निर्णायक भूमिका अदा केली होती.

विविध प्लॅटफॉर्मच्या जगभरातील वापरकर्त्यांची खालील आकडेवारी पहा;(क्रॉसचेक करण्यासाठी फक्त इंटरनेटवर प्रश्न टाका )

**मेटा प्लॅटफॉर्म - एकाच कॉर्पोरेट ग्रुपच्या मालकीचे**

**इंस्टाग्राम :** दर महिन्याला ३०० कोटी; भारत ४८ कोटी पहिल्या स्थानावर ; अमेरिका १८ कोटी दुसऱ्या स्थानावर

**फेसबुक:** दर महिन्याला ३०० कोटी; दिवसाला २११ कोटी; भारत ५८ कोटी पहिल्या स्थानावर ; अमेरिका २८ कोटी.

**व्हॉटसअप :** ३३० कोटी वापरकर्ते ; २३० कोटी दररोज १५,००० कोटी टेक्स्ट मेसेजेस आणि ७०० कोटी व्हॉइस मेसेजेस पाठवतात ; १८० देशात वापरकर्ते आहेत ; ६० भाषांतून मेसेज पाठवतात.

**गुगल :** ५०० कोटी वापरकर्ते ; दररोज ८०० कोटी सर्चेस केले जातात; अमेरिका पहिल्या ; भारत दुसऱ्या स्थानावर.

**युट्युब:** २७० कोटी वापरकर्ते ; भारतात ४९ कोटी पहिल्या स्थानावर ; अमेरिका २५ कोटी दुसऱ्या स्थानावर ; दररोज १०० कोटी तास युट्युबवर कन्टेन्ट पाहिला जातो ; दररोज ५०० तासांचा ऐवज प्रत्येक मिनिटाला उपलोड केला जातो.

**एक्स / ट्विटर :** ६० कोटी महिन्याला ; अमेरिका पहिल्या स्थानावर आणि भारत दुसऱ्या स्थानावर; याशिवाय अजूनही बरेच प्लॅटफॉर्म्स आहेत.

आकडे महत्वाचे आहेतच. पण हे सत्य अधिक पॉलिटिकली लोडेड आहे की त्या त्या मार्केटमधील ९० टक्के वाटा या कंपन्यांकडे आहे. दुसऱ्या शब्दात त्यांची मक्तेदारी आहे.

आपला मुद्दा वेगळा आहे. त्या त्या देशातील सामाजिक, आर्थिक , राजकीय व्यवस्थेमुळे अनेक शतके कोट्यवधी सामान्य नागरिकांना माहितीपासून, चर्चांच्या/व्यक्त होण्याच्या व्यासपीठांपासून वंचित ठेवले जाते त्याची चर्चा कमी होते.

आता मात्र त्यांच्या कुटुंबातील तरुण पिढीला माहिती मिळवण्याचे, व्यक्त होण्याचे महत्व हजार पटीनी पटले आहे. त्यासाठी ते आधार घेत आहेत सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा;भारतातच नाही तर प्रत्येक देशात ही तरुण पिढी एकविसाव्या शतकाचे भवितव्य ठरवणार आहे. यातील अंतर्विरोध हा आहे की, सोशल मीडिया प्लॅटफॉर्म कंपन्यांची मालकी आणि व्यवस्थापन जगातील सर्वात प्रबळ असणाऱ्या मक्तेदार कॉर्पोरेटकडे आहे. ज्यांना टेक ऑलिगार्क म्हणून संबोधले जाते. या बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वर्ग चारित्र्य सर्वांना माहित आहे. ते जन स्नेही नक्कीच नाही. वरील सर्व कंपन्या अमेरिकन आहेत हे आवर्जून नमूद करूया. या कंपन्या वेगळ्या वगैरे नाहीत. त्या जागतिक कॉर्पोरेट भांडवलशाहीचे नवीन युगातील अवतार आहेत. त्यात भर पडणार आहे महाकाय मक्तेदार आर्टिफिशियल इंटेलिजन्स कंपन्यांची. एआयचे वापरकर्ते वरील प्लॅटफॉर्म्स असणार आहेत. ट्रम्प यांच्या मागा प्रणित फॅसिस्ट राजवटीला दुसऱ्यांदा बहुमताने सत्तेवर आणण्यात या टेक ऑलिगार्कनी भूमिका बजावली असे बर्नी सँडर्स सारखे अनेक विचारवंत राजकीय नेते सार्वजनिक व्यासपीठांवर सांगत असतात.

सोशल मीडिया तंत्रज्ञान असे आहे की, सॉफ्टवेअरची एक ओळ लिहिली की, व्यक्त होणाऱ्याचा आवाज, परस्परांशी संवाद खटकन बंद करू शकते. भविष्यात हे सोशल मिडिया प्लॅटफॉर्म असेच उपलब्ध असतील हे गृहीत धरणे खूप निरागसपण सिद्ध होईल. या कंपन्यांना लोकशाही, मानवी अधिकार, न्याय्य व्यवस्था वगैरेची काहीही पडलेली नाही. ज्यांच्या आधारे त्यांना त्या देशात धंदा करायचा आहे, त्या देशातील राज्यकर्त्यांविरुद्ध ते कधीही जाणार नाहीत.

जागतिक भांडवलशाही मधील अरिष्ट भविष्यात अधिक गंभीर बनेल, त्याप्रमाणात विविध जनआंदोलनांची संख्या वाढू शकते, त्यांची सोशल मिडिया प्लॅट फॉर्मवरचे म्हणजे अमेरिकेच्या, मक्तेदार टेक ऑलिगॉर्क कॉर्पोरेटवरचे अवलंबित्व वाढणार मोठ्या पटावर चित्र बघितले की गंभीरपणा लक्षात येतो. भविष्यात शासन विरोधी जनआंदोलनासाठी हा चोक पॉइंट सिद्ध होऊ शकतो. चोक पॉईंटचा प्रभावीपणा पर्याय उपलब्ध नसणे, मक्तेदारी असणे याच्याशी असतो हे आपण बघतच आहोत. हॉर्मुझ चोक पॉईंट होऊ शकतो हे युद्ध सुरु होईपर्यंत अमेरिकेच्या पेंटेगॉनच्या लक्षात आले नव्हते आणि त्याचा प्रभावी अस्त्र म्हणून उपयोग होऊ शकतो हे इराणच्या! यावर उपाय काय याच्या चर्चा होत राहतील. पण उपाय माहित असणे हे प्रॉब्लेम स्टेटमेंट करण्यासाठी पूर्वअट आहे असे मानत नाही. किंबहुना प्रॉब्लेमबद्दल/जमिनी सत्यांबद्दल जेवढी स्पष्टता जास्त तेवढी अधिक प्रभावी उपाययोजना शोधून काढता येते.

**संजीव चांदोरकर**

---

# जेन झी आंदोलनातून सत्ता बदल होणे अवघड?

जेन झी आंदोलनातून सत्ता बदल होणे अवघड आहे असे मला का वाटते?

१. जेन झी आणि त्यांच्या आसपासचे कोण आहेत?

स्वातंत्र्य मिळाल्यावर अनेक वर्षे शालेय शिक्षण दुर्लक्षित राहिले. १९९१ मध्ये सोवियत युनियन कोसळले. पूर्वी कम्युनिस्ट असलेले देश मार्किट ओरिएंटेड व्यवस्थेला एडजस्ट करू पहात होते. चिन सुद्धा मार्केट अर्थव्यवस्था आत्मसात करत होता. आर्थिक विकासाच्या चिंतनात ह्या काळात मूलभूत फरक पडला. खुले बाजार, खास करून आंतरराष्ट्रीय भांडवली प्रवाहाना खुली बाजारपेठ, मुक्त व्याज दर आणि विनिमय दर, स्पर्धा, आर्थिक व्यवस्थापनात सरकारचा किमान, फक्त अंपायर म्हणून भूमिका, हे विकास धोरणाचे आधारस्थंब मानले जाऊ लागले. गरीब राष्ट्रात गुंतवणूक करून, तिथे माल बनवून जगभर विकायचा असेल तर गरीब राष्ट्रातील कामगार अडाणी, कमजोर असून चालणार नव्हते. मग मानवी विकास ही संकल्पना उगवली. हे प्रतिमान यूएनडीपी ने मांडले. विकसनशील देश प्राथमिक शिक्षणात गुंतवणूक करू लागले, कारण जगभर हेच प्रतिमान स्वीकारले गेले होते. भारत सरकारने सुद्धा २००० च्या दशकांत सर्व शिक्षा अभियान आणले. शाळेतील भरतीचे प्रमाण वाढवले, गळती कमी केली. ह्यात खूप मोठ्या प्रमाणात मुले शिक्षण व्यवस्थेत पहिल्यांदा आली. वयोमाना परस्त्वे ही मुले आता महाविद्यालयीन शिक्षणा पर्यंत आली आहेत. ह्यातील खूप मुले बहुजन समाजातील, फर्स्ट जनरेशन लर्नर्स आहेत.

२. शिक्षण व्यवस्थेचा संख्यात्मक विकास झाला पण गुणात्मक झाला नाही. शिक्षण हा राज्य आणि केंद्र शासनाचा सामायिक विषय. इथे गवर्नेंस चे खूप प्रश्न आले, प्रयोग झाले, धरसोड झाली. वित्तीय गुंतवणूक खूप कमी प्रमाणात झाली. उच्च शिक्षणात यू जी सी द्वारे अति केंद्रीकरण झाल्या मुळे उंटावरून शेळ्या हाकल्या गेल्या. त्यात नवीन शैक्षणिक धोरणाने ह्या गोंधळात अधिकच भर घातली. सोयी, मनुष्यबळ वाढले नाही. आहेत त्या सोयी मध्ये आणि घटत्या मनुष्य बळामुळे नवीन शैक्षणिक धोरण फक्त कागदोपत्री राहिले. शिक्षक कागद भरण्यात बिझी असतात. त्यातच संघाच्या हडतक्षेपा मुळे निरर्थक कोर्सेसची बजबाजपुरी झाली. एकूणच दर्जा घसरला. खास करून स्किल डेवलपमेंट दुर्लक्षित राहिले. शिक्षणाचा आणि रोजगाराचा आधीच कमकुवत असलेला सांधा पूर्ण निखळला. केंद्र सरकारने आणि विविध राज्य सरकारने सुरू केलेल्या इंटर्नशिप योजना कागदावर राहिल्या किंवा बंद झाल्या.

३. सुस्पष्ट दीर्घ कालीन आर्थिक धोरण नसल्या मुळे २०१४ पासून अर्थव्यवस्थेतील गुंतवणूक कमी झाली. २०१० पूर्वी जी डी पी च्या २७ टक्क्या वर पोहोचलेली खाजगी गुंतवणूक गेली काही वर्षे १२ टक्क्यांवर अडकली आहे. परकीय गुंतवणूक जवळ जवळ बंद झाली आहे. गुंतवणूक झाली नाही की रोजगार तयार होत नाही. भारत सरकार डिफेन्स, फार्मा वगैरे सेक्टर वर भर देत आहे पण ह्यातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होत नाही. आज बहुतेक सगळी गुंतवणूक शासन करते आहे. ही महामार्ग, पूल, डिफेन्स ह्यात सिमित आहे.

गुंतवणूक नसल्या मुळे रोजगार नाही. २०१२ पूर्वी वर्षाला सरासरी ७० लाख बिगर कृषी रोजगार निर्माण होत होते ते प्रमाण आता २८ लाखावर आले आहे. म्हणून लोकांचे, विशेषतः महिलांचे शेतीत पडेल तो रोजगार करण्याचे प्रमाण वाढले आहे. शेतीवर अवलंबून असलेल्या जनतेचे प्रमाण कमी व्हायला हवे ते वाढते आहे.

४. एकीकडे चांगले शिक्षण नाही आणि दुसरीकडे रोजगाराच्या खूप कमी संधी अश्या कचाट्यात ही तरुणाई अडकली आहे.

५. ह्या परिस्थितीला तरुणाई त्यांच्या जात-वर्गीय परिस्थिती प्रमाणे प्रतिसाद देत आहेत. काही तरुण व्यवस्थेला प्रश्न विचारू लागले आहेत. जंतर मंतर आंदोलनाचे हे मोठे यश आहे. ह्या तरुणाईला आंदोलनाने एकत्र आणले आणि प्लेटफॉर्म दिला. पण तरुणाईचा एक मोठा भाग आधीच व्यवस्थेने बिझी करून ठेवला आहे. हे सगळे व्यवस्थेसाठी काम करतील, त्यांना त्यात वैयक्तिक फुलफिल्लमेंट मिळेल, मनाला सुखविणारे नरेटिव मिळेल , समविचारी लोकांचे नेटवर्क मिळेल, स्वतः ला नैतिक मूल्य देता येईल अशी सोय व्यवस्थेने केली आहे. ह्यांच्या मानसिक आणि भौतिक गरजा व्यवस्था भागविते. कावडिया तरुण, धारकरी तरुण, ज्योत घेऊन धावणारे तरुण, गणपती, गोविंदत बेभान होणारे तरुण, गावो गावी गल्लीतील पुढाऱ्यांच्या फ्लेक्सवर झळकणारे तरुण, बैलगाडा शर्यत, कुत्र्यांची शर्यत ह्यात बिझी तरुण हेच आहेत. दलित आणि आदिवासी मुलांमध्ये सुद्धा हे मोठ्या प्रमाणात झालेले आहे.

६. प्रश्न विचारणारे तरुण असंघटित आहेत. जंतर मंतर चे आंदोलन उत्स्फूर्त होते. मी सुरवातीच्या दिवसांत गेलो होतो तेंव्हा फक्त डाव्या संघटनांचे विद्यार्थी तिथे होते. नंतर सोनम वांगचुक ह्यांचे उपोषण जसे पुढे गेले तसे तरुणाई तिथे पोहोचायला लागली. पण ह्याला स्ट्रक्चर नव्हते. कोणत्याही संघटित स्ट्रेटेजी चा हा भाग नव्हता. ह्या उलट धारकरी, कावडिया, विविध धर्म रक्षक, गो रक्षक, सनातनी, जनआक्रोश मोर्चा वाले, सगळे एका प्रचंड मोठ्या संघटित यंत्रणेचे सैनिक आहेत. त्यांना सातत्याने कार्यक्रम दिले जातात. तशी संघटना डाव्या पक्षाकडे आहे, पण तुलनेने खूप लहान आहे. छात्रो की गुंज मधून राहुल गांधी शिस्तबद्ध प्रकारे अधिक प्रमाणात जोडून घेण्याचा प्रयत्न करत आहेत . ह्या प्रयत्नाला किती यश येते हे आताच सांगता येणार नाही.

७. निवडणूक तीन वर्षावर आहे. निवडणूक जवळ आली की अश्या घटना घडतात की माहौल सरकारच्या बाजूने होतो. तिथे वर उल्लेखिलेले संघटित गट खूप उपयोगी पडतात. वातावरण तेंव्हा सरकार विरोधी व्हायचे असेल तर विरोधी ताकदीना संघटित काम करावे लागेल. पण मुळात कॉक्रोच हा संघटित पक्ष नाहीये. त्यातील बरेचसे तरुण स्वतःला अराजकीय मानतात. निवडणुकीत राजकीय पक्षांसाठी काम करावे लागते. तसे करायचे असेल तर संघटन बांधून ते टिकवावे लागेल. सतत कार्यक्रम द्यावे लागतील. त्यासाठी संसाधने उभी करावी लागतील. निवडणुकीचे काम वेगळे आणि उत्स्फूर्त आंदोलनाचे काम वेगळे. जर कॉक्रोच जनता पार्टी राजकीय पक्ष म्हणून पुढे आली ( राजकीय पक्ष झालो की इनोसन्स लॉस्ट गृहीत धरले पाहिजे)तर काय होईल हे आता सांगणे कठीण आहे.

८. सध्या दीर्घकालीन संघटित राजकीय पर्याय म्हणून कांग्रेस आणि डावे पक्ष एवढाच पर्याय दिसतो आहे. हा पर्याय पूर्वी सुद्धा होता. आताच्या आंदोलनाचा ह्यांना फायदा नक्की होईल, पण तो किती टिकेल हे सांगता येत नाही. राजकारणात ३ वर्षे हा खूप मोठा काळ आहे.

९. ह्याचा अर्थ ह्या आंदोलनाला मी कमी लेखतो असा नाही. स्वतंत्र भारताच्या इतिहासात हे महत्त्वाचे पान आहे. ह्या आंदोलनाचे मराठी माध्यमानी फार वर वरचे विश्लेषण केले आहे. ते अधिक सखोल पणाने समजून घेणे आवश्यक आहे. मी फक्त ह्यातील व्यवस्था बदलाच्या मर्यादा विषयी बोलतो आहे.

**नीरज हातेकर**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्य

# जनुना गावात जल जीवन मिशनचा लाखो रुपयांचा निधी हवेत?

## चार वर्षांपासून काम रखडले रस्ते उखडून नागरिकांना चिखलातून प्रवास..

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**महागाव, दि. ४ :** महागाव : तालुक्यातील गट ग्रामपंचायत आमणी (खुर्द) अंतर्गत जनुना गावात जल जीवन मिशन योजनेअंतर्गत शुद्ध पिण्याच्या पाण्याच्या सुविधेसाठी मंजूर करण्यात आलेल्या कामाला तब्बल चार वर्षे उलटूनही पूर्णत्व आले नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

यामुळे गावातील नागरिकांना आजही शुद्ध पिण्याच्या पाण्यापासून वंचित राहावे लागत असून, उखडलेल्या रस्त्यांमुळे चिखलातून ये-जा करण्याची वेळ आल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.ग्रामस्थांच्या माहितीनुसार,२१ ऑगस्ट २०२२ रोजी झालेल्या ग्रामसभेनंतर जल जीवन मिशन अंतर्गत गावासाठी उंच पाण्याची टाकी,



पाईपलाईन आणि नळयोजनेसाठी शासनाने लाखो रुपयांचा निधी मंजूर केला होता. मात्र, २०२६ साल सुरू असतानाही काम पूर्ण झाले नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, योजनेच्या कामासाठी गावातील सिमेंट काँक्रीट रस्ते खोदून पाईपलाईन टाकण्यात आली; मात्र त्यानंतर काम अर्धवट अवस्थेतच सोडण्यात आले. परिणामी सलग तीन पावसाळ्यांपासून गावातील रस्त्यांवर चिखलाचे साम्राज्य असून शाळकरी मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच रुग्णांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. जल जीवन मिशनचे काम रखडल्यामुळे गावकऱ्यांना अद्याप शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध झालेली नाही. तसेच मंजूर निधीचा अपव्यय अथवा गैरव्यवहार झाल्याची चर्चा गावात सुरू असून, या आरोपांची निष्पक्ष चौकशी



करून सत्य समोर आणावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. या आरोपांची अधिकृत पुष्टी झालेली नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. ग्रामस्थांनी जिल्हा प्रशासन, संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी तातडीने जनुना गावाची प्रत्यक्ष पाहणी करून कामाची सखोल चौकशी करावी, दोषी आढळणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी तसेच रखडलेले जल जीवन मिशनचे काम तातडीने पूर्ण करून गावकऱ्यांना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी केली आहे.दरम्यान गेल्या अनेक वर्षांपासून गावातील रस्ते, नाल्या, स्वच्छता आणि पाणीपुरवठा या मूलभूत सुविधांचा विकास का रखडला आहे? याला जबाबदार कोण? असा सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला असून, याबाबत प्रशासनाने स्पष्ट भूमिका घेऊन नागरिकांना उत्तर द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# शाळा व महाविद्यालय परीसरातील पानटपऱ्या आणि दुकानांवर धडक कारवाई.!

## १०० मीटर हद्दीतील दुकानावर कारवाई..

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. ४ :** तालुक्यातील विदयार्थ्यांचे आरोग्य सुरक्षित रहावे. आणि शाळा महाविदयालयांच्या परीसरात निर्भय व शांततापूर्ण वातावरण निर्माण व्हावे या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने नशामुक्त शाळा व महाविदयालय परीसरात मोहीम राबविण्यात आलेली आहे.त्याअनुषंगाने पोलिस अधिक्षक,यवतमाळ यांनी सदर मोहीम राबवून नशामुक्त शाळा व महाविदयालय करण्याबाबत आदेशीत केले होते.

त्याअनुषंगाने पोलिस स्टेशन पुसद ग्रामिण कडून दि. ०१/०८/२०२६ ते ०३/०८/२०२६ रोजी एक विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहीम अंतर्गत ग्रामीण भागातील यामध्ये धनसळ, चोंढी, कारलादेव, वनोली,





येरंडा, वनवार्ला येथील शाळा व महाविदयालय परीसराच्या १०० मीटर हद्दीत असलेल्या एकूण १८ पानटप-या व ईतर दुकाने पोलिसांनी धडक कारवाई करून हटविण्यात आले असून या मोहीमेमध्ये स्थानिक जनतेनी उत्स्फुर्त सहभाग नोंदवून सहकार्य केले. तसेच विदयार्थ्यांना नशा करू नये. व कोणीही शाळा महाविदयालयाचे परीसरात नशेली पदार्थ विक्री करू नये याबाबत आव्हान करण्यात आले. सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक यवतमाळ कुमार चिंता,सा.अप्पर पोलीस अधिक्षक यवतमाळ अशोक थोरात सा.,यांचे मार्गदर्शनात तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी, पुसद अमर मोहीते यांचे नेतृत्वात ठाणेदार आशिष चौधरी, पोउपनि राहूल देशमूख, रवि चव्हाण, पुंडलिक वानखेडे, सफौ मसूद शेख, पोहेकॉ रविंद्र गावंडे, विनायक चव्हाण, दिनेश आडें, संदेश पवार, संदिप आडे, पोअ/मारोती मदणे, केशव मुंढे, इत्यादी पो.स्टे. पुसद ग्रामिण अधिकारी व कर्मचारी यांनी यशस्वीरीत्या पार पाडली असून भविष्यात सूध्दा अशीच मोहीम राबविण्यात येणार आहे.

# कार्यालयीन वेळ संपण्यापूर्वीच पंचायत समिती रिकामी..!

## दिग्रस पंचायत समितीतील 'दांडीबहाद्दर' कारभाराचा पर्दाफाश!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

✦ अशोक जाधव

**दिग्रस, दि. ४ :** दिग्रस पंचायत समितीतील कर्मचाऱ्यांच्या बेशिस्त कारभारामुळे सर्वसामान्य नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागत असल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. शासनाने कार्यालयीन वेळ सकाळी ९.३० ते सायंकाळी ६.३० अशी निश्चित केली असतानाही, मंगळवार (दि. ४ ऑगस्ट २०२६) रोजी सायंकाळी ५.४९ व ५.५० वाजता टिपण्यात आलेल्या छायाचित्रांमध्ये पंचायत समितीतील अनेक विभाग पूर्णपणे रिकामे दिसून आले.

संबंधित छायाचित्रांमध्ये वेळ आणि GPS लोकेशनचाही पुरावा असल्याचा दावा करण्यात आला आहे. कार्यालय बंद होण्यास तब्बल ४० मिनिटे शिल्लक असतानाच अनेक कर्मचारी अनुपस्थित असल्याने



ग्रामीण भागातून विविध कामांसाठी आलेल्या नागरिकांना रिकाम्या हाताने परत जावे लागल्याचे सांगितले जात आहे. दाखले, विविध शासकीय योजना, अनुदान प्रस्ताव व इतर प्रशासकीय कामे वेळेवर होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.स्थानिक नागरिकांच्या मते,शासनाचा पगार पूर्ण वेळ काम करण्यासाठी दिला जातो. मग कार्यालयीन वेळ संपण्यापूर्वीच कर्मचारी निघून जात असतील, तर सर्वसामान्यांनी न्याय कुणाकडे मागायचा? हा प्रकार थांबवून दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे.नागरिकांनी वेळेवर हजर न राहणाऱ्या तसेच कार्यालयीन वेळेपूर्वीच निघून जाणाऱ्या कर्मचाऱ्यांचे वेतन कपात करून शिस्तभंगाची कारवाई करण्याची मागणी केली आहे. अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे. दिग्रसचे गटविकास अधिकारी (BDO) आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) यांनी मागील वर्षभरापासून सुरू असलेल्या या कारभाराची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधितांवर कारवाई करणार का? असा थेट सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

# झरी-जामणीत क्रीडा संकुलासाठी रस्ता रोको..!

## आंदोलनाच्या दबावानंतर प्रशासन नमले,आयुक्तांकडे प्रस्ताव पाठविण्याचे आश्वासन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**झरी, दि. ४ :** तालुक्याच्या मुख्यालयात क्रीडा संकुल उभारण्याच्या प्रलंबित मागणीसाठी अखेर नागरिकांनी रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडले. सोमवारी क्रीडा संकुल बचाव समितीच्या वतीने झरी-जामणी येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. आंदोलनाच्या दबावानंतर प्रशासनाने मुख्यालयातील क्रीडा अंगणासाठी आयुक्तांकडे प्रस्ताव पाठविण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलनाची सांगता करण्यात आली.

रस्ता रोकोनंतर आंदोलनकर्त्यांनी तहसील कार्यालयावर मोर्चा काढत प्रशासनाला जाब विचारला. तहसीलदारांच्या दालनात जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीला माजी आमदार संजीवरेड्डी बोतकुलवर उपस्थित होते. बैठकीत झरी-जामणी नगरपंचायत मुख्यालयासाठी क्रीडा अंगण



मंजूर करण्याचा प्रस्ताव तातडीने आयुक्तांकडे पाठवून सकारात्मक पाठपुरावा केला जाईल, अशी ग्वाही जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांनी दिली. तालुक्याचे क्रीडा संकुल झरी-जामणी येथेच उभारावे, या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने लढा देत आहेत. यापूर्वीही उपोषणानंतर प्रशासनाने क्रीडा संकुल झरी-जामणी येथेच उभारण्यात येईल तसेच सातबारा तयार करण्याची प्रक्रिया सुरू केली जाईल, असे लेखी आश्वासन दिले होते. मात्र प्रत्यक्षात कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली होती. बैठकीत पाटण ग्रामपंचायतीतील क्रीडा संकुलाचा आणि झरी-जामणी मुख्यालयातील प्रस्तावित क्रीडा संकुलाचा कोणताही संबंध नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. पाटणचा विषय स्वतंत्र असून तालुक्याचे मुख्यालयीन क्रीडा संकुल झरी-जामणी येथेच उभारले जाईल, असेही अधिकाऱ्यांनी सांगितले. प्रशासनाच्या नव्या आश्वासनामुळे आंदोलन तात्पुरते मागे घेण्यात आले असले, तरी आता केवळ आश्वासन नव्हे तर आयुक्तांकडून प्रस्तावास मंजुरी मिळवून प्रत्यक्ष कामाला सुरुवात होते का, याकडे संपूर्ण झरी-जामणी तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## थोडक्यात

### आसेगावदेवी शिवारात वाघाचे पगमार्क आढळले..!

**नागरिकांनी सतर्क राहण्याचे ग्रामपंचायतीचे आवाहन**

**बाबुळगाव :** आसेगावदेवी (ता. बाभुळगाव, जि. यवतमाळ) आसेगाव



देवी शिवारातील मंगेश नगराळे व शुभम लुणावत यांच्या शेत परिसरात वाघाचे पगमार्क (पावलांचे ठसे) आढळून आले आहेत. या घटनेमुळे परिसरातील शेतकरी व नागरिकांमध्ये खबरदारीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायत आसेगाव देवी यांच्या वतीने सर्व ग्रामस्थांना व शेतकऱ्यांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे. शेतात जाताना शक्यतो एकटे न जाता समूहाने जावे, पहाटे व सायंकाळच्या वेळेत अनावश्यकपणे शेतात जाणे टाळावे, तसेच लहान मुलांना एकटे बाहेर पाठवू नये.

वाघ अथवा इतर वन्यप्राण्याचे दर्शन झाल्यास किंवा नवीन पगमार्क आढळल्यास त्याच्या जवळ जाण्याचा किंवा छायाचित्र काढण्यासाठी गर्दी करण्याचा प्रयत्न करू नये. तात्काळ वन विभाग, ग्रामपंचायत किंवा स्थानिक प्रशासनाला माहिती द्यावी.ग्रामपंचायतीने नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवता संयम बाळगण्याचे आणि प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.



### संघटनेच्या बळावर शिक्षकांचे प्रश्न सुटतील,दिलीप कडूंना विजयी करा — आमदार सुधाकर अडबाले यांचे आवाहन

**राळेगाव :** अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रचाराला वेग आला असून विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ व मित्र संघटनेचे अधिकृत उमेदवार दिलीप भीमराव कडू यांच्या प्रचारार्थ सोमवारी राळेगाव येथील न्यू इंग्लिश हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षकांची सभा झाली. यावेळी शिक्षक आमदार सुधाकरराव अडबाले यांनी "संघटनेशिवाय पर्याय नाही" असे सांगत दिलीप कडूंना विजयी करण्याचे भावनिक आवाहन केले. कार्यक्रमात माजी शिक्षक आमदार व्ही. यू. डायगव्हाणे, उमेदवार दिलीप कडू, तसेच संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. प्रास्ताविकात दिलीप कडू यांनी संघटनेच्या कार्याचा आढावा घेत शिक्षकांनी प्रथम पसंतीचे मतदान करण्याचे आवाहन केले. अध्यक्षीय भाषणात अडबाले यांनी १९४६ पासून संघटनेने शिक्षकांच्या हक्कांसाठी सातत्याने लढा दिल्याचे सांगत, शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांच्या प्रभावी मांडणीसाठी विधानभवनात सक्षम प्रतिनिधित्व आवश्यक असल्याचे नमूद केले. सभेपूर्वी मान्यवरांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेश काळे यांनी, तर आभार प्रदर्शन गोपाल बुरले यांनी केले. शिक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत सहकार्याची ग्वाही दिली.

# संस्कार भारतीच्या नटराज पूजनात ज्येष्ठ रंगकर्मी डॉ. दिलीप अलोणे यांचा गौरव

## गुरुपौर्णिमेचे औचित्य साधत कला-संस्कृतीचा जागर; नव्या कार्यकारिणीचीही घोषणा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ४ :** संस्कार भारती आणि प्र.मा. रुईकर ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने आयोजित नटराज पूजन सोहळा कला, संस्कृती आणि परंपरेचा संगम ठरला. स्थानिक आयुर्वेद महाविद्यालयात झालेल्या या कार्यक्रमात वणी येथील ज्येष्ठ रंगकर्मी प्रा.डॉ.दिलीप अलोणे यांच्या प्रदीर्घ कलासाधनेचा स्मृतीचिन्ह व मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

दीपप्रज्वलन, नटराज पूजन, लोकमान्य टिळक व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमांना अभिवादन तसेच ध्येयगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. शांभवी पांडे व आस्था देशमुख यांच्या गणेशवंदनेनंतर अनन्या थेटे व लोकेश मडावी यांनी सादर केलेल्या शिवतांडव नृत्याने उपस्थितांची दाद मिळवली.




सन्मानाला उत्तर देताना डॉ. अलोणे म्हणाले,खरा कलावंत आयुष्यभर कलेची उपासना करतो. कला समाजातील वेदना समजून घेण्याची आणि संवेदनशीलता जपण्याची प्रेरणा देते. प्रांत सहमहामंत्री गजानन रानडे यांनी संस्कार भारतीच्या विविध सांस्कृतिक उपक्रमांची माहिती देत भारतीय संस्कृती जतन करण्याचे आवाहन केले. यावेळी डॉ. ललिता घोडे यांच्या पुढाकारातून आयोजित 'आषाढस्य प्रथम दिवसे' निबंध स्पर्धेतील विजेत्यांचा सत्कार करण्यात आला. प्रथम क्रमांक स्वप्ना पावडे (वणी), द्वितीय प्रज्ञा बापट आणि तृतीय प्रलय टिप्रमवार यांनी पटकावला. कार्यक्रमात संस्कार भारती, यवतमाळच्या नव्या कार्यकारिणीची घोषणाही करण्यात आली. डॉ. माणिक मेहरे यांची शाखाध्यक्ष तर निशिकांत थेटे यांची मंत्रीपदी निवड जाहीर करण्यात आली. विविध कला विभागांच्या संयोजकांचीही नियुक्ती करण्यात आली. कार्यक्रमाला प्र. मा.रुईकर ट्रस्टचे पदाधिकारी, आयुर्वेद महाविद्यालयाचे प्रतिनिधी, विदर्भ प्रांतातील संस्कार भारतीचे पदाधिकारी, साहित्य, रंगभूमी, नृत्य व दृश्यकला क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# पुरवठा विभागाचा कारभार ठप्प..! निरीक्षकांच्या दांड्यांमुळे नागरिक हैराण

## शैक्षणिक प्रवेशासाठी रेशनकार्ड, उत्पन्न दाखल्यांची कामे रखडली..

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ४ :** यवतमाळ तहसील कार्यालयातील पुरवठा विभागाचा कारभार सध्या पूर्णपणे विस्कळीत झाल्याचे चित्र असून, पुरवठा निरीक्षकांच्या सातत्याने होत असलेल्या गैरहजेरीमुळे नागरिकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. शैक्षणिक प्रवेशाचा हंगाम सुरू असल्याने उत्पन्नाचे दाखले, रेशनकार्ड दुरुस्ती व अन्य पुरवठा विभागाशी संबंधित कामांसाठी दररोज ग्रामीण व शहरी भागातील नागरिक तहसील कार्यालयात येत आहेत.

मात्र संबंधित अधिकारी आणि कर्मचारी वेळेवर उपलब्ध नसल्याने अनेकांची कामे दिवसन्दिवस प्रलंबित राहत आहेत. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, सलग



अनेक दिवस कार्यालयात चकरा मारूनही संबंधित अधिकारी भेटत नसल्याने विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेवर परिणाम होण्याची भीती निर्माण झाली आहे. प्रवेशाची अंतिम मुदत जवळ येत असताना आवश्यक कागदपत्रे वेळेत मिळत नसल्याने पालकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. पुरवठा विभागावर प्रभावी नियंत्रणाचा अभाव असल्याने शेकडो अर्ज प्रलंबित पडले असून, दुर्गम भागातून येणाऱ्या नागरिकांचा वेळ, पैसा आणि श्रम वाया जात आहेत. नागरिकांनी जिल्हाधिकारी, जिल्हा पुरवठा अधिकारी आणि तहसीलदार यांनी या प्रकाराची तातडीने दखल घेऊन कर्तव्यचुकार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी तसेच पर्यायी व्यवस्था करून प्रलंबित कामे तातडीने मार्गी लावावीत, अशी जोरदार मागणी केली आहे.

# दारूमाफियांना अभय कोणाचे? वणीतील अवैध दारूविक्रीवर हल्लाबोल

## अधिकाऱ्यांवर आर्थिक संगनमत निष्पक्ष चौकशी, अन्यथा प्रहाराचा आंदोलनाचा इशारा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**वणी, दि. ४ :** वणी तालुक्यात कथितपणे सुरू असलेल्या अवैध दारूविक्रीच्या मुद्द्यावर प्रहार जनशक्ती पक्षाने आक्रमक भूमिका घेत राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधीक्षकांकडे धडक देत निष्पक्ष चौकशीची मागणी केली आहे.

संबंधित अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, आरोप सिद्ध झाल्यास तात्काळ निलंबनासह कठोर शिस्तभंगाची कारवाई करण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली. प्रहार जनशक्ती पक्षाच्या म्हणण्यानुसार, वणी शहरासह तालुक्यात अनेक ठिकाणी अवैध दारूविक्री सर्रास सुरू



असून त्यावर प्रभावी कारवाई होत नसल्यामुळे प्रशासनाच्या भूमिकेबाबत संशय निर्माण झाला आहे. काही अधिकाऱ्यांचे अवैध धंदे करणाऱ्यांशी कथित आर्थिक संगनमत असल्याचा गंभीर आरोपही निवेदनात करण्यात आला असून, संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय व पारदर्शक चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. आरोपांमध्ये तथ्य नसेल तर ते चौकशीत स्पष्ट होईल; मात्र आरोप सिद्ध झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर तातडीने निलंबन करून कठोर कारवाई झालीच पाहिजे," अशी ठाम भूमिका प्रहार जनशक्ती पक्षाने मांडली आहे. दरम्यान, प्रशासनाने निवेदनाची दखल घेत अवैध दारूविक्रीवर तात्काळ अंकुश आणावा, अन्यथा प्रहार जनशक्ती पक्ष रस्त्यावर उतरून उग्र लोकआंदोलन छेडेल, असा इशाराही पदाधिकाऱ्यांनी दिला. या आंदोलनाची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील, असे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी विधानसभा अध्यक्ष देरकर, प्रहार शेतकरी संघटनेचे अध्यक्ष रघुवीर कारेकर, धनराज भलामे, रशीद शेख, तबरेज सिद्दीकी, मंगेश मडावी यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते. या निवेदनानंतर वणी तालुक्यात राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले असून, राज्य उत्पादन शुल्क विभाग यावर कोणती भूमिका घेतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# सायबर फ्रॉडसाठी बँक खाती पुरविणाऱ्या तिघांना अटक..!

## यवतमाळ पोलिसांची मोठी कारवाई!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ४ :** सायबर गुन्हेगारांना बँक खाती उपलब्ध करून देत देशभरातील नागरिकांची फसवणूक करणाऱ्या रॅकेटवर यवतमाळ शहर पोलिसांनी मोठी कारवाई करत तिघा आरोपींना अटक केली आहे.

या कारवाईमुळे सायबर फसवणुकीच्या साखळीचा महत्त्वाचा दुवा उघडकीस आला असून आणखी आरोपींचा शोध सुरू आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी च्या तक्रारीवरून तपास सुरू करण्यात आला. तपासादरम्यान आरोपींनी बँक खाते आणि मोबाईल क्रमांक सायबर गुन्हेगारांना वापरण्यास दिल्याचे निष्पन्न झाले. या खात्यांद्वारे देशातील सहा नागरिकांची तब्बल ६ लाख ९३ हजार रुपयांची ऑनलाइन फसवणूक



रत्नपाल कांबळे



आदित्य लांजेवार



राहुल खंडारे

करण्यात आल्याचे उघड झाले. या प्रकरणात रत्नपाल उर्फ रतन जनार्दन कांबळे, राहुल गजानन खंडारे आणि आदित्य मधुकर लांजेवार यांना अटक करण्यात आली. यातील मुख्य सूत्रधाराने खाते राजस्थानमधील व्यक्तीला विकल्याची माहितीही तपासात समोर आली आहे. आरोपी काही काळ फरार होते. तांत्रिक तपास, गोपनीय माहिती आणि विविध राज्यांत शोधमोहीम राबवत पोलिसांनी त्यांना जेरबंद केले. पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली यवतमाळ शहर पोलिसांनी ही कारवाई केली. नागरिकांनी कोणत्याही व्यक्तीला बँक खाते, एटीएम कार्ड, मोबाईल क्रमांक किंवा ओटीपी वापरण्यास देऊ नये, अन्यथा कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागू शकते, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# पुणे पोलिसांचे आर्णीत धाडसत्र

**आर्णी, दि. ४ :** पुण्यातील एका गाजत असलेल्या चोरी प्रकरणाच्या तपासाचे धागेदोरे आता आर्णी शहरापर्यंत पोहोचले असून पुणे पोलिसांच्या विशेष पथकाने शहरात धडक देऊन मोठी कारवाई केली.या कारवाईत एका संशयित ज्वेलर्स दुकानाची कसून झडती घेण्यात आल्याने शहरात प्रचंड खळबळ उडाली आहे. तपासादरम्यान नाईक नगर (हेटी) येथील संशयित युवक सचिन याला पुणे पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेऊन आर्णीत आणले. मिळालेल्या माहितीनुसार, याच प्रकरणात त्याच्या पत्नीला पुणे पोलिसांनी यापूर्वीच अटक केली आहे. चोरीतील मुद्देमालाची विल्हेवाट, आरोपींचे स्थानिक संपर्क आणि संशयित आर्थिक व्यवहार उघड करण्याच्या दृष्टीने ही कारवाई करण्यात आल्याची माहिती आहे. या धाडसत्रात आर्णी पोलिस ठाण्याचे कर्मचारीही बंदोबस्तासाठी सहभागी झाले होते.

# जिल्ह्यातील १०० अंगणवाड्या होणार स्मार्ट

## सीईओ सत्यम गांधी यांची संकल्पना

**अमरावती/का.प्र.**

जिल्हा परिषदेचे सीईओ सत्यम गांधी यांच्या संकल्पनेतून महिला व बाल विकास विभागामार्फत जिल्ह्यातील एकूण २,५९२ अंगणवाड्यांपैकी १०० अंगणवाड्यांची 'मॉडेल' अंगणवाडी' म्हणून निवड करण्यात आली आहे. या अंगणवाड्यांमध्ये बालकांसाठी अधिक दर्जेदार पूर्वप्राथमिक शिक्षण, आकर्षक व बालमैत्री वातावरण, शैक्षणिक साहित्य, स्वच्छता, पोषण आणि आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाणार आहे.

जिल्ह्यात २५९२ अंगणवाडी केंद्र कार्यरत असून तेथे मोठ्या प्रमाणात चिमुकले पूर्व प्राथमिक शिक्षणासह आहारात घेतात. ही सर्व अंगणवाडी केंद्रे स्मार्ट व्हावी, त्यांना चांगल्या दर्जाच्या सुविधा मिळाव्यात याकरिता सीईओ सत्यम गांधी यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यात पहिल्या टप्प्यात शंभर अंगणवाडी केंद्रे मॉडेल बनविण्याचा उपक्रम जिल्ह्यात सुरू केले आहे. जिल्ह्यातील १४ बालविकास प्रकल्पांमधून या १०० मॉडेल अंगणवाड्यांची निवड करण्यात आली आहे. त्यामध्ये चांदूर बाजार तालुक्यातील ८, मोर्शी ७, नांदगाव खंडेश्वर ८, वरूड ७, भातकुली ८, चांदूर रेल्वे ७, अंजनगाव सुर्जी, ७, अमरावती ८, धारणी ७, अचलपूर ७, दर्यापूर ७, तिवसा ७, धामणगाव रेल्वे ७ व चिखलदरा तालुक्यातील ५ अशा १०० अंगणवाडी केंद्रांची निवड करण्यात आली आहे. या मॉडेल अंगणवाड्यांमुळे ग्रामीण भागातील बालकांना दर्जेदार पूर्वप्राथमिक शिक्षणासह पोषण, आरोग्य आणि सर्वांगीण विकासासाठी अधिक सक्षम सुविधा उपलब्ध होतील, अशी अपेक्षा महिला व बाल विकास विभागाने व्यक्त केली आहे.



# महावितरणच्या ३३ केव्ही विद्युत उपकेंद्राला आयएसओ मानांकन!

**अमरावती/का.प्र.**



बडनेरा उपविभागाअंतर्गत येणाऱ्या ३३/११ केव्ही जणूना विद्युत उपकेंद्राचे अत्यंत उत्कृष्टरित्या सक्षमीकरण आणि नूतनीकरण करण्यात आले आहे. उपकेंद्रात झालेल्या सर्व सुधारणा आंतरराष्ट्रीय निकषांनुसार झाल्यामुळे या उपकेंद्राला 'ISO ९००१:२०१५' हे मानांकन देवून सन्मानित करण्यात आले.महावितरणचे मुख्य अभियंता दिलीप दोडके यांच्या प्रमुख उपस्थितीत हे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमाला कार्यकारी अभियंता प्रदीप अंधारे, अमित बुटे, राजेश माहुलकर, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी रामगोपाल अहिर, उपविधी अधिकारी प्रशांत लहाने आणि उपकार्यकारी अभियंता जयंत घाटे यांच्यासह इतर अधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती. ३३ केव्ही जणूना उपकेंद्रातून 'एअर इंडिया' या अत्यंत महत्त्वाच्या ग्राहकासोबत ग्रामीण भागातील १५ उद्योग, चोरी माऊली गावठाण वाहिनीवरील ग्राहक, जणूना कृषी आणि सावनेर कृषी अशा ५ फिडरच्या माध्यमातून ग्राहकांना दर्जेदार वीजपुरवठा केला जाणार आहे.

उपकेंद्राच्या सक्षमीकरण आणि नूतनीकरणासाठी उपकार्यकारी अभियंता जयंत घाटे, सहाय्यक अभियंता सुदाम पाकधाने, वरिष्ठ यंत्रचालक संजय कांबळे, यंत्रचालक महेश जाधव, रोशन डकरे, कमलेश श्रृंगारे आणि स्थानिक सुरक्षा रक्षकांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुजाता जवंजाळकर यांनी केले, तर उपस्थितांचे आभार सुदाम पाकधाने यांनी मानले.

# 'नशामुक्त भारत अभियान' उत्साहात




## विविध स्पर्धांचे आयोजन

**अमरावती/का.प्र.**

युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालयाच्या मेरा युवा भारत केंद्रातर्फे विद्याभारती महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने 'नशामुक्त भारत अभियान २०२६' अंतर्गत विविध कला स्पर्धांचा सोहळा पार पडला.'विकसित भारतासाठी नशामुक्त युवा' हे प्रमुख उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.विद्याभारती महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. मिथिलेश राठोड अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस निरीक्षक किरण वानखेडे, पोलीस उपअधीक्षक डॉ. प्रज्ञा येनकर उपस्थित होत्या.

यावेळी वानखेडे यांनी, युवकांनी केवळ स्पर्धा म्हणून या कार्यक्रमाकडे न बघता समाजात जनजागृतीची मोहीम हाती घ्यावी, तरच नशामुक्त भारताचे उद्दिष्ट साध्य होईल, असे सांगितले.अभियानांतर्गत आठ कला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. लघुपट, रील स्पर्धेत गुंजन शेवाटकर, संगीत, लोकगीत स्पर्धेत हिमांशी, स्लॅम पोएट्री, कविता सादरीकरणात कृपाली गव्हाणे, घोषवाक्य लेखन स्पर्धेत भूमिका चारतुरकर, नृत्य स्पर्धेत महेक गुप्ता, पथनाट्य, मूकनाट्य स्पर्धेत अनुज माहुलकर, चित्रकला स्पर्धे अवंतिका पाटील, वादविवाद व वक्तृत्व स्पर्धेत मुस्फेरा शेख यांची प्रथम क्रमांक पटकविला. यामध्ये प्रथम क्रमांक मिळवणारे विजेते मुंबई येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेत अमरावतीचे प्रतिनिधित्व करणार आहेत. स्पर्धेतील सर्व प्रथम, द्वितीय व तृतीय विजेत्यांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देण्यात आले, तसेच इतर सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.

जिल्हा युवा अधिकारी अक्षय निपाणे यांनी प्रास्ताविक केले. भाग्यश्री कांबळे यांनी सूत्रसंचालन केले, मेरा युवा भारतचे लेखापाल अजिंक्य गवळी यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी नरेंद्र घुर्डे, स्नेहा वानखेडे, सतीश वाघमारे यांनी पुढाकार घेतला.

# नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान हा कुठला न्याय - देविदास तेटू

**कुऱ्हा-** नियमित कर्जाची उचल व भरणा करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी शासनाने प्रोत्साहनपर पन्नास हजार अनुदान देण्याची घोषणा केली. मात्र, ज्या शेतकऱ्यांनी कर्ज काढून कर्जाचा भरणा केला नाही त्यांना दोन लाख पर्यत कर्ज माफी आणि जे शेतकरी नियमित कर्जाची परतफेड करीत आहे त्यांना मात्र केवळ पन्नास हजार प्रोत्साहनपर अनुदान हा कुठला न्याय आहे असा सवाल भाजपाचे जेष्ठ कार्यकर्ते तथा कुऱ्हा सेवा सहकारी सोसायटीचे माजी अध्यक्ष देविदास यांनी केला आहे.

राज्य शासनाने शेतकऱ्यांना कर्जमाफीची घोषणा केली. त्यानुसार कर्जमाफी देण्याची प्रक्रिया येत्या काही दिवसांत सुरु होणार आहे. त्याचबरोबर दरवर्षी कर्जाची उचल व भरणा करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी राज्य शासनाने प्रोत्साहनपर अनुदान देण्याची घोषणा केली. सदर ही रक्कम पन्नास हजार ऐवजी दोन लाख रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावी.आदीच शेतकऱ्यांना विविध समस्यांचा सामना करावा लागतो.त्यामधुन जे काही उत्पन्न होते.त्यात वर्षभर संसाराचा गाडा चालवावा लागतो.आणि बँकेचे कर्ज व इतर उसनवारी करून आणलेल्या पैशाची परत फेड करावी लागते.आणि सरकार केवळ पन्नास हजार रुपये प्रोत्साहनपर अनुदान देत आहेत. त्यामुळे प्रोत्साहनपर मिळणारे अनुदान दोन लाख रुपये देण्यात यावे, अशी मागणी नियमित कर्ज उचल व भरणा करणाऱ्या शेतकऱ्यांच्या वतीने देविदास तेटू यांनी केले आहे.

# महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयाच्या रासेयो स्वयंसेवकांचा विकसित भारतासाठी नशा मुक्त युवा अभियान २.० कार्यक्रमात सहभाग

**अमरावती/का.प्र.**

स्थानिक अस्मिता शिक्षण मंडळ द्वारा संचालित महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयंसेवकांनी प्राचार्य डॉ मीनल भोंडे यांच्या निर्देशाने भारत सरकार च्या युवा कार्यक्रम आणि क्रीडा मंत्रालय अंतर्गत नशा मुक्त युवा फॉर विकसित भारत २.० या कार्यक्रमामध्ये आभासी पद्धतीने सहभाग घेतला. याप्रसंगी भारताचे प्रधानमंत्री नरेंद्रजी मोदी यांनी स्वयंसेवकांना नशा मुक्ती संदर्भात आभासी पद्धतीने मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाचे आयोजन संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या निर्देशानुसार ब्रिजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालय, अमरावती या ठिकाणी करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रा. डॉ. नीलेश कडू,समन्वयक, रासेयो विभाग, सं. गा. बा. अमरावती विद्यापीठ, अमरावती, प्राचार्य डॉ दीपक धोटे, ब्रिजलाल बियाणी महाविद्यालय, अमरावती,अशोकजी राठी, माजी अध्यक्ष ब्रिजलाल बियाणी शिक्षण मंडळ, अमरावती हे उपस्थित होते.

याप्रसंगी प्रधानमंत्री नरेंद्रजी मोदींनी तरूणांना नशा मुक्ती संदर्भात मार्गदर्शन केले.नशेच्या आहारी गेलेला तरुण केवळ स्वतः उध्वस्त होत नाही तर एक स्वप्न उध्वस्त होते.आईचा आनंद,वडिलाचे ध्येय,बहिणीचा आधार आणि भावाचा आदर्श उध्वस्त होतो असे प्रतिपादन करून त्यांनी तरुणांना नशेपासून स्वतः आणि परिसरातील इतरांना दूर ठेवण्यासाठी जनजागृती स्वयंसेवा,आणि सामुहिक सहभाग घेण्याचे आवाहन केले. दिनांक २ऑगस्ट २०२६ पासून या अभियानाला सुरुवात होत असून संपूर्ण भारतभर हे अभियान राबवून राष्ट्र उभारणीत सहकार्य देण्याचे आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदींनी यावेळी केले. सदर कार्यक्रमाचे आयोजन माय भारत पोर्टल द्वारे करण्यात आले असून ही देशव्यापी युवा चळवळ म्हणून आयोजित करण्यात आलेली आहे. याप्रसंगी माय भारत पोर्टलच्या स्वयंसेवकांनी आभासी पद्धतीने नशा मुक्ती संदर्भातील एक नुक्कड नाटिका सादर केली. सदर कार्यक्रमाला उपस्थित विविध महाविद्यालयातील सर्व राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी आणि कार्यक्रम अधिकाऱ्यांनी नशा मुक्ती संदर्भात एक प्रतिज्ञा घेतली. या कार्यक्रमाला महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयाच्या स्वयंसेवकांनी रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. गजानन काळे व प्रा. डॉ. बबीता येवले यांच्या मार्गदर्शनात सक्रीयपणे सहभाग घेतला.

# आत्महत्येस प्रवृत्त करण्याच्या गुन्ह्यात आरोपीला अटकपूर्व जामीन

## ॲड. राहुल हेमंत कडुसकर यांचा यशस्वी युक्तिवाद


**अमरावती/का.प्र.**

गाडगे नगर पोलीस स्टेशन हद्दीतील नांदगाव पेठ येथील आरोपी विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०८ व ३ (५), मध्ये गुन्हा नोंद करण्यात आला होता. त्यानंतर आरोपीच्या वकिलांनी विद्यमान जिल्हा व सत्र न्यायालय अमरावती येथे आरोपीच्या वतीने अटकपूर्व जामीनासाठी अर्ज दाखल केला होता विद्यमान जिल्हा व सत्र न्यायालय अमरावती आरोपीच्या वकिलांचा युक्तिवाद ग्राह्य धरत आरोपीचा अटकपूर्व जामीनाचा अर्ज मंजूर केला.

मिळालेल्या माहितीनुसार २२ जून २०२६ रोजी अर्जुन नगर येथे फिर्यादीच्या पतीने आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली होती.आत्महत्या करण्याचे कारण एका सुसाईड नोटमध्ये लिहिलेले होते. फिर्यादीने तिच्या पतीने सुसाईड नोट मध्ये लिहिलेल्या चार व्यक्तींच्या नावे पोलीस स्टेशन गाडगे नगर येथे आरोपींविरुद्ध तिच्या पतीला आत्महत्येस प्रवृत्त केले असा आरोप फिर्यादी कडून करण्यात आला होता.या प्रकरणी पोलीस स्टेशन गाडगे नगर यांनी ८ जुलै २०२६ रोजी भारतीय न्याय संहिता कलम १०८ व ३ (५) अंतर्गत गुन्हा नोंद केला.त्यानंतर आरोपीच्या वतीने ॲड. राहुल कडूसकर यांनी विद्यमान जिल्हा व सत्र न्यायालय अमरावती यांच्याकडे अटकपूर्व जामिनासाठी अर्ज दाखल करून प्रभावी युक्तिवाद केला व तथ्य मांडले. माननीय जिल्हा व सत्र न्यायालय अमरावती यांनी तो ग्राह्य धरत आरोपीला अटकपूर्व जामीन मंजूर केला.

# संक्षिप्त

## क्रांतिसिंह नाना पाटील यांना अभिवादन



**अमरावती-** क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.यावेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी गोविंदा दानेज, निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, निवडणूक उपजिल्हाधिकारी शिवाजी शिंदे, विधी अधिकारी नरेंद्र बोहरा, भूमीअभिलेख अधिक्षक महेश शिंदे, अधीक्षक निलेश खटके, सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी प्रज्ज्वल पाथरे, सहायक आयुक्त विकास खंडारे आदी उपस्थित होते. उपस्थितांनीही क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन केले.

## लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती



**अमरावती-** अस्मिता शिक्षण मंडळ द्वारा संचालित अस्मिता विद्यालय व अस्मिता विद्या मंदिर पन्नालाल नगर, अमरावती येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक पुण्यतिथी उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी अस्मिता विद्यामंदिरच्या मुख्याध्यापिका जया आमले, प्रमुख अतिथी अस्मिता विद्यालयाच्या मुख्याध्यापिका विद्या चव्हाण उपस्थित होत्या.यावेळी इयत्ता तिसरी ते दहावी मधील विद्यार्थ्यांनी लोकमान्य टिळक यांच्या जीवन कार्यावर आधारित प्रभावी मनोगते सादर केलीत.प्रमुख अतिथी विद्या चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षण, कष्ट,सामाजिक बांधिलकी व राष्ट्र प्रेमाची भावना जोपासण्याचे मार्गदर्शन केले.अध्यक्षीय समारोपात जया आमले यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी संदेश देत' तेज उजेडाचे उजेडात जगावे, बाहू जगाचे आपल्या खांद्यावर घ्यावे ' या विचारातून समाज हितासाठी कार्य करण्याची प्रेरणा दिली. याप्रसंगी अस्मिता शिक्षण मंडळाच्या अध्यक्षा प्रा. डॉ. मीनल भोंडे. संस्थेचे सचिव प्रा. डॉ. मुकुल भोंडे तसेच अस्मिता शिक्षण मंडळाच्या सर्व कार्यकारिणी सदस्यांनी कार्यक्रमास शुभेच्छा देत महापुरुषांच्या विचारांचे अनुकरण करून विद्यार्थ्यांनी आदर्श नागरिक बनावे असे आवाहन केले.संचालन विद्यार्थिनी अनुष्का मेशकर व आभार प्रदर्शन अपूर्वा लव्हाटे यांनी केले. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी परिश्रम घेतलेत.

## मनपात क्रांतिसिंह नाना पाटील जयंती



**अमरावती-** क्रांतिसिंह नाना पाटील जयंती निमित्य हारार्पण कार्यक्रम महानगरपालिकेत संपन्न झाला. क्रांतिसिंह नाना पाटील जयंती निमित्य महापौर श्रीचंद तेजवानी यांचे हस्ते नाना पाटील यांचे प्रतिमेस हारार्पण विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे करण्यात आले.यावेळी स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, सभागृह नेता चेतन गावंडे, अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, उपायुक्त योगेश पिठे, मुख्यलेखाधिकारी शिल्पा पवार, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, प्रमोद मोहोड, भुषण खडेकार, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## नागरिकांना सतर्क राहावे-मनपा आयुक्त

**अमरावती-** मनपा आयुक्त यांच्या नावाचा गैरवापर करून अज्ञात व्यक्तीकडून नागरिकांकडे पैशांची मागणी करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे.यासाठी +६६६२४२७८१०० या व्हॉट्सॲप क्रमांकाचा वापर केला जात असल्याची माहिती समोर आली आहे.आयुक्तांच्या नावाने कोणत्याही प्रकारे व्हॉट्सॲप किंवा इतर माध्यमातून आर्थिक मदतीची अथवा पैशांची मागणी केली जात नाही. त्यामुळे अशा प्रकारचे संदेश किंवा कॉल प्राप्त झाल्यास त्यावर विश्वास ठेवू नये आणि कोणत्याही परिस्थितीत पैसे पाठवू नयेत.तसेच ६६६२४२७८१०० किंवा अशाच प्रकारच्या इतर कोणत्याही संशयास्पद क्रमांकावरून आयुक्तांच्या नावाने संदेश आल्यास त्वरित सायबर गुन्हे शाखेकडे तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.अशा फसवणुकीच्या जाळ्यात अडकू नये, संशयास्पद संदेशांची खातरजमा करावी आणि नागरिकांनी अधिक सतर्क राहावे, असे आवाहन अमरावती महानगरपालिका आयुक्त डॉ.मंगेश गोंदावले यांनी केले आहे.

# जिल्हाधिका-यांनी सहायक निबंधक आणि बँकांचा घेतला आढावा

**अमरावती/का.प्र.**

जिल्ह्यातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या पात्र लाभार्थ्यांची यादी जाहीर झाली असून शेतकऱ्यांना लाभ देण्यासाठी सर्व तालुका स्तरावरील सहायक निबंधकांनी केवायसी शिल्लक असणाऱ्या शेतकऱ्यांची यादी दररोज उपलब्ध करून देत कामाला गती द्यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी आढावा बैठकीत दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या महसूल सभागृहात जिल्हाधिकारी श्री येरेकर यांच्या अध्यक्षतेखाली सर्व तालुक्यांतील सहायक निबंधक आणि बँकाच्या प्रतिनिधींची आढावा बैठक आयोजित करण्यात आली. याबैठकीत त्यांनी या सूचना केल्या. निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, जिल्हा उपनिबंधक राजेश भुयार आदी उपस्थित होते. राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती या ऐतिहासिक योजनेंतर्गत सहकार विभागामार्फत जिल्ह्यातील १ लाख २४ हजार १४२ शेतकऱ्यांची यादी शासनाच्या महाआयटी पोर्टलवर भरण्यात आली.२५ जुलै २०२६ रोजी जिल्ह्यातील ७६ हजार ९७६ पात्र शेतकऱ्यांची पहिली यादी प्रसिद्ध करण्यात आली असून आतापर्यंत यापैकी ४६ हजार ४२१ शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण केले आहे. कर्जमुक्ती योजनेचा लाभ मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी नजीकच्या आपले सरकार सेवा केंद्रावर (सेतू) आधार प्रमाणीकरण करणे गरजेचे आहे. ज्या शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण शिल्लक आहे अशा शेतकऱ्यांची दररोज यादी तयार करून ती बँकांकडे पाठवावी व बँकानी संबंधित शेतकऱ्यांशी संपर्क करून ही प्रक्रिया पूर्ण करावी अशा सूचना येरेकर यांनी दिल्या. तसेच ज्या शेतकऱ्यांची ॲग्रीस्टॅक नोंदणी शिल्लक आहे त्यांची यादी संबंधित तहसिल कार्यालयाला देवून नोंदणी करून घेत या कामास गती देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

# विद्यापीठाच्या इन्क्युबेशन सेंटरचा बायोमेली प्रा.लि. व अनुराधा अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये सामंजस्य करार

**अमरावती/का.प्र**




संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या इन्क्युबेशन सेंटर (रिसर्च ॲन्ड इन्क्युबेशन फाऊंडेशन) चा ठाणे येथील विज्ञानाधारित स्टार्टअप 'बायोमेली प्रा. लि.' कंपनी आणि बुलढाणा जिल्ह्यातील चिखली येथील अनुराधा अभियांत्रिकी महाविद्यालय यांच्यात नुकताच सामंजस्य करार करण्यात आला. या करारांतर्गत 'बायोमेली प्रा.लि.' ही कंपनी आता विद्यापीठाच्या इन्क्युबेशन सेंटरची अधिकृत 'इन्क्युबेटी' कंपनी म्हणून जोडली गेली आहे. तर अनुराधा अभियांत्रिकी महाविद्यालयात 'प्री-इन्क्युबेशन सेंटर' स्थापन करण्यात येणार असून, विद्यार्थ्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांना व्यवसायात रुपांतरित करण्यासाठी इन्क्युबेशन सेंटरतर्फे आवश्यक तांत्रिक मार्गदर्शन, उद्योग तज्ज्ञांचे मार्गदर्शन, स्टार्टअप उभारणीसाठी आवश्यक सहाय्य उपलब्ध करून दिले जाणार आहे.याशिवाय, विविध स्टार्टअप कंपन्यांमध्ये अनुराधा अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना इंटर्नशिप, प्रत्यक्ष उद्योग अनुभव आणि स्टार्टअप इकोसिस्टममध्ये काम करण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञानापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष उद्योगविश्वाचा अनुभव मिळणार असून रोजगारक्षमतेतही मोठी वाढ होणार आहे.

बायोमेली प्रा.लि. ही कंपनी विज्ञानावर आधारित, उच्च गुणवत्ता व बहुउद्देशीय पर्सनल केअर उत्पादने तयार करते. ही उत्पादने त्वचेच्या आरोग्यासाठी अत्यंत सुरक्षित व प्रभावी मानली जातात. इन्क्युबेशन सेंटरकडून या स्टार्टअपला व्यावसायिक मार्गदर्शन, अत्याधुनिक लॅब सुविधा, कार्यालयीन जागा, गुंतवणूकदारांचे नेटवर्क, पेटंट आणि निधी उभारणीसाठी आवश्यक सर्व तांत्रिक व कायदेशीर सहकार्य पुरविले जाणार आहे. रिसर्च ॲन्ड इन्क्युबेशन फाऊंडेशन अध्यक्ष व संचालक कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते व संचालक कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्याने उत्तोरोत्तर प्रगती करीत आहे.करारानुसार दोन्ही संस्था संयुक्तपणे स्टार्टअप बूटकॅम्प, कार्यशाळा, चर्चासत्रे, हॅकाथॉन, इन्नोव्हेशन चॅलेंज, तज्ज्ञांचे मार्गदर्शन सत्र, कॉन्फरन्स आणि उद्योजकता विकास कार्यक्रम आयोजित करणार आहेत. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती, नवोपक्रम आणि स्वयंरोजगाराची प्रेरणा निर्माण होण्यास मोठी मदत होणार आहे. तसेच, दोन्ही संस्थांमधील प्राध्यापक आणि विद्यार्थी संयुक्त संशोधन प्रकल्पांवर काम करणार असून प्रयोगशाळा, संशोधन सुविधा, तांत्रिक संसाधने आणि शैक्षणिक कौशल्यांची देवाणघेवाण करण्यात येणार आहे. उद्योगाभिमुख संशोधन आणि तंत्रज्ञान विकासाला चालना देण्यासाठी हा करार महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे मानले जात आहे.

सामंजस्य करारामुळे विशेषतः ग्रामीण व स्थानिक भागातील विद्यार्थ्यांना स्वतःचे स्टार्टअप उभारण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन, संसाधने, उद्योग क्षेत्राशी संपर्क आणि आर्थिक संधी उपलब्ध होतील. भविष्यात या भागीदारीतून अनेक यशस्वी स्टार्टअप्स आणि रोजगारनिर्मिती करणारे युवा उद्योजक घडतील,' असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला. या करारावर इन्क्युबेशन सेंटरच्या संचालक व प्रमुख डॉ. स्वाती शेरेकर, कार्यकारी अधिकारी श्री आनंद यादव यांनी स्वाक्षरी केली. तर अनुराधा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्यावतीने महाविद्यालयाचे संचालक डॉ. एम. एस. अली यांनी स्वाक्षरी केली. यावेळी इन्क्युबेशन सेंटरचे व्यवस्थापक अमोल हिरुळकर साक्षीदार म्हणून उपस्थित होते. सामंजस्य करारावेळी बायोमेली प्रा.लि. तर्फे संचालक अभिषेक कुमार, सहसंस्थापक व सीओओ श्री वर्चस मम्मानिया उपस्थित होते.

# शिवीगाळीची जबाबदारी कोणाची?

जंतर-मंतर वर दिल्ली मध्ये आंदोलन करणाऱ्या मुलींनी अत्यंत असभ्य शिव्या दिल्यामुळे एक मोठा सांस्कृतिक धक्का देशातल्या मध्यमवर्गीय आणि उच्च मध्यमवर्गीय समाजाला बसला आहे. खुद्द पंतप्रधानांनी या शिवीगाळीची दखल घेऊन आपली व्यथा समाजमाध्यमात व्यक्त केली आहे आणि जेन-झी च्या अश्या वागण्यामुळे अनेकजण नुसते व्यथितच नव्हे तर संतप्त देखील झाले आहेत.

तसे पाहिले तर शिवीगाळ ही भारतात एक सामान्य वस्तुस्थिती आहे. चारित्र्यवान नागरिक घडविण्यासाठी शंभर वर्षे तपस्या करूनही राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला शिव्या न देणारे 'सुसंकृत' नागरिक घडविता आले नाहीत. एरवी सामान्य परिस्थितीत शिव्या न देणारे स्वयंसेवक क्षुब्ध अवस्थेत आई-बहिणीवरून शिव्या देणार नाहीतच, याची हमी खुद्द सरसंघचालक सुद्धा देऊ शकणार नाहीत. सध्याचा संताप हा दोन कारणांमुळे दिसतो. शिव्या मुलींनी दिल्या, फक्त मुलांनी नाही आणि पंतप्रधानांना शिव्या दिल्या.

आपल्या देशात मागील १२ वर्षे भाजपचे सरकार आहे. अनेक OTT Platforms वरून अखंड सुरु असलेल्या वेब सिरीज शिव्यांनी गच्च भरलेल्या असतात. ॲनिमल, धुरंधर



सारख्या अनेक चित्रपटांमध्ये भयंकर हिंसाचार आणि गच्च शिव्या आहेत. सेन्सॉर बोर्ड सरकारच्या अखत्यारीत आहे. मोदींना दिलेल्या शिव्या का दाखवता म्हणून मेटा सारख्या कंपन्यांना तत्परतेने नोटीस देणाऱ्या शासनाने लैंगिकता, हिंसाचार व शिवीगाळ का दाखवता अश्या नोटीसा मात्र गेल्या १२ वर्षात दिलेल्या आढळत नाहीत. रा.स्व. संघाने देखील ते थांबावे म्हणून पाठपुरावा केलेला दिसत नाही. शासनाच्या विरोधात समाजमाध्यमांमध्ये व्यक्त होणाऱ्या स्त्रियांना सरकार समर्थकांकडून गलिच्छ शिव्या दिल्या जातात. त्यावर कोणी खेद व्यक्त करत नाही. आता सुद्धा आंदोलन करणाऱ्या १५-१६ वर्षांच्या मुलींना बलात्कारापर्यंत धमक्या दिल्या जातात. त्याचाही खेद सरकार समर्थक किंवा अन्य हिंदुत्ववाद्यांना वाटत असल्याचे दिसत नाही.

संस्कारित राहण्याची जबाबदारी फक्त स्त्रियांची आहे अशी तर समजूत नाही ना? श्रीमंत, सिलेब्रीटीज, चित्रपट अभिनेते, उच्च-मध्यम वर्ग यांच्यात तर आता दैनंदिन संभाषणात सुद्धा सहज शिव्या आढळतात. स्त्रियांचा सन्मान व्हावा, कोणालाही कुणीही आई-बहिणीवरून शिवी देऊ नये असे जर राज्यकर्त्यांना व त्यांच्या पाठीराख्यांना मनोमन वाटत असेल तर सर्वप्रथम त्यांनी आपले घर स्वच्छ करावे, आपल्या समर्थकांना तंबी द्यावी आणि वेब सिरीज व चित्रपटांमधून सुरु असलेली शिवीगाळीची गटारगंगा सक्तीने बंद करावी. नवीन पिढी अंतराळातून शिव्या शिकत नसते. त्यांच्या आसपासच कुठेतरी दिल्या जाणाऱ्या शिव्या ते आत्मसात करतात. आसपास शिव्या देणारे त्यांचेच पालक, भाऊ, नातेवाईक, पुढारी अथवा चित्रपटातील स्टार असतात. बाय-द-वे, जंतर मंतर वर जेन-झी ने धर्म, जात, लिंग, वंश इत्यादी सर्व भेद विसरून अहिंसक मार्गाने व हसऱ्या वातावरणात आपल्या कल्पकतेचा जो परिचय दिला, तो देखील सरकार समर्थकांनी विसरू नये.

**किशोर देशपांडे**

### पीकविम्यासाठी नोंदणी किती शेतकऱ्यांची?

केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री पीकविमा योजनेची राज्यात अंमलबजावणी सुरू आहे. नोंदणीची अंतिम मुदत जुलैअखेर होती, पण काही शेतकरी तांत्रिक अडचणी, कागदपत्रांची पूर्तता अथवा इतर वैयक्तिक कारणांमुळे अर्ज दाखल करू शकलेले नाहीत. या बाबींचा विचार करून अंतिम मुदत ३१ जुलै २०२६ वरून आता १० ऑगस्ट २०२६ पर्यंत वाढवण्यात आली आहे. राज्यातील आठ कृषी विभागांच्या आकडेवारीनुसार छत्रपती संभाजीनगर (मराठवाडा) विभागातून सर्वाधिक १३,२५,०००, अमरावती विभागातून ६,९१,९७३, पुणे विभागातून ६,०७,६६३, कोल्हापूर विभागातून २,४०,२५३, नागपूर विभागातून ४,५३,३८३, नाशिक विभागातून ३,३३,३८५, लातूर विभागातून २,४२,८२६, आणि कोकण विभागातून सर्वात कमी १,०२,३३५, असे एकंदर ६१,८२,२१८ शेतकरी या योजनेत सहभागी झाले आहेत. गतवर्षीची नोंदणी ९५ लाख होती.

केंद्राच्या योजनेचा कारभार कसा?

एक रुपयात पीकविमा म्हणजे शेतकरी हिश्शाची रक्कम राज्य सरकार भरेल, या योजनेपायी राज्य सरकारवरील आर्थिक भार वाढतो,

# पीकविमा योजनेकडे शेतकऱ्यांनी पाठ का फिरवली ?

***हवामान बदलामुळे नैसर्गिक आपत्तींचा धोका वाढला असूनही यंदा पीकविमा योजनेसाठी नोंदणी करण्याचा उत्साह शेतकऱ्यांमध्ये दिसून येत नाही; यामागे 'पीक कर्जाशी जोडणी' हे एकच कारण आहे?***

बोगस अर्जदारांची संख्या वाढली म्हणून राज्य सरकारने ही पीकविमा योजना रद्द करून गेल्या वर्षीपासून केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री पीकविमा योजनेची राज्यात अंमलबजावणी सुरू केली. मात्र, या केंद्रीय योजनेतून शेतकऱ्यांना अपेक्षित भरपाई रक्कम मिळाली नाही. जून, जुलै २०२५ मध्ये नुकसान झाले तरीही मदत मिळण्यासाठी एप्रिल, मे २०२६ ची वाट पाहावी लागली. अद्यापही धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांना विमा भरपाई रक्कम मिळाली नाही.



पीक कर्ज खात्याशी पीकविम्याची जोडणी का?

यंदा प्रथमच केंद्र सरकारने पीकविमा नोंदणी करताना संबंधित शेतकऱ्यांच्या पीक कर्ज खात्याची माहिती अनिवार्य केली आहे. पीकविमा मंजूर झाला तर तो थेट कर्ज खात्यात जाणार आहे. त्यामुळे संबंधित शेतकऱ्याच्या कर्जाची रक्कम अगोदर भरून उर्वरित रक्कम शेतकऱ्याला दिली जाईल. आजवर अनेक शेतकरी पीकविम्याला बचत खाते जोडत, त्यामुळे पीक विम्याची रक्कम कर्ज खात्यात न जाता बचत खात्यात जाई. शेतकऱ्यांना कर्ज परतफेड करण्याची सवय लागावी. आर्थिक शिस्त लागावी, म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे. याशिवाय त्रयस्थ संस्थेकडून शेतकऱ्याच्या पिकाचा डिजिटल क्रॉप सर्व्हे केला जाणार आहे. अर्जातील माहिती आणि या सर्व्हेतील माहितीत तफावत असेल तर अर्ज बाद होणारच पण अशा बोगस अर्जदाराची विमा रक्कम जप्त करून, अर्जदारावर गुन्हा दाखल केला जाणार आहे. पीकविमा नोंदणी करण्यासाठी दहा गुंठे क्षेत्र अनिवार्य केले आहे, या अटींमुळे यंदा कमी नोंदणी झाली आहे.

शेतकरी संघटना, शेतकऱ्यांची मागणी काय ?

शेतकरी पूर्ण हप्ता भरण्यासाठी तयार आहेत. पण, सध्याच्या योजनेत पीक कापणी प्रयोग हाच एकमेव निकष आहे. हंगामात कधीही नुकसान झाले तरीही पीक कापणी प्रयोग पूर्ण होऊन अहवाल केंद्र सरकारकडे जात नाही, तोवर शेतकऱ्यांना मदत मिळत नाही. एक रुपयात पीकविमा योजना असताना प्रतिकूल हवामान घटकामुळे पेरणी, लावणी, उगवण न होणे, हंगामातील प्रतिकूल परिस्थितीमुळे झालेले नुकसान, पीक पेरणीपासून काढणीपर्यंत होणारे नुकसान, स्थानिक नैसर्गिक आपत्ती आणि काढणी पश्चात नुकसान, असे निकष होते, ते सर्व निकष रद्द करून पीक कापणी प्रयोग हा एकमेव निकष ठेवला. रद्द केलेल्या निकषांचा पुन्हा समावेश करावा, अशी केलेली मागणी राज्य सरकारने फेटाळून लावली आहे. पण या निकषांचा समावेश केल्याशिवाय शेतकऱ्यांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळणार नाही, अशी स्थिती आहे.

**दत्ता जाधव**

## कॉमनवेल्थ पदके जनरेशन झेड साठी प्रेरणा

जनरेशन झेड ही नव्या विचारांची, तंत्रज्ञानाशी मैत्री असलेली आणि बदल स्वीकारणारी पिढी आहे. ही पिढी नवकल्पना, सर्जनशीलता आणि आत्मविश्वास यांना महत्त्व देते. इंटरनेटच्या माध्यमातून ज्ञान मिळवून स्वतःचा सर्वांगीण विकास करण्याची त्यांची तयारी असते.

सामाजिक प्रश्नांविषयी जागरूकता, पर्यावरण संरक्षण आणि मानसिक आरोग्याबद्दलचा सकारात्मक दृष्टिकोन ही त्यांची वैशिष्ट्ये आहेत. नवीन कौशल्ये शिकण्याची आणि उद्योजकतेकडे वाटचाल करण्याची त्यांच्यात मोठी क्षमता आहे. कॉमनवेल्थ स्पर्धांमध्ये भारतीय खेळाडूंनी मिळवलेली पदके ही संपूर्ण देशासाठी अभिमानाची बाब आहे.

त्यांच्या अथक परिश्रम, शिस्त, जिद्द आणि राष्ट्रासाठी सर्वोत्तम कामगिरी करण्याच्या भावनेतून प्रत्येकाने सकारात्मक प्रेरणा घ्यावी. विशेषतः जनरेशनझेड ने त्यांच्या यशाकडे केवळ पदक म्हणून न पाहता, कठोर परिश्रम, सातत्य आणि ध्येयपूर्तीचे प्रतीक म्हणून पाहावे. जनरेशन झेड आपल्या क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करून राष्ट्राच्या प्रगतीत मोलाचे योगदान देऊ शकते. त्यादृष्टीने त्यांना प्रवाहाच्या योग्य दिशेत आणण्याची जबाबदारी प्रत्येक जागरूक भारतीय नागरिकाची आहे.

**प्रांजली ब्रम्हे**

# जंक फूडवर बंदी : विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी महत्त्वाचे पाऊल

महाराष्ट्र शासनाच्या अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) राज्यातील सर्व शाळांच्या ५० मीटर परिसरात जंक फूड विक्रीवर बंदी घालण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. शाळांच्या आजूबाजूला फास्ट फूड, शीतपेये, चिप्स, चॉकलेट, पॅकेज्ड स्नॅक्स आणि इतर आरोग्यास अपायकारक पदार्थांची सहज उपलब्धता विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी मोठा धोका ठरत होती. त्यामुळे हा निर्णय विद्यार्थ्यांच्या आरोग्याचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने अत्यंत स्वागतार्ह आहे.आजच्या बदलत्या जीवनशैलीत मुलांचा कल घरगुती पौष्टिक आहारापेक्षा पिझ्झा, बर्गर, फ्रेंच फ्राईज, नूडल्स, चिप्स, सॉफ्ट ड्रिंक्स यांसारख्या पदार्थांकडे अधिक वाढला आहे. या पदार्थांमध्ये साखर, मीठ, तेल आणि कृत्रिम रंगांचे प्रमाण जास्त असल्याने लठ्ठपणा, मधुमेह, रक्तदाब, दातांचे विकार, पचनाचे आजार आणि इतर अनेक आरोग्य समस्या बालवयातच निर्माण होत आहेत. जागतिक आरोग्य संघटनेने देखील बालकांमध्ये वाढणाऱ्या लठ्ठपणाबाबत वारंवार चिंता व्यक्त केली आहे.

शाळा हे केवळ शिक्षणाचे केंद्र नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे केंद्र आहे. त्यामुळे शाळेच्या परिसरात आरोग्यदायी वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना पौष्टिक आहाराची सवय लागावी, यासाठी शाळांमधील कँटीनमध्ये सकस आणि संतुलित अन्न उपलब्ध करून देणे तितकेच महत्त्वाचे आहे. फक्त जंक फूडवर बंदी घालून हा प्रश्न पूर्णपणे सुटणार नाही. त्यासाठी फळे, दूध, ताक, मोड आलेली कडधान्ये, ताजे फळांचे रस, पौष्टिक नाश्ता यांना प्रोत्साहन द्यावे लागेल.या आदेशानुसार शाळांची नियमित तपासणी केली जाणार असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. हा निर्णय प्रभावी ठरण्यासाठी स्थानिक प्रशासन, शाळा व्यवस्थापन, पालक आणि विक्रेते यांचे सहकार्य अत्यंत आवश्यक आहे. अनेकदा शाळेच्या गेटबाहेर हातगाड्यांवर किंवा छोट्या दुकानांमध्ये विद्यार्थ्यांना आकर्षित करणारे पदार्थ विकले जातात. अशा विक्रेत्यांवरही प्रभावी नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे.



पालकांची भूमिकाही येथे अत्यंत महत्त्वाची आहे. अनेक पालक मुलांच्या हट्टापायी रोज खाऊसाठी पैसे देतात. त्याऐवजी घरातून पौष्टिक डबा देणे, संतुलित आहाराचे महत्त्व समजावून सांगणे आणि स्वतःही आरोग्यदायी जीवनशैलीचे उदाहरण ठेवणे आवश्यक आहे. मुलांमध्ये लहानपणापासून योग्य आहाराच्या सवयी रुजल्यास त्याचा सकारात्मक परिणाम आयुष्यभर दिसून येतो.शाळांमध्ये पोषण शिक्षणावर भर देणे, संतुलित आहाराचे महत्त्व अभ्यासक्रमातून सांगणे, नियमित आरोग्य तपासणी करणे आणि विद्यार्थ्यांमध्ये व्यायाम व मैदानी खेळांची आवड निर्माण करणेही तितकेच आवश्यक आहे. मोबाईल, टीव्ही आणि संगणकासमोर वाढणारा वेळ कमी करून शारीरिक हालचालींना प्रोत्साहन दिल्यास विद्यार्थ्यांचे आरोग्य अधिक सक्षम होईल. मात्र, या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी हेच खरे आव्हान आहे.

अनेक वेळा नियम तयार होतात; परंतु त्यांची काटेकोर अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे संबंधित विभागाने नियमित तपासणी, जनजागृती आणि दंडात्मक कारवाई यांचा समतोल राखणे आवश्यक आहे. केवळ बंदी नव्हे, तर आरोग्यदायी पर्याय सहज उपलब्ध करून देणेही तितकेच महत्त्वाचे आहे.विद्यार्थी हे देशाचे भवितव्य आहेत. त्यांचे आरोग्य सुदृढ राहणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. जंक फूडवरील निर्बंध हा केवळ एक प्रशासकीय निर्णय नसून निरोगी पिढी घडविण्याच्या दिशेने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे. शासनाचा हा निर्णय प्रभावीपणे राबविला गेला आणि पालक, शिक्षक व समाजाने त्याला सकारात्मक साथ दिली, तर भविष्यात अधिक निरोगी, सक्षम आणि जागरूक पिढी घडण्यास निश्चितच मदत होईल.

**श्याम ठाणेदार**

### त-ड-का

## बाबांचे तत्वज्ञान

आधीकेले मग सांगीतले
हे गाडगेबाबांचे तत्वज्ञान

आम्ही मात्र बोल बच्चन
भाषणबाजीतच रममाण..

फोटोसाठी आम्हीदक्ष
बाकी केवळ गप्पा

अशानं स्वच्छता अभियान
यशश्वी होईल का बाप्पा?

शिकलो सवरलो आम्ही
झालो ना आता सज्ञान

तरी कां बरं राबवावं लागतं
ग्रामस्वच्छता अभियान?



**प्रा. अशोक सारडा,**
मेहकर
मो.९४२१३९४३३९

# 'उपवर्गीकरण आणि आरक्षण:सामाजिक न्याय की आरक्षण कमकुवत करण्याचा प्रयत्न?'

भारतीय राज्यघटनेने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीय समाजाला दिलेले आरक्षण हे कोणत्याही प्रकारचे दान किंवा खैरात नाही. ते हजारो वर्षांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक अन्यायाची भरपाई करण्यासाठी दिलेले घटनात्मक संरक्षण आहे. भारतातील जातिव्यवस्थेमुळे ज्यांना अस्पृश्य मानले गेले, गावकुसाबाहेर राहण्यास भाग पाडले गेले, शिक्षण, संपत्ती, सत्ता आणि सन्मानापासून वंचित ठेवले गेले, अशा समाजघटकांना समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटनेत आरक्षणाची तरतूद केली.

आज मात्र अनुसूचित जातींमध्ये उपवर्गीकरण या विषयावर देशभर चर्चा सुरू आहे. या चर्चेमुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. उपवर्गीकरण हे खरोखरच सर्व घटकांना न्याय देण्यासाठी आहे की आरक्षण हळूहळू कमकुवत करण्याचा प्रयत्न आहे, याचा विचार करणे आवश्यक आहे.सध्या महाराष्ट्रात अनुसूचित जातींना सुमारे १३ टक्के आरक्षण आहे. या आरक्षणाचा लाभ अनुसूचित जातींच्या सर्व जातींना मिळतो. मात्र आता त्याच आरक्षणामध्ये उपवर्गीकरण करण्याची मागणी होत आहे. या मागणीमुळे अनेक समाजघटकांमध्ये मतभेद निर्माण झाले आहेत. अनेकांच्या मनात अशी शंका निर्माण झाली आहे की, आरक्षणाचे तुकडे करून त्याची परिणामकारकता कमी केली जाणार तर नाही ना?

या संदर्भात एक महत्त्वाचा मुद्दा असा आहे की अनुसूचित जातींमध्ये समाविष्ट असलेल्या सर्व जातींकडून उपवर्गीकरणाची मागणी झालेली नाही. काही विशिष्ट समाजघटकांकडून ही मागणी होत असल्याचे दिसते. त्यामुळे हा विषय अत्यंत संवेदनशील बनला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनुसूचित जातींना केवळ आरक्षण दिले नाही, तर त्यांनी 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा मूलमंत्र दिला. या विचाराचा स्वीकार करून अनेकांनी शिक्षण घेतले, पारंपरिक व्यवसाय सोडले, सरकारी नोकऱ्या, उद्योग, व्यवसाय आणि विविध क्षेत्रांत प्रगती केली. शिक्षणामुळे स्वाभिमान निर्माण झाला आणि सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया वेगाने पुढे गेली.

मात्र अनेक समाजघटकांमध्ये शिक्षणाचे प्रमाण अपेक्षेइतके वाढले नाही. काही समाज आजही अंधश्रद्धा, पारंपरिक रूढी, सामाजिक बंधने आणि आर्थिक दुर्बलतेत अडकलेले आहेत. यामागे केवळ आरक्षण जबाबदार नाही, तर शिक्षणाचा अभाव, संघटनशक्तीचा अभाव, सामाजिक जागृतीचा अभाव आणि विविध विकास योजनांचा कमी लाभ ही अनेक कारणे आहेत.उपवर्गीकरणाच्या समर्थनार्थ असा युक्तिवाद केला जातो की काही जातींना आरक्षणाचा तुलनेने अधिक लाभ मिळाला आहे, तर काही जाती मागे राहिल्या आहेत. त्यामुळे मागे राहिलेल्या जातींना स्वतंत्र वाटा मिळावा. दुसरीकडे विरोधकांचे मत असे आहे की उपवर्गीकरणामुळे अनुसूचित जातींची एकजूट तुटेल आणि आरक्षणाचे विभाजन होऊन त्याचा मूळ उद्देश कमकुवत होईल. या विषयावर कोणताही निर्णय घेण्यापूर्वी संबंधित आयोगांचे अहवाल, आकडेवारी, शैक्षणिक व सामाजिक प्रगतीची माहिती आणि सर्व समाजघटकांची मते सार्वजनिक करणे आवश्यक आहे. विशेषतः बदर समितीचा अहवाल सार्वजनिक करावा, अशी अनेकांची मागणी आहे. पारदर्शकता आणि सर्वसमावेशक चर्चा ही लोकशाहीची मूलभूत गरज आहे.




यासोबतच क्रीमी लेयर या संकल्पनेबाबतही चर्चा सुरू आहे. जर भविष्यात अनुसूचित जातींमध्ये क्रीमी लेयर लागू करण्याचा विचार झाला, तर त्याचे सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक परिणाम काय होतील, याचाही सखोल अभ्यास होणे आवश्यक आहे. कारण उच्च शिक्षण, स्पर्धा परीक्षा आणि रोजगाराच्या संधींसाठी आजही अनेक कुटुंबे आर्थिकदृष्ट्या संघर्ष करत आहेत.आजची खरी गरज म्हणजे अनुसूचित जातींमधील सर्व समाजघटकांनी एकमेकांविरुद्ध संघर्ष करण्याऐवजी शिक्षण, संघटन,सामाजिक जागृती आणि आर्थिक सक्षमीकरणावर भर द्यावा.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला मार्ग हा संघर्षाचा नव्हे, तर ज्ञान, संघटन आणि संविधानिक लढ्याचा मार्ग आहे.

अशा परिस्थितीत अनुसूचित जातींमधील आरक्षणाचे उपवर्गीकरण हा विषय देशभर चर्चेचा विषय बनला आहे. उपवर्गीकरणाच्या समर्थकांचे मत आहे की अनुसूचित जातींमधील काही जातींना आरक्षणाचा तुलनेने अधिक लाभ मिळाला असून, मागे राहिलेल्या जातींना न्याय मिळण्यासाठी स्वतंत्र वाटा निश्चित करणे आवश्यक आहे. तर विरोधकांचे मत असे आहे की उपवर्गीकरणामुळे अनुसूचित जातींची एकजूट कमकुवत होईल, समाजात परस्पर संघर्ष वाढेल आणि आरक्षणाच्या मूळ उद्देशालाच धक्का बसेल.

विशेषतः महाराष्ट्रात अनुसूचित जातींना मिळणाऱ्या आरक्षणामध्ये उपवर्गीकरण करण्याच्या चर्चेमुळे विविध सामाजिक संघटना, अभ्यासक, कायदेतज्ज्ञ आणि समाजातील विविध घटकांमध्ये मतभेद निर्माण झाले आहेत. काहींच्या मते हा निर्णय सामाजिक न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे, तर काहींच्या मते हा आरक्षण कमकुवत करण्याचा आणि अनुसूचित जातींमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न आहे. या संदर्भात विविध समित्यांचे अहवाल, सामाजिक आकडेवारी, शैक्षणिक प्रगती, आर्थिक स्थिती आणि घटनात्मक तरतुदी यांचा सखोल अभ्यास करणे अत्यंत आवश्यक आहे.

अनुसूचित जातींसाठी आरक्षणाची तरतूद भारतीय संविधानाने सामाजिक न्यायाच्या उद्देशाने केली आहे. मात्र आजही शासकीय सेवेमधील अनुसूचित जातींच्या आरक्षित जागा पूर्णपणे भरल्या जात नाहीत. अनुसूचित जातींचा बॅकलॉग मोठ्या प्रमाणावर कायम असून, त्याचा प्रतिकूल परिणाम आरक्षणाच्या प्रभावी अंमलबजावणीवर होत आहे. त्यामुळे प्रथम आरक्षित जागा नियमितपणे काढून त्या भरल्या गेल्या पाहिजेत आणि अनुसूचित जातींचा बॅकलॉग तातडीने भरला गेला पाहिजे.याचबरोबर खाजगी क्षेत्रामध्ये अनुसूचित जातींचे प्रतिनिधित्व अत्यल्प असल्यामुळे ही तफावत दूर करणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी अनुसूचित जातीच्या सर्व समाजघटकांनी एकजुटीने शासन दरबारी हा प्रश्न लावून धरला पाहिजे. तसेच राखीव मतदारसंघातून निवडून जाणारे आमदार आणि खासदार यांनीही या विषयाला प्राधान्य देऊन प्रभावी भूमिका बजावली पाहिजे.भारतीय संविधानातील तरतुदींचे प्रामाणिकपणे पालन झाले, आरक्षित जागा वेळेत भरल्या गेल्या, बॅकलॉग दूर करण्यात आला आणि अनुसूचित जातींना न्याय्य प्रतिनिधित्व मिळाले, तरच आरक्षण समाजाच्या हिताचे प्रभावी संरक्षण करेल, असा आशावाद बाळगणे निश्चितच गैर ठरणार नाही.

**शिवा प्रधान**
अमरावती
मो. क्र. ७०५७६०५९६८

# सायबर फसवणुकीतील पाच संशयित गोव्यातून अटकेत

## अकोल्यातील टाईल्स व्यापा–याची ४.१९ लाखांची, तर महिला डॉक्टरची ४५.६६ लाखांची फसवणूक

■ प्रतिनिधी | अकोला ■

ऑनलाइन फसवणुकीच्या दोन गाजलेल्या प्रकरणांचा छडा लावत अकोला सायबर पोलिसांनी गोवा राज्यात धडक कारवाई करून पाच आरोपींना अटक केली आहे. टाईल्सच्या व्यवहारात स्वस्त दराचे आमिष दाखवून व्यापाऱ्याची ४ लाख १९ हजार रुपयांची, तर 'अल्गो ट्रेडिंग'मध्ये भरघोस परताव्याचे आमिष दाखवून शहरातील नामांकित महिला डॉक्टरची तब्बल ४५ लाख ६६ हजार ७५० रुपयांची फसवणूक करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करण्यात आला. या कारवाईत रोख रक्कम, मोबाईल, टॅब, मॉनिटर, वाय-फाय राऊटरसह एकूण ६ लाख २७ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून विविध बँक खात्यांतील ५ लाख ५४ हजार ४१० रुपयांची रक्कमही होल्ड करण्यात आली आहे.

सायबर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अकोल्यातील टाईल्सच्या होलसेल व्यापाऱ्याशी एका अनोळखी व्यक्तीने व्हॉट्सॲपवर संपर्क साधत स्वस्त दरात टाईल्स उपलब्ध करून देण्याचे आमिष दाखविले. टाईल्सचे फोटो पाठवून ऑनलाइन व्यवहार करण्यात आला. आरोपीने विविध बँक खात्यांमध्ये तसेच क्यूआर कोडद्वारे रक्कम जमा करण्यास सांगितले. व्यापाऱ्याने टप्प्याटप्प्याने ४ लाख १९ हजार १ रुपये भरल्यानंतरही माल मिळाला नाही. त्यामुळे त्यांनी सायबर पोलिसांकडे धाव घेतली. याप्रकरणी १८ जून २०२६ रोजी सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

दुसऱ्या प्रकरणात शहरातील एका नामांकित महिला डॉक्टरला व्हॉट्सॲपवर 'अल्गो ट्रेडिंग'मध्ये गुंतवणुकीचे आमिष दाखविण्यात आले. सुरुवातीला २५ लाख रुपये गुंतविल्यानंतर काही प्रमाणात नफा दाखवून विश्वास संपादन करण्यात आला. त्यानंतर मोठ्या परताव्याचे आमिष दाखवत आणखी रक्कम गुंतविण्यास भाग पाडण्यात आले. नंतर खात्यातील रक्कम काढण्याचा प्रयत्न केल्यावर ती उपलब्ध झाली नाही. उलट पैसे परत मिळवण्यासाठी आणखी २० लाख रुपये भरण्याची मागणी करण्यात आली. या प्रकारात डॉक्टरची एकूण ४५ लाख ६६ हजार ७५० रुपयांची फसवणूक झाली. याप्रकरणी खदान पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर तपास सायबर पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला.

दोन्ही गुन्ह्यांचा तपास करताना सायबर पोलिसांनी संबंधित बँकांशी ई-मेलद्वारे पत्रव्यवहार करून आर्थिक व्यवहारांची माहिती मागविली. सात बँक खाती गोठविण्यात आली. प्राप्त माहितीचे तांत्रिक विश्लेषण, डिजिटल ट्रेल आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने आरोपींचा माग काढण्यात आला. तपासात आरोपी गोवा राज्यात वास्तव्यास असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर पोलिसांचे विशेष पथक गोव्याला रवाना करण्यात आले.

उत्तर गोव्यातील अल्टो पचोरीम परिसरातून यशपाल वासुदेवभाई निमावत आणि सोनू भवरकुमार यादव या दोघांना स्थानिक पोलिसांच्या मदतीने २९ जुलै रोजी अटक करण्यात आली. तर बार्डेज तालुक्यातील पिलर्णे परिसरातून देवेंद्र सुरेशचंद्र शर्मा, अंकुर सुरेश चावडा आणि हबीबर रहमान फकरुद्दीन या तिघांना ३० जुलै रोजी ताब्यात घेण्यात आले.

टाईल्स फसवणूक प्रकरणात आरोपींच्या खात्यातील ७५ हजार रुपये होल्ड करण्यात आले असून अडीच लाख रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे. तर ट्रेडिंग फसवणूक प्रकरणात २३ स्मार्ट मोबाईल, ९ की-पॅड मोबाईल, एक टॅब, एक मॉनिटर, पाच वाय-फाय राऊटर आणि इतर साहित्य असा ६ लाख २७ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच या प्रकरणात ४ लाख ७९ हजार ४१० रुपयांची रक्कम होल्ड करण्यात आली आहे. न्यायालयाने आरोपींना ४ व ५ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावली असून पुढील तपास सुरू आहे.

### ‘या पथकाने फत्ते केली मोहीम’

ही धडक कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक व अपर पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईमध्ये सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अमोल माळवे, सहाय्यक पोलीस निरीक्षक मनीषा तायडे, पोलीस उपनिरीक्षक देविदास फुलउंबरकर, पोलीस हवालदार सुधाकर वानखडे, अतुल अजने, गोपाळ ठोंबरे, पोलीस अंमलदार सतीश भगत, गणेश कुहीले, आकाश पांडे, आशिष आमले, राहुल सानप आणि स्वप्नील दामोदर यांनी सहभाग घेतला. या पथकाने गोवा राज्यात जाऊन स्थानिक पोलिसांच्या मदतीने पाच आरोपींना अटक करत दोन्ही सायबर फसवणूक प्रकरणांचा यशस्वी छडा लावला. पुढील तपास पोलीस निरीक्षक अमोल माळवे करीत आहेत.

### साडेसहा लाखांचा मुद्देमाल जप्त



### ‘सायबर गुन्हेगारांपासून सावध राहा - एसपी अर्चित चांडक

‘स्वस्त दर, दुप्पट नफा किंवा ऑनलाइन गुंतवणुकीच्या आमिषाला बळी पडू नका. कोणताही आर्थिक व्यवहार करण्यापूर्वी खातरजमा करा. सायबर फसवणूक झाल्यास तात्काळ १९३० हेल्पलाईनवर संपर्क साधा किंवा www.cybercrime.gov.in वर तक्रार नोंदवा. तुमची सतर्कताच तुमचे संरक्षण आहे.’

---

# खड्डयांच्या नरकयातनेचा अखेर उद्रेक!

## रुधाडी ग्रामस्थांचा संताप रस्त्यावर

- ‘रस्ता द्या, नाहीतर आंदोलन तीव्र करू’चा इशारा
- गौण खनिजाच्या अवजड वाहतुकीने पोपटखेड–रुधाडी–जनुना मार्गाचा चक्काचूर
- दहा गावांचा संपर्क धोक्यात, प्रशासनाविरोधात तीव्र घोषणाबाजी

■ प्रतिनिधी | अकोट ■

प्रशासनाच्या हलगर्जीपणाविरोधात रुधाडी परिसरातील ग्रामस्थांचा संताप अखेर मंगळवारी रस्त्यावर उसळला.

पोपटखेड–रुधाडी–जनुना या मुख्य मार्गाची अत्यंत दयनीय अवस्था, त्यात पावसामुळे पडलेले जीवघेणे खड्डे आणि वारंवार मागणी करूनही प्रशासनाने घेतलेले मौन यामुळे संतप्त ग्रामस्थांनी रस्ता रोको आंदोलन छेडले. आंदोलनामुळे काही काळ दोन्ही बाजूंची वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली.



गौण खनिजाची अवजड वाहतूक सुरू असल्यापासून या रस्त्याची अक्षरशः चाळण झाली आहे. रस्त्यावर सर्वत्र मोठमोठे खड्डे पडले असून पावसाचे पाणी साचल्याने वाहन चालविणे म्हणजे जीव धोक्यात घालण्यासारखे बनले आहे. दुचाकीस्वार घसरून अपघात होण्याचा धोका वाढला असून नागरिकांमध्ये तीव्र संताप आहे.

ग्रामस्थांनी अनेक वेळा सार्वजनिक बांधकाम विभागासह संबंधित अधिकाऱ्यांकडे निवेदने देऊन रस्ता दुरुस्तीची मागणी केली. मात्र आश्वासनांपलीकडे कोणतीही ठोस कारवाई झाली नाही. अखेर 'आता रस्ता हवा, आश्वासने नकोत' अशी भूमिका घेत ग्रामस्थांनी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला.या रस्त्यावरून दहा गावांतील नागरिकांचा रोजचा प्रवास सुरू असतो. शेतकरी शेतीमाल बाजारात नेताना त्रस्त आहेत. विद्यार्थी वेळेत शाळा-महाविद्यालयात पोहोचू शकत नाहीत.

खराब रस्त्यामुळे काही भागात शालेय बसही जाण्यास टाळाटाळ करत असल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली. गंभीर रुग्ण, वृद्ध आणि गर्भवती महिलांना दवाखान्यात नेताना मोठा धोका पत्करावा लागत असून अनेकदा उपचारासाठी होणारा विलंब जीवावर बेतण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

ग्रामस्थांनी पोपटखेड ते वस्तापूर या संपूर्ण मार्गाची तातडीने दुरुस्ती, रस्त्याचे मजबुतीकरण आणि परिसरातील मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली. अन्यथा यापेक्षाही तीव्र आंदोलन उभारण्याचा स्पष्ट इशारा प्रशासनाला देण्यात आला.आंदोलनात सामाजिक कार्यकर्ते जानराव बेलसरे, राजपाल बडगे, दिनेश हरदे, शिवा पालवे, हिरालाल कासदे, राजकुमार जांभळे, विलास तोटे यांच्यासह मोठ्या संख्येने महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक आणि ग्रामस्थ सहभागी झाले.

### ग्रामस्थांचा संतप्त सवाल

‘गौण खनिजाच्या वाहनांना रस्ता आहे; पण गावकऱ्यांच्या जीवाची किंमत नाही का?’ रस्त्याच्या दुरवस्थेमुळे अपघातांची मालिका सुरू असतानाही प्रशासनाने कानाडोळा केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. ‘आता तातडीने काम सुरू झाले नाही, तर आंदोलन आणखी तीव्र केले जाईल,’ असा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला.


---

# ‘विकास’ झाला पण शेतकऱ्यांचा रस्ताच गायब!

## चंद्रीका नदीवरील बंधाऱ्यामुळे शेकडो एकर शेती संपर्कविहीन
## अधिकारी-ठेकेदारांच्या आश्वासनांवर शेतकऱ्यांचा संताप

■ प्रतिनिधी | अकोट ■

शेतकऱ्यांच्या हितासाठी उभारण्यात आलेल्या बंधाऱ्यानेच शेतकऱ्यांचा शेताशी असलेला संपर्क तोडल्याची धक्कादायक बाब अकोट तालुक्यातील मुंडगाव व अमिनपुर येथे समोर आली आहे. चंद्रीका नदीवरील बंधाऱ्याच्या कामामुळे अनेक वर्षांपासून वापरात असलेला शेतरस्ता बंद झाल्याने शेकडो एकर शेतीत जाण्यासाठी शेतकऱ्यांना कोणताही मार्ग उरलेला नाही. यामुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी मृद व जलसंधारण विभागाच्या उपविभागीय अधिकाऱ्यांकडे धाव घेत तातडीने रस्ता उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.



मुंडगाव व अमिनपुर परिसरातील शेतकरी वर्षानुवर्षे नदीलगतच्या भरावावरून शेतात ये-जा करीत होते. शेतीमालाची वाहतूकही याच मार्गाने होत होती. मात्र, उन्हाळ्यात मृद व जलसंधारण विभागामार्फत चंद्रीका नदीवर बंधारा उभारताना नदीपात्राचे खोलीकरण करण्यात आले. त्यामुळे रस्त्याच्या ठिकाणी पाणी साचून संपूर्ण मार्गच बंद पडला. शेतकऱ्यांचा आरोप आहे की, काम सुरू होण्यापूर्वी अधिकारी आणि ठेकेदारांना रस्ता कायम ठेवण्याची विनंती करण्यात आली होती. त्यावेळी 'यापेक्षा चांगला रस्ता करून देतो,' असे आश्वासन देण्यात आले. मात्र, काम पूर्ण झाले तरी ना रस्ता मिळाला, ना दिलेल्या शब्दाची पूर्तता झाली. उलट शेतकऱ्यांची अडचण आणखी वाढली. दरम्यान, पर्यायी म्हणून वापरला जाणारा दुसराही मार्ग काही व्यक्तींनी काटेरी झुडपे टाकून बंद केल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे ट्रॅक्टर, बैलगाडी तर दूरच, पायीही शेतात जाणे कठीण झाले आहे. खरीप हंगाम सुरू असताना शेतात पोहोचण्यासाठी शेतकऱ्यांना मोठी कसरत करावी लागत असून शेतीकामांवर त्याचा विपरीत परिणाम होत आहे.

या पार्श्वभूमीवर मुंडगाव व अमिनपुर येथील शेतकऱ्यांनी उपविभागीय अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग यांना निवेदन देऊन घटनास्थळी प्रत्यक्ष पाहणी करण्याची मागणी केली आहे. शेतकऱ्यांसाठी तातडीने रस्ता उपलब्ध करून द्यावा तसेच आश्वासन देऊनही रस्ता न करणाऱ्या संबंधित अधिकारी व ठेकेदारावर जबाबदारी निश्चित करून कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. 'विकासकामे शेतकऱ्यांसाठी की शेतकऱ्यांच्या अडचणी वाढविण्यासाठी?' असा सवाल आता या निमित्ताने परिसरात उपस्थित होत असून प्रशासन यावर कोणती भूमिका घेते, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. या निवेदनावर तुषार पाचकोर, प्रमोद गणोरकर, उमेश दोरकर, संतोष दहिभात, दीपक म्हैसने, शेख इक्बाल, विनोद सोनटक्के, प्रल्हाद मुंडोकार, विनोद म्हैसने, अशोक उजिळे, रविंद्र धनोकार, सुहास निन्हाळ, धिरज म्हैसने, शरद म्हैसने, समीर पठाण, पंकज म्हैसने, विजय कडोते, सुयोग काळे, प्रकाश भिरडे, सुरज उजिळे, वसंता ढगे, देवराव मुडोंकार, गजानन मुडोंकार, प्रविण खलोकार, जगीरभाई, विजय जोत, शेख अनिस, अजय पिंपळे, तेजस नावकार, गणेश बावने, सुमित बहादुरे, कैलास थोटे यांच्यासह असंख्य शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

---

# शासकीय दस्तावेज नोंदणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**अकोला :** मारवाडी युवा मंच, अकोला शाखा व खंडेलवाल वैश्य सभाच्या यांच्या संयुक्त विद्यमाने स्थानिक खंडेलवाल भवन येथे नुकतेच संपन्न झालेल्या एकदिवसीय शासकीय दस्तावेज नोंदणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.या शिबिरात समाज बांधव व नागरिकाना आधार कार्ड,विवाह नोंदणी, ईडब्ल्यूएस प्रमाणपत्र, एनसीएमसी, एसटी बस स्मार्ट कार्ड आदी विविध शासकीय दस्तावेज सेवांचा लाभ एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात आला. शिबिरात ५६० हून अधिक समाजबांधवांनी आपली उपस्थिती दर्शवित विविध शासकीय दस्तावेज प्राप्त करून या शिबिराचा लाभ घेतला.या शिबिराचा प्रारंभ अ भा मारवाडी युवा मंचचे माजी राष्ट्रीय उपाध्यक्ष निकेश गुप्ता, राजस्थानी सेवा संघाचे अध्यक्ष मनोज खंडेलवाल, खंडेलवाल वैश्य सभेचे अध्यक्ष संजय खंडेलवाल, मारवाडी युवा मंच, अकोलाचे अध्यक्ष जितेंद्र बोरा तसेच प्रांतीय उपाध्यक्ष रोहित रुंगटा आदींच्या उपस्थितीत करण्यात आला. निकेश गुप्ता यांनी यावेळी मारवाडी युवा मंचामार्फत समाजहिता साठी राबविण्यात येणाऱ्या विविध सेवा प्रकल्प व उपक्रमांची माहिती देत समाजोपयोगी आणि जनकल्याणकारी उपक्रम सातत्याने आयोजित करण्यात येणार असल्याचे सांगितले.

**Change In Name**

Old Passport No is S090266I Have Change My Name From
**SHAIKH ZAFAR SHAIKH MOOSA**
--TO--
**SHAIKH JAFAR SHAIKH MUSA**
My Residential Address is - Near Bagdad Kirana Shop, Laxmi Nagar, Khair Mohammad Plot, Akola Maharashtra 444002

**Change In Name**

I Have Change My Mother Name in my Educational Documents etc. From
**RAISA KHANAM**
--TO--
**RAISA KHATUN JAVED KHAN**
My Residential Address is - Washim Bypass Near Huseniya Madarsa Riyaz Colony, Akola Maharashtra 444002

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २३६**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# मनपाच्या स्थापना दिनी अकोलेकरांना ई-बसची भेट

■ प्रतिनिधी | अकोला ■

### १ ऑक्टोबरपासून शहरात धावणार ४२ वातानुकूलित बस

अकोलेकरांना अत्याधुनिक, वातानुकूलित आणि सुरक्षित सार्वजनिक वाहतूक उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री ई-बस सेवा योजनेअंतर्गत सुरू होणारी ई-बस सेवा आता १५ ऑगस्टऐवजी अकोला महानगरपालिकेच्या स्थापना दिनी, म्हणजेच १ ऑक्टोबरपासून सुरू होण्याची शक्यता आहे. ही माहिती स्थायी समितीचे सभापती विजय अग्रवाल यांनी दिली.

प्रधानमंत्री ई-बस सेवा योजनेअंतर्गत अकोला शहरासाठी १२ मीटर लांबीच्या १४ आणि ९ मीटर लांबीच्या २८, अशा एकूण ४२ ई-बस मंजूर झाल्या आहेत. या बसमुळे शहरातील नागरिकांना अत्यल्प दरात आधुनिक, वातानुकूलित व सुरक्षित प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे. या योजनेसाठी खासदार अनुप धोत्रे आणि आमदार रणधीर सावरकर यांनी विशेष प्रयत्न केल्याचे सांगण्यात आले. सुरुवातीला ही सेवा १५ ऑगस्टपासून सुरू करण्याचे नियोजन होते. मात्र, प्रशासकीय इमारत, कार्यशाळा (वर्कशॉप) परिसर तसेच इलेक्ट्रिक सब-स्टेशनची कामे अद्याप पूर्ण न झाल्यामुळे उद्घाटन पुढे ढकलण्यात आले आहे. संबंधित सर्व कामे अंतिम टप्प्यात असून ती सप्टेंबरअखेरपर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. कामे वेळेत पूर्ण झाल्यास अकोला महानगरपालिकेच्या स्थापना दिनाचे औचित्य साधून १ ऑक्टोबरपासून ई-बस सेवा सुरू करण्याचा मानस असल्याचे विजय अग्रवाल यांनी स्पष्ट केले.

---

**जाहीर नोटीस**

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ११५५/२०२६ — प्रोसेस नं.९३४०/२०२६
चौ.ता. २९/०८/२०२६ — दिनांक : २२/०७/२०२६

**अर्जदार :** १. पंजाब अंबादास जुमळे २. सुनिता पंजाबराव जुमळे ३. दुर्गा सुनिल जुमळे ४. भुमिका सुनिल जुमळे ५. रियांशी सुनिल जुमळे रा. आपोती खुर्द, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : सुनिल पंजाबराव जुमळे
**पत्ता :-** रा. आपोती खुर्द, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सुनिल पंजाबराव जुमळे यांचे दि. २६/०३/२०२६ रोजी आपोती खुर्द, ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २९/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २२/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १२७४/२०२६ — प्रोसेस नं.९८३७/२०२६
चौ.ता. ११/०९/२०२६ — दिनांक : ३१/०७/२०२६

**अर्जदार :** १. भावेश नविनचंद्र बाविशी २. मिरल नविनचंद्र बाविशी दोघेही रा. अरिहंत बंगलो, सत्संग भवन जवळ, गोयनका नगर, न्यु राधाकिशन प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला. ३. सौ. लिना जयेश मेहता रा. १७०६, रस्तोमंजी एक्सलेन्सी, आदर्श लेन, मालाड वेस्ट, मुंबई ४. सौ. नेहल देवांग मतालिया रा. प्लॉट नं. २५६, ब्लॉक नं. १०, २ रा माळा, मृदुला मॅन्शन, रोड नं. १९, वडाळा, मुंबई.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : इला नविनचंद्र बाविशी
**पत्ता :-** रा. न्यु राधाकिशन प्लॉट, अकोला, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत इला नविनचंद्र बाविशी यांचे दि. ०२/०७/२०२६ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही.सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ११/०९/२०२६ रोजी सकाळी १:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ३१/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १२०५/२०२६ — प्रोसेस नं.९६९०/२०२६
चौ.ता. १५/०९/२०२६ — दिनांक : २९/०७/२०२६

**अर्जदार :** १. अमरसिंग गणपतसिंग काकन उर्फ ठाकूर २. मंगला गणपतसिंग काकन उर्फ ठाकूर दोघेही रा. मसने वाडी, लहान उमरी, रेल्वे गेट जवळ, अकोला. ता. जि. अकोला. मो. नं. ८९९९५७९९७१

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : शांताबाई गणपतसिंग काकन उर्फ ठाकूर
**पत्ता :-** रा. मसने वाडी, लहान उमरी, रेल्वे गेट जवळ, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की,मयत शांताबाई गणपतसिंग काकन उर्फ ठाकूर यांचे दि. १५/०६/२०२६ रोजी ओझोन हॉस्पिटल, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक. १५/०९/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २९/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १२२४/२०२६ — प्रोसेस नं.९४२८/२०२६
चौ.ता. ३१/०८/२०२६ — दिनांक : २३/०७/२०२६

**अर्जदार :** १. रेखाताई शंकरराव मोहोकार, २. सचिन शंकरराव मोहोकार ३. भुषण शंकरराव मोहोकार, सर्व रा. माउली बिल्डींग द्वारका नगरी, सोनोने हॉस्पीटल जवळ, जवाहर नगर, अकोला, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : शंकरराव भगवंतराव मोहोकार
**पत्ता :-** रा. माउली बिल्डींग द्वारका नगरी, सोनोने हॉस्पीटल जवळ, जवाहर नगर, अकोला, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत शंकरराव भगवंतराव मोहोकार यांचे दि. १०/०६/२००२ रोजी मानकर क्रिटीकल केअर, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक. ३१/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २३/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# वैद्यकीय शिक्षणाच्या दर्जाशी तडजोड मान्य नाही

## होमिओपॅथी पदवीधारकांना आधुनिक वैद्यक मंडळात नोंदणी देण्यास इंडियन मेडिकल असोसिएशनचा विरोध

### आयएमएचे जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना साकडे



**वर्धा/जनमाध्यम**

आधुनिक वैद्यकशास्त्राची गुणवत्ता, वैज्ञानिकता आणि रुग्णांची सुरक्षितता धोक्यात आणणारा कोणताही निर्णय शासनाने घेऊ नये, अशी ठाम भूमिका मांडत इंडियन मेडिकल असोसिएशनच्या वर्धा शाखेने मंगळवारी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन सादर केले. होमिओपॅथीची पदवी घेतल्यानंतर आधुनिक औषधशास्त्राचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या डॉक्टरांना महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलमध्ये नोंदणी देण्याच्या प्रस्तावाला संघटनेने तीव्र विरोध दर्शविला आहे.

इंडियन मेडिकल असोसिएशनच्या महाराष्ट्र राज्य शाखेने दिलेल्या राज्यव्यापी आंदोलनाच्या हाकेला प्रतिसाद देत वर्धा शाखेतील डॉक्टरांनी आंदोलनात सहभाग घेतला. मात्र, रुग्णहिताला सर्वोच्च प्राधान्य देत आपत्कालीन सेवा, अतिदक्षता विभाग, अपघातग्रस्तांवरील उपचार, प्रसूती सेवा आणि इतर सर्व जीवनावश्यक आरोग्यसेवा अखंडित सुरू ठेवण्यात आल्याचे संघटनेने स्पष्ट केले.

निवेदनात म्हटले आहे की, आधुनिक वैद्यकशास्त्र हे वैज्ञानिक संशोधन, सखोल शिक्षण, दीर्घकालीन प्रशिक्षण आणि प्रत्यक्ष रुग्णसेवेच्या अनुभवावर आधारित आहे. वैद्यकीय पदवी, अनिवार्य प्रशिक्षण आणि आवश्यक पात्रता पूर्ण केल्यानंतरच आधुनिक वैद्यकाचा स्वतंत्र सराव करण्याची परवानगी दिली जाते. अशा परिस्थितीत केवळ अल्पकालीन प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या आधारे होमिओपॅथी पदवीधारकांना आधुनिक वैद्यक मंडळात नोंदणी देणे हे वैद्यकीय शिक्षणाच्या दर्जाला धक्का देणारे असून रुग्णांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनेही गंभीर ठरू शकते.

या विषयावर इंडियन मेडिकल असोसिएशनसह निवासी डॉक्टर संघटना, विविध तज्ज्ञ डॉक्टरांच्या संघटना आणि वैद्यकीय क्षेत्रातील अनेक संस्थांनी शासनाकडे वारंवार निवेदने देऊन भूमिका स्पष्ट केली आहे. तरीही या गंभीर विषयाकडे अपेक्षित गांभीर्याने लक्ष दिले जात नसल्याची खंत संघटनेने व्यक्त केली.

संघटनेने शासनाकडे होमिओपॅथी पदवीधारकांना आधुनिक वैद्यक मंडळात नोंदणी देण्याचा प्रस्ताव तातडीने मागे घेण्याची, आधुनिक वैद्यकशास्त्राची गुणवत्ता आणि कायदेशीर मानके कायम राखण्याची, तसेच आधुनिक वैद्यकाचा सराव केवळ कायदेशीर पात्रता असलेल्या आणि नोंदणीकृत वैद्यकीय पदवीधारकांनाच करण्याची परवानगी देण्याची मागणी केली आहे. याशिवाय, अशा महत्त्वपूर्ण धोरणात्मक निर्णयांपूर्वी इंडियन मेडिकल असोसिएशन आणि इतर मान्यताप्राप्त वैद्यकीय संघटनांशी सविस्तर चर्चा करण्याचीही मागणी करण्यात आली आहे.

इंडियन मेडिकल असोसिएशनची ही भूमिका कोणत्याही वैद्यकीय शाखेविरोधात नसून राज्यातील नागरिकांच्या आरोग्यसुरक्षेच्या संरक्षणासाठी, रुग्णांच्या हितासाठी आणि आधुनिक वैद्यकीय शिक्षणाचा उच्च दर्जा कायम राखण्यासाठी असल्याचे संघटनेने स्पष्ट केले. यावेळी वर्धा शाखेचे अध्यक्ष डॉ. प्रदीप सुने आणि सचिव डॉ. विवेक चाकोले यांच्या नेतृत्वात निवेदन सादर करण्यात आले.

# पीकविमा अर्जास १० ऑगस्टपर्यंत मुदतवाढ; शेतकऱ्यांना मोठा दिलासा

## राज्यात आतापर्यंत ६१.८२ लाख शेतकऱ्यांची नोंदणी, उशिरा झालेल्या पेरणीमुळे निर्णय



**वर्धा/जनमाध्यम**

पंतप्रधान पीकविमा योजनेत सहभागी होण्यासाठी शेतकऱ्यांना मोठा दिलासा देत अर्ज करण्याची अंतिम मुदत ३१ जुलैवरून १० ऑगस्टपर्यंत वाढविण्यात आली आहे. राज्य सरकारने केलेल्या प्रस्तावाला केंद्र सरकारने मंजुरी दिल्यानंतर हा निर्णय लागू झाला असून, वर्धा जिल्ह्यासह राज्यातील हजारो शेतकऱ्यांना याचा लाभ होणार आहे.

यंदा राज्यात मान्सूनचे आगमन उशिरा झाल्याने अनेक भागांत पेरण्या रखडल्या होत्या. त्यामुळे मोठ्या संख्येने शेतकरी पीकविमा योजनेत वेळेत सहभागी होऊ शकले नव्हते. ही बाब लक्षात घेऊन राज्य सरकारने मुदतवाढीचा प्रस्ताव केंद्राकडे पाठविला होता. त्यास मंजुरी मिळाल्याने आता १० ऑगस्टपर्यंत अर्ज करता येणार आहेत. खरीप हंगामात भात, ज्वारी, बाजरी, नागली, मूग, उडीद, तूर, मका, भुईमूग, तीळ, कारळे, सोयाबीन, कापूस आणि खरीप कांदा या १४ पिकांसाठी पीकविमा योजनेचा लाभ घेता येणार आहे. नैसर्गिक आपत्ती, अतिवृष्टी, पूर, दुष्काळ, गारपीट तसेच हवामानातील बदलांमुळे होणाऱ्या पिकांच्या नुकसानीपासून आर्थिक संरक्षण मिळवून देणारी ही महत्त्वाची योजना मानली जाते.

राज्यातील शेतकऱ्यांचा योजनेकडे वाढता प्रतिसादही यानिमित्ताने दिसून आला आहे. आतापर्यंत ६१ लाख ८२ हजार २१८ शेतकऱ्यांनी पीकविम्यासाठी नोंदणी केली असून, केवळ एका दिवसात सुमारे आठ लाख शेतकऱ्यांनी सहभाग नोंदविल्याची माहिती कृषी आयुक्तालयाने दिली आहे.

दरम्यान, वर्धा जिल्ह्यातील ज्या शेतकऱ्यांना कागदपत्रांची पूर्तता किंवा इतर कारणांमुळे अर्ज करता आला नव्हता, त्यांनी १० ऑगस्टपूर्वी अर्ज प्रक्रिया पूर्ण करून पीकविमा योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

## संक्षिप्त

### पर्समधून सोन्याचे दागिने लंपास

**हिंगणघाट**-बसस्थानक परिसरात बसमध्ये चढण्याच्या गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने महिलेच्या पर्समधील सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना घडली. हिवरा येथील लता शंकर राहाटे (५६) या नागपूर येथे आजारी असलेल्या मुलाला भेटण्यासाठी जात होत्या. बस फलाटावर लागताच त्या बसमध्ये चढल्या. काही वेळाने पर्स तपासली असता सोन्याची पोत व लॉकेट असा सुमारे २१ हजार १९० रुपयांचा ऐवज चोरीला गेल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी तातडीने हिंगणघाट पोलिस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली. पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून बसस्थानक परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपीचा शोध सुरू केला आहे.

○ ○ ○ ○

### सांडपाण्याच्या पाईपवरून वाद

**हिंगणघाट**-तालुक्यातील वणी छोटी येथे सांडपाण्याचा पाईप टाकण्याच्या कारणावरून दोन पक्षांमध्ये वाद होऊन एका व्यक्तीला मारहाण करण्यात आली. या घटनेत प्रवीण माधव खंडारे (३६) हे जखमी झाले. पाईप टाकण्यावरून झालेला वाद काही वेळातच उग्र झाला आणि त्यातून मारहाणीची घटना घडल्याचे पोलिसांनी सांगितले. जखमीने दिलेल्या तक्रारीनुसार सुनिल तुळशीराम खंडारे याने शिवीगाळ करीत मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. जखमीवर उपचार करण्यात आले असून त्याची प्रकृती धोक्याबाहेर असल्याचे सांगण्यात आले. हिंगणघाट पोलिसांनी संबंधित आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून घटनेचा अधिक तपास सुरू आहे.

○ ○ ○ ○

### घराच्या आवारातून दुचाकीची चोरा

**सेलू**- तालुक्यातील किन्हाळा येथे घराच्या आवारात उभी असलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. जीवन लालसिंग चव्हाण (३६) यांनी नेहमीप्रमाणे दुचाकी घराच्या आवारात उभी केली होती. काही वेळाने वाहन जागेवर नसल्याचे लक्षात येताच त्यांनी परिसरात शोध घेतला; मात्र दुचाकीचा मागमूस लागला नाही. त्यानंतर दहेगाव पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तसेच संशयितांच्या हालचालींची माहिती गोळा केली जात असून दुचाकी चोरीच्या वाढत्या घटनांमुळे नागरिकांनी वाहन सुरक्षित ठिकाणी उभे करण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

○ ○ ○ ○

### अवैध रेतीवाहतुकीवर पोलिसांचा घाला

**अल्लीपूर**- पोलिसांनी अवैध रेती वाहतुकीविरुद्ध धडक कारवाई करत अलमडोह-रोहणखेडा मार्गावर रेतीने भरलेला ट्रॅक्टर पकडला. कारवाईदरम्यान ट्रॅक्टर, ट्रॉली व रेती असा सुमारे ६ लाख ७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणी विकास मारोतराव बावणे व अनुप साळवे (दोघे रा. अलमडोह) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिल्ह्यात अवैध रेती उत्खनन व वाहतुकीवर नियंत्रण आणण्यासाठी पोलिस आणि महसूल प्रशासनाकडून संयुक्त कारवाया सुरू असून अशा कारवाया पुढेही सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

○ ○ ○ ○

### लग्न जुळत नसल्याने आत्महत्या

**सेलू**- तालुक्यातील जयपूर येथे राहणाऱ्या ४० वर्षीय व्यक्तीने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली. ज्ञानेश्वर श्रावण वानखेडे हे काही काळापासून लग्न जुळत नसल्याने तसेच पायाच्या सूजेच्या त्रासामुळे मानसिक तणावात असल्याची माहिती समोर आली आहे. त्यांनी राहत्या घरात गळफास घेतल्याचे कुटुंबीयांच्या निदर्शनास येताच त्यांना खाली उतरविण्यात आले; मात्र तोपर्यंत त्यांचा मृत्यू झाला होता. घटनेची माहिती मिळताच सेलू पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविला.

○ ○ ○ ○

### विहिरीत वृद्धाचा मृतदेह

**समुद्रपूर** - शहरातील वॉर्ड क्रमांक १४ परिसरातील विहिरीत एका वृद्धाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. मृताची ओळख चिंधुजी दत्तूजी गुरनुले, रा. समुद्रपूर अशी पटली. सकाळच्या सुमारास नागरिकांना विहिरीत मृतदेह दिसताच त्यांनी पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह बाहेर काढून पंचनामा केला. शवविच्छेदनासाठी मृतदेह ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला आहे.

# देशसेवेची स्वप्ने साकार करणाऱ्या 'जवान' प्रशिक्षण केंद्राचा प्रेरणादायी प्रवास

## सहाव्या वर्धापन दिनानिमित्त प्रशिक्षणार्थ्यांचा गौरव



**वर्धा/जनमाध्यम**

तरुणांमध्ये देशभक्ती, शिस्त आणि सेवाभावाची जाणीव रुजवत अनेक युवक-युवतींची स्वप्ने साकार करणाऱ्या जवान डिफेन्स प्रशिक्षण केंद्राचा सहावा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी संरक्षण दल, महाराष्ट्र पोलीस, राज्य राखीव पोलीस दल, अग्निवीर, मर्चंट नेव्ही, भारतीय रेल्वे तसेच विविध शासकीय सेवांमध्ये निवड झालेल्या प्रशिक्षणार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

माजी सैनिक प्रवीण पेठे यांनी केवळ तीन प्रशिक्षणार्थ्यांपासून सुरू केलेले हे केंद्र आज अनेक युवकांना देशसेवेची प्रेरणा देत आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष सुधीर पांगुळ होते. त्यांनी देशासमोरील आव्हानांचा सामना करण्यासाठी शिस्तबद्ध व राष्ट्रनिष्ठ युवकांची गरज अधोरेखित करत प्रशिक्षण केंद्राच्या कार्याचे कौतुक केले. निवृत्त वायुसेना अधिकारी यशवंत तीनगसे यांनी संरक्षण दलातील रोजगाराच्या संधींबाबत मार्गदर्शन केले, तर मिलिंद जूनगडे यांनी स्पर्धा परीक्षांच्या तयारीविषयी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

यावेळी मीनाक्षी गिरी, पूजा लष्कर, शंतनु फुके, साहिल चहारे, शुभम घुगे, शिवम युवनाथे, अंकुश मर्कंडकर, प्रतीक दिघाडे, स्वप्निल गेडाम, बिपाशा दारुंडे आणि सुमित काळे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास आजी-माजी प्रशिक्षणार्थी, पालक आणि नागरिकांची मोठी उपस्थिती होती.

# कारचालकावर चाकूने जीवघेणा हल्ला

**हिंगणघाट/वार्ताहर**

शहरातील मजूमदार वॉर्ड परिसरात क्षुल्लक कारणावरून झालेल्या वादाचे पर्यवसान चाकूहल्ल्यात झाले. या घटनेत कारचालक पवन रविंद्र गायकवाड (२७, रा. हिंगणघाट) गंभीर जखमी झाला. किरकोळ कारणावरून दोघांमध्ये शाब्दिक बाचाबाची झाली. त्यानंतर संतापाच्या भरात आरोपीने धारदार चाकूने हल्ला केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. जखमीवर तत्काळ उपचार करण्यात आले असून त्याची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात आले.

या प्रकरणी पवन गायकवाड यांच्या तक्रारीवरून हिंगणघाटच्या शास्त्री वॉर्डातील आवेश कदीर खॉ पठाण (२०) याच्याविरुद्ध हिंगणघाट पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. घटनेमागील नेमके कारण आणि वादाची पार्श्वभूमी जाणून घेण्यासाठी पोलिसांकडून अधिक तपास सुरू असून आरोपीचा शोधही घेतला जात आहे.

# व्हॉइस ऑफ मिडिया पत्रकार संघटनेची सिंदी रेल्वे कार्यकारिणी जाहीर

## प्रशांत कलोडे अध्यक्ष, बबलू खान सचिवपदी बिनविरोध



**सिंदी रेल्वे/जनमाध्यम**

व्हॉइस ऑफ मिडिया पत्रकार संघटनेच्या सिंदी रेल्वे येथील नवीन कार्यकारिणीची निवड राज्य कार्याध्यक्ष नरेंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आनंद छाजेड यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीत एकमताने करण्यात आली. संघटनेच्या राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे यांनी केलेल्या संघटनात्मक बदलानुसार नवीन कार्यकारिणीची स्थापना करण्यात आली.

यामध्ये अध्यक्षपदी प्रशांत कलोडे, तर सचिवपदी बबलू खान यांची बिनविरोध निवड करण्यात आली. तसेच कार्यकारिणी सदस्य म्हणून ओमप्रकाश राठी, आनंद छाजेड, मोहन सुरकार, अमोल सोनटक्के, नरेंद्र सुरकार, प्रशांत बोरीकर, गुल्लू भन्साली आणि आफताब कुरेशी यांची निवड करण्यात आली. बैठकीनंतर नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. नव्या कार्यकारिणीच्या माध्यमातून पत्रकारांचे प्रश्न सोडविणे,संघटन अधिक सक्षम करणे आणि पत्रकार हितासाठी प्रभावीपणे कार्य करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांवर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# एअर इंडिया इमारतीच्या नुतनीकरणात लोकाभिमुख प्रशासकीय रचनेला प्राधान्य द्यावे-मुख्यमंत्री



**मुंबई/जनमाध्यम**

राज्य शासनाच्या विविध शासकीय विभागांच्या अधिक गतिमान आणि सुलभ कार्यपद्धतीच्या दृष्टीने एअर इंडिया इमारतीचे नुतनीकरण करण्यात येणार आहे. नूतनीकरण करताना लोकाभिमुख प्रशासकीय रचनेला प्राधान्य देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे दिले. मुख्यमंत्र्यांच्या वर्षा शासकीय निवासस्थानी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली एअर इंडिया इमारतीसंदर्भातील सादरीकरण करण्यात आले, त्यावेळी त्यांनी संबंधितांना निर्देशित केले. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले,राज्यमंत्री इंद्रनील नाईक, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह अन्य संबंधित वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, मुख्य सचिव यांनी याबाबत संबंधितांची एक बैठक घेऊन सविस्तर चर्चा करुन सुयोग्य नियोजन करावे. विविध शासकीय विभागांतील कोणत्या विभागांचे स्थलांतर एअर इंडियाच्या नुतनीकरण इमारतीत करणे हे प्रशासकीय आणि नागरिकांच्या दृष्टीने सोयीचे ठरेल हे पाहावे. या ठिकाणी प्रशासकीय कार्यपद्धती ही सुलभ आणि लोकाभिमुख होईल यास प्राधान्य द्यावे. त्यानंतर याबाबत अंतिम निर्णय घेण्यात येईल. वित्त विभागाचे अप्पर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, विकास चंद्र रस्तोगी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, सामान्य प्रशासन विभागाचे सचिव (विशेष चौकशी अधिकारी) पंकज कुमार, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंता प्रज्ञा वाळके; तसेच अन्य संबंधित वरिष्ठ अधिकारी, वास्तुविशारद उपस्थित होते. संभाव्य नुतनीकरण आराखड्यांचे सादरीकरण संबंधित वास्तुविशारदांद्वारे करण्यात आले.

# राजस्थानी मंडळाचा ४६ वा वार्षिकोत्सव उत्साहात गुणवंतांचा गौरव



**सिंदी रेल्वे/जनमाध्यम**

श्रावण महिन्याच्या पावन वातावरणात राजस्थानी मंडळाचा ४६ वा वार्षिकोत्सव झिलपी (मोहगाव) येथील गणपती देवस्थान सभागृहात रविवारी उत्साहात झाला. दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. दिवसभर विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक उपक्रमांनी वातावरण भक्तिमय झाले. कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून गोंदियाचे समाजसेवक विनोद अग्रवाल यांनी मार्गदर्शन करताना, संघटनामुळे समाजासाठी कार्य करण्याची ताकद मिळते. सदस्यांच्या सहकार्यामुळेच सामाजिक दायित्व प्रभावीपणे पार पाडता येते. त्यामुळे संघटन टिकविणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे, असे प्रतिपादन केले. अध्यक्षस्थानी राधेश्याम पाटोदिया तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. दिलीप बेताला उपस्थित होते.

यावेळी मंडळातील इयत्ता दहावी, बारावी व एमबीबीएस परीक्षेत यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांसह सीए झालेल्या दर्शन आनंद छाजेड यांचा पालकांसह सत्कार करण्यात आला. तसेच समाजसेवा, शिक्षण, पत्रकारिता, सांस्कृतिक क्षेत्र आणि महिला सक्षमीकरणात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या विविध मान्यवरांचाही सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राजस्थानी मंडळाच्या महिला व पुरुष सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. सामाजिक ऐक्य,संस्कार आणि परंपरेचा संगम घडविणाऱ्या या वार्षिकोत्सवाला समाजबांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# नशामुक्त भारताचे स्वप्न साकारण्यासाठी युवक एकवटले

## माय भारत व बजाज सायन्स कॉलेजचा उपक्रम; राज्यस्तरीय स्पर्धांसाठी विजेत्यांची निवड



**वर्धा/जनमाध्यम**

'व्यसनमुक्त युवकच विकसित भारताचा खरा पाया आहेत,' हा सामाजिक संदेश देत माय भारत (वर्धा) आणि बजाज सायन्स कॉलेज, वर्धा यांच्या संयुक्त विद्यमाने 'नशा मुक्त भारत अभियान २०२६' अंतर्गत जिल्हास्तरीय विविध स्पर्धांचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

विकसित भारतासाठी नशामुक्त युवा या संकल्पनेवर आधारित झालेल्या या उपक्रमाला जिल्हाभरातील १५ ते २९ वयोगटातील युवक-युवतींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ.पी.व्ही. टेकाडे आणि निसर्ग सेवा समितीचे मुरलीधर बेलखोडे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून झाले.

प्रास्ताविकात जिल्हा युवा अधिकारी सुनील भड यांनी अभियानाचे महत्त्व अधोरेखित केले. प्राचार्य डॉ. टेकाडे यांनी महात्मा गांधींच्या व्यसनमुक्त समाजाच्या विचारांची आठवण करून देत युवकांना सर्व प्रकारच्या व्यसनांपासून दूर राहण्याची शपथ दिली. बेलखोडे यांनी व्यसनमुक्तीचा संदेश प्रत्येक तरुणापर्यंत पोहोचविण्याचे आवाहन केले.

संगीत, रॅप, संकल्पनात्मक नृत्य, लघुपट, पथनाट्य,काव्य सादरीकरण, वक्तृत्व, चित्रकला आणि ऑनलाइन घोषवाक्य लेखन अशा विविध स्पर्धांमधून युवकांनी सामाजिक बांधिलकी, सर्जनशीलता आणि कलागुणांचे प्रभावी दर्शन घडविले. मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना गुणवत्ता प्रमाणपत्रे आणि ट्रॉफी प्रदान करण्यात आल्या. या स्पर्धेतील विजेते आता राज्यस्तरीय स्पर्धेत जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार असून, कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी माय भारत आणि बजाज सायन्स कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातील अधिकारी, स्वयंसेवक, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २४९**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

## जाहीर नोटीस

**विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र.३७०/२०२६ ने.ता.१७.०९.२०२६

अर्जदार : १. **लजीना बी हमीद खा,** वय ५१ वर्षे, व्यवसाय- घरकाम
रा.घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
२. **फिरोज खान हमीद खा,** वय ३० वर्षे, व्यवसाय-मजूरी
रा.घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
३. **अस्मा परवीन अब्दुल मलिक,** वय ३३ वर्षे, व्यवसाय-घरकाम
रा.माहुली जहागिर, ता. व जि.अमरावती
४. **नाजेमा परवीन शेख दानिश,**वय ३४ वर्षे, व्यवसाय-घरकाम
रा.शिरजगांव बंड, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
५. **रेशमा बानो मोहम्मद अनीस,** वय ३१ वर्षे, व्यवसाय-घरकाम
रा.शिरजगांव बंड, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार वरील ठिकाणी राहतात.**मृतक हामीद खा रशीद खा** यांचा मृत्यू दिनांक **१२.११.२०२४** रोजी रा.घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे.

यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदारांना मय्यताचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरीता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.३७०/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.३१.०७.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय , चांदूर बाजार

## सायटेशन/जाहीरनामा

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.५०७/२०२६ ने.ता.३१.०८.२०२६

अर्जदार - १. **श्रीमती रेखा दिपक भुयार,** वय ६० वर्षे, धंदा - घरकाम
रा.खानापुर, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --

**कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदाराने वि.दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर) चांदूर मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदारांप्रमाणे अर्जदाराचे पती नामे दिपक वामनराव भुयार हे दिनांक ०२/०६/२०२६ रोजी खानापुर, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मय्यत झालेली आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरिल अर्जदाराशिवाय इतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एक महिन्याचे आत वि.न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कुणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कारवाई करण्यात येईल.

**दिनांक- २८/०७/२०२६**

शिक्का

आदेशानुसार,
**(सहाय्यक अधीक्षक)**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

**CHANGE IN NAME**

**Old Name**
MOHAMMAD YASEEN ARAFAT MOTIWALA KACHCHI

**New Name**
YASEEN ARAFAT MAQSOOD MOTIWALA

Mobile no : 9420222434

**फ्लॅट विकणे आहे**

टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल आणि एक रूम असा फ्लॅट आहे.

**संपर्क:**
**९४२२८५७१६९, ९४२२९१८५६९**

**HOLY CROSS CONVENT ENGLISH HIGH SCHOOL, AMRAVATI**
Run by The Amravati Crucelian Society, Amravati.
100% Granted Minority

**WANTED TEACHER FOR CLEAR VACANCIES LADIES ONLY (SHIKSHAN SEVIKA)**

**B.A., B.Ed. (Shikshan Sevika - English, Social Science and Sanskrit (Std.IX, X)**

**Requirement**

1) SSC, HSC, Graduation and B.Ed.Degree, along with the relevant Certificates and Mark List (Xerox Copies)
2) Original Certificate must be produced on the day of the Oral Interview.
3) MSCIT Certificate
4) Fluency in spoken and written English with good reading skill.

**NOTE**

1. Candidates must submit documents on 20th August 2026 between 10.00 a.m. to 12.00 noon at Holy Cross Convent Mother House Camp, Amravati while appearing for the oral interview.
2. The date of the demo will be intimated on the interview day.
3. Preference will be given to candidates who have completed education through English medium.

**HEAD MISTRESS
HOLY CROSS CONVENT ENGLISH HIGH SCHOOL, AMRAVATI.**

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ४थे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१४९४/२०२६
**श्रीमती पंचफुला अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.२७.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार : 1. Smt.Panchafula Wamanrao Kawanpure, Age 71 Yrs. Occu.: Household
2. Baalu Wamanrao Kawanpure, Age 55 Yrs. Occu.: Labour
R/o Shaskiya Vasahat, Nandgaon Peth, Tq. Dist. Amravati
3. Raju Wamanrao Kawanpure, Age 48 Yrs. Occu.: Labour
R/o Wadali Bus Stop, Near Bhoipura, Amravati.
4. Gopal Wamanrao Kawanpure, Age 46 Yrs. Occu.: Labour
Appli.1 & 4 R/o Bhoipura, Nandgaon Peth, Amravati.

-- विरुध्द --

गैरअर्जदार : NIl

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Wamanrao Punaji Kawanpure हे दिनांक **२२.०५.२०२३** रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Smt.Panchafula Wamanrao Kawanpure+3 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Smt.Panchafula Wamanrao Kawanpure+3 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२९.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक- प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ३२८**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८

**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## सायटेशन/जाहीरनामा

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.५०९/२०२६ ने.ता.०१.०९.२०२६

अर्जदार - १. **श्रीमती छाया प्रमोदराव राऊत,** वय ५४ वर्षे, धंदा - घरकाम
२. **श्री सुमित प्रमोदपंत राऊत,** वय ३६ वर्षे, धंदा - शेती
दोघेही रा.तळणी, ता.मोर्शी, जि.अमरावती
३. **सौ.शुभांगी वैभव इंगोले,** वय ३४ वर्षे, धंदा - घरकाम
रा.प्रियंका कॉलनी, अमरावती, ता.जि.अमरावती
४. **सौ.सुखदा प्रफुल्ल वानखडे,** वय ३१ वर्षे, धंदा - घरकाम
रा.दुर्गा नगर, मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --

**कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदारांनी वि.दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर) चांदूर मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदारांप्रमाणे अर्जदार नं.१चे पती तर अर्जदार नं.२ ते ४ चे वडिल नामे प्रमोद भागवतराव राऊत हे दिनांक २२/०५/२०२६ रोजी **P.D.M.C. Hospital Amravati, Tq. & Dist. Amravati** येथे मय्यत झालेले आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरिल अर्जदाराशिवाय इतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एक महिन्याचे आत वि.न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कुणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कारवाई करण्यात येईल.

**दिनांक- ०१/०७/२०२६**

शिक्का

आदेशानुसार,
**(सहाय्यक अधीक्षक)**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

## जाहीर नोटीस

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

**आर.एम.जे.सी.क्र.३६३/२०२६ ने.ता.११.०९.२०२६**

अर्जदार : १. **विजय केशवराव धोंडे,** वय ५९ वर्षे, व्यवसाय- शेती
२. **उज्वल केशवराव धोंडे,** वय ५४ वर्षे, व्यवसाय- शेती
रा.इनायतपुर, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार वरील ठिकाणी राहतात. **मृतक केशवराव रामराव धोंडे** यांचा मृत्यू दिनांक **१८.०१.२०१५** रोजी रा.इनायतपुर, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे. तसेच **मृतक लिलाबाई केशवराव धोंडे** यांचा मृत्यू **दि.२९/११/२०१०** रोजी रा.इनायतपुर, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे.

यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदारांना मय्यताचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरीता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.३६३/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.२९.०७.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय,चांदूर बाजार

## नोटीस

**BR.No. 598/2026**
**Date-23/07/2023**

(नियमक्रम २१, नियम २२ नमुना क्रमांक ७, परिशिष्ट ई, अनुसूची १)

**चांदूर बाजार येथील वि.दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) यांचे न्यायालय**

**Regular Darkhast No. 13/2025** **F. F. 18/08/2026**

**Decree Holder** :- **रजनी वानखडे**
**-against-**
**Judgement Debtor** :- **भिमराव चरपे + ५**

**Banam :-**
१. **मनोहर नारायण चरपे,**
**रा.करजगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती**
२. **श्रीमती लताबाई भुपती चरपे**
३. **सौ.पूनम गणेशराव देशमुख**
४. **सौ.निलम किशोरराव वाघमारे**
**रा.रुख्मीणी नगर, अमरावती, ता.जि.अमरावती**

ज्याअर्थी, धनको याने वाद क्रमांक **R.C.S.No. 86/2021 Date of Order 04/02/2025** यातील हुकुमनामा आपणांस लेखी हस्तांतरित करुन देण्यात आलेला आहे. या प्रतिपादनावर सदर हुकुमनामाच्या बजावणीसाठी न्यायालयात दरखास्त दाखल केलेली आहे, त्या अर्थी या लेखावरुन तुम्हास नोटीस देण्यात येते आहे की, बजावणीचा हुकुम का देऊ नये याचे कारण दाखविण्यासाठी दिनांक १८/०८/२०२६ राजी सकाळी १०.३० वा या न्यायालयासमोर तुम्ही हजर व्हावे.

आज दिनांक २२/०७/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

**आदेशानुसार,**
**सहायक अधीक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय,**
**चांदूर बाजार**

**TENDER NOTICE**
**Fully Automatic Collar type pneumatic forming filling sealing machine with four head single stage weigh metric filling (500-100 gm)**

The Government of Maharashtra is implementing the World Bank - funded Hon.Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project. Belora Farmer Producer Company Ltd., GP Belora, Taluka Chandur Bazar, Dist. Amravati is one of the beneficiaries of the project and is inviting offline bids for the above-mentioned machinery. The bid document is available on the project website, **www.smart.mh.org** in the tender and procurement section. The last date for submission of offline bids is **14.08.2026 upto 6.00 PM**. Any updates or notices shall be published on the aforementioned website only.

**Belora Farmer Producer Company Ltd., GP Belora, Taluka Chandur Bazar, Dist.Amravati.**

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ४थे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१४८८/२०२६
**सुनंदा फुले -वि- निरंक**
पुढील ता.२७.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार : 1. Sau.Sunanda Devidas Fule
Age 64 Yrs. Occu.: Household
R/o Behind Primary School, Shegaon. V.M.V.Amravati.

-- विरुध्द --

गैरअर्जदार : NIl

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Rohit Devidas Fule हे दिनांक **१४.१२.२०२५** रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Sau.Sunanda Devidas Fule यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Sau.Sunanda Devidas Fule वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.


आज दिनांक **३०.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

# मोबाईल हॅक; मजुराच्या खात्यातून ९५ हजार गायब

**अमरावती/प्रतिनिधीः-** सायबर गुन्हेगारांनी मोबाईल हॅक करून एका मजुराच्या बँक खात्यातून तब्बल ९५ हजार रुपये ऑनलाइन पद्धतीने काढून घेतल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी गाडगेनगर पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, विलासनगर येथील ३६ वर्षीय मजुराचे स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये खाते आहे. अज्ञात सायबर भामट्याने त्याचा मोबाईल हॅक करून संगणकीय तंत्रज्ञानाचा गैरवापर केला आणि खात्यातील ९५ हजार रुपयांवर डल्ला मारला. व्यवहाराची माहिती मिळताच संबंधिताने तातडीने पोलिसांकडे धाव घेत तक्रार नोंदविली. तक्रारीच्या आधारे गाडगेनगर पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४) तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलम ६६(सी) व ६६(डी) अन्वये अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा माग काढण्यासाठी तांत्रिक तपास सुरू असून सायबर पोलिसांचीही मदत घेतली जात आहे.

**T. C. हरवली आहे**

**निलेश नत्थूजी गाडगे यांची परतवाडा आसेगाव मार्गावर प्रवासादरम्यान T. C. हरवली आहे सदर T. C. सापडल्यास मोबाईल नंबर ९५५२४ ७२७३६ वर संपर्क साधावा. त्यांना योग्य रित्या बक्षीस देण्यात येईल**

**MAHAVITARAN** **'e-TENDER NOTICE'**

Superscribed percentage rate e-tenders are invited from established, reputed, experienced contractors and who are registered for e-tendering with MSEDCL. The offers are invited for various works under CCCM Circle MSEDCL Nagpur vide e-tender specification No.. **SEC/NGP/e-T-03(IInd Call), SEC/NGP/e-T-09(IIIrd Call), e-T-12 IInd call, SEC/NGP/e-T-03( IInd Call),e-T-20 2026-27 to SEC/NGP/e-T-23/2026-27.** The e-tender with all details will be available on MSEDCL's website www.mahadiscom.in from **Dated 05.08.2026 to 11.08.2026 and submission on 12.08.2026 up to 13.00 Hrs. Corrigendum if any will NOT be published** in the newspaper the bidders have to check it on website itself. The right to reject any or all Tender at any stage without assigning any reason whatsoever is reserved by the Superintending Engineer(C), Civil Circle Nagpur. Contact No. 7875760536. (EE (C)Adm.)

**PRO No. NZ/114/2026**
**Dated -04.08.2026**

**Superintending Engineer (C)**
**CCCM Circle, Nagpur.**

## वणी नगर परिषद, कार्यालय, जि.यवतमाळ

क्रमांक- नपव/सा.प्र.विभाग/७७९/२०२६ दिनांक ०४.०८.२०२६

**निविदा सुचना (दुसरी वेळ)**

मुख्याधिकारी, नगर परिषद, वणी, जि.यवतमाळ यांचे वतीने खालील कामाच्या ऑफलाईन द्विलिफाफा पध्दतीने तसेच निविदेतील अटी व शर्तीमध्ये नमुद केल्याप्रमाणे आवश्यक पात्रता पूर्ण करणाऱ्या कंत्राटदार/पुरवठादार यांचेकडून सिलबंद लिफाफ्यामध्ये निविदा मागविण्यात येत आहे. खालील कामांच्या निविदा केवळ दोन लिफाफा पध्दतीने दिनांक ०५.०८.२०२६ ते दिनांक १४.०८.२०२६ रोजी कार्यालयीन वेळेमध्ये नगर परिषदेच्या निविदा पेटीमध्ये सादर करावयाच्या आहेत. निविदेचा विस्तृत नमुना नगर परिषद सामान्य प्रशासन विभागामध्ये दिनांक ०५.०८.२०२६ पासून पहावयास उपलब्ध आहे. कामाचा तपशील खालीलप्रमाणे--

| अ.क्र. | कामाचे नांव |
|---|---|
| १. | नगर परिषद वणी, सामान्य प्रशासन विभाग अंतर्गत लेखा संहितेनुसार स्टेशनरी छपाई करुन पुरवठा करणे. |

**स्वा/-**
**(सौ.विद्याताई खेमराज आत्राम)**
**अध्यक्ष,**
**नगर परिषद, वणी**
**जि.यवतमाळ**

**स्वा/-**
**(श्री.राकेश लक्ष्मण बुग्गेवार)**
**उपाध्यक्ष,**
**नगर परिषद, वणी**
**जि.यवतमाळ**

**स्वा/-**
**(डॉ.सचिन शंकरराव गाडे)**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, वणी**
**जि.यवतमाळ**

## -सायटेशन/जाहीरनामा-

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी**

आर.एम.जे.सी.क्र.५१७/२०२६ ने.ता.०२.०९.२०२६

अर्जदार - १. **श्रीमती कमला सुधाकर चरडे,** वय ७४ वर्षे, धंदा - घरकाम
रा.नेरपिंगळाई, ता.मोर्शी, जि.अमरावती
२. **दादाराव सुधाकरराव चरडे,** वय ४७ वर्षे, धंदा - शेती
रा.भवानी नगर कांडली, ता.अचलपूर, जि.अमरावती
३. **मंगेश सुधाकरराव चरडे,** वय ४५ वर्षे, धंदा - शेती
रा.नेरपिंगळाई, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --

निल (**कुणीही नाही**)

वरील अर्जदाराने वि.दिवाणी न्यायाधीश साहेब, (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत U/S २, बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार क्र.१ चे पती तर अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडिल नामे सुधाकर मोतीराम चरडे यांचा दि. ०५/०२/२०२२ रोजी नेरपिंगळाई, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मृत्यू झाला.तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय तथा निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदारा शिवाय ईतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ०३.०७.२०२६

शिक्का

आदेशान्वये,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय (क.स्तर),मोर्शी

प्रो.क्र.५७२/२०२६

**वारसाचे प्रमाणपत्राबद्दल जाहीरनामा/सायटेशन नोटीस**
**विजय जी.परवरे, दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भातकुली, जि.अमरावती यांच्या न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्रमांक २०२/२०२६ ने.ता.३०.०८.२०२६

अर्जदार : १. सौ.वंदना अजयराव ठाकरे, वय ३४ वर्षे, धंदा - घरकाम
रा.सार्सी गायीची, पो.ब्राम्हणवाडा गोविंदपूर, ता.तिवसा, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदारः निरंक

ज्यापेक्षा **मोहन भगवंत केने** हे दि.**१२.०५.२०२०** रोजी मयत झाले. आणि **इंदिरा मोहनराव केने** ही दि.**२१.०८.२०२४** रोजी मयत झाली. **गजानन मोहन केने** हे दि.**०३.०९.२०२५** रोजी मयत झाले. तसेच **आरती गजानन केने** ही दि.**०५.०३.२०२०** रोजी मयत झाली. अर्जदार सौ.वंदना अजयराव ठाकरे, वय ३४ वर्षे, धंदा - घरकाम, रा.सार्सी गायीची, पो.ब्राम्हणवाडा गोविंदपूर, ता.तिवसा, जि.अमरावती यांनी **बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम २** प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता या न्यायालयामध्ये दि.**१७.०६.२०२६** रोजी अर्ज केला आहे. या अर्जाप्रमाणे वरील अर्जदार हे मयत **मोहन भगवंत केने, मयत इंदिरा मोहनराव केने आणि मयत गजानन मोहन केने तसेच मयत आरती गजानन केने** यांचे वारस आहेत. ते सदरहू अर्जदार फक्त मयत **मोहन भगवंत केने, मयत इंदिरा मोहनराव केने आणि मयत गजानन मोहन केने तसेच मयत आरती गजानन केने** यांचे वारस नाहीत असे कोणास सांगावयाचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत दाखल करावी.

तसेच या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती दाखल न केल्यास सदरहु न्यायालय अर्जदारांना वारसा प्रमाणपत्र बाबत पुरावा घेऊन त्यांना सदरहू अर्जदारांना मयताचे वारस म्हणून घोषित करण्यात येईल आणि त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक २२.०६.२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का

आदेशान्वये,
सहायक अधीक्षक,
दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर
भातकुली

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ४थे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१५६८/२०२६
**आशा अधिक एक -वि- निरंक**
पुढील ता.०२.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार : 1. Smt.Asha Rameshrao @ Rameshwar Gulhane,
Age 71 Yrs. Occu.: Household
2. Pankaj Rameshwar Gulhane, Age 40 Yrs. Occu.: Pvt.Job.
Both R/o Kharkadipura, Behind Gadicha Mandir, Amravati.

-- विरुध्द --

गैरअर्जदार : NIl

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Rameshwar Gulabrao Gulhane हे दिनांक **१२.०४.२०२०** रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Smt.Asha Rameshrao @ Rameshwar Gulhane यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Smt.Asha Rameshrao @ Rameshwar Gulhane वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०३.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

## चौकशीची जाहीर नोटीस

(नमुना क्र.०२)

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 94/19/2026
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **दि इमॅन्यूअल ग्रेस मिनीस्ट्रीज ॲण्ड चॅरिटेबल ट्रस्ट, दाभा** ता.जि.अमरावती
बाबत अर्जदार - **श्री.मधुकर बळीराम ससाने**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**(अ) जंगम मिळकत - निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन) - निरंक**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **०३.०८.२०२६** रोजी दिली.

शिक्का

**(डी.बी.गायकवाड)**
**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ९ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१०६६/२०२६
**श्रीमती पल्लवी अधिक एक -वि- निरंक**
पुढील ता.०२.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार : 1. Pallavi Mahendra Khara, Age 78 Yrs. Occu.: Household
2. Siddhesh Mahendrakumar Khara, Age 52 Yrs. Occu.: Business
Both R/o Dasra Maidan Road, Sharda Nagar, Amrvati.

-- विरुध्द --

गैरअर्जदार : NIl

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **महेंद्र दलिचंद खारा** हे दिनांक **१७.०३.२०२६** रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **पल्लवी अधिक एक विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **पल्लवी अधिक एक विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१५.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१४३१/२०२६
**श्रीमती सुशिला अधिक चार -वि- निरंक**
पुढील ता.२८.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार : 1. Sushila Marotrao Warkhade, Age 64 Yrs. Occu.: Household
2. Seema Dnyaneshwar Pandhare, Age 47 Yrs. Occu.: Household
R/o Ward No.05, Ahilya Chowk, Warha, Tq. Dist. Amrvati.
3. Pratibha Marotrao Warkhade, Age 45 Yrs. Occu.: Household
R/o Samartha Nagar, Murmadi Ward No.1, Dist.Bhandara
4. Prashant Marotrao Warkhade, Age 36 Yrs. Occu.: Labour
5. Pravin Marotrao Warkhade, Age 42 Yrs. Occu.: Labour
Appli.No.1, 4 & 5 R/o Near Mungsaji Maharaj Mandir, Chaitanya Colony Mankarna Nagar, Amravati.

-- विरुध्द --

गैरअर्जदार : NIl

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **मारोती गणोजी वरखेडे** हे दिनांक **२५.११.२०१७** रोजी **नागपूर, ता.जि.नागपूर** येथे मयत झाले. अर्जदार **सुशिला अधिक चार विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सुशिला अधिक चार विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२४.०७ .२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### संजय सरवटकर यांना 'बेस्ट रायझिंग स्टार पुरस्कार'

**अमरावती-**पत्रकारितेच्या क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत दैनिक चालू वार्ता परिवारातर्फे अमरावती जिल्ह्यातील पूर्णानगर येथील संजय सरवटकर यांना दैनिकाच्या पाचव्या वर्धापन दिनी स्वारगेट पुणे येथे'बेस्ट रायझिंग स्टार पुरस्कार २०२६'प्रदान करण्यात आला.या सन्मानामुळे संजय सरवटकर यांच्या पत्रकारितेच्या कार्याचा गौरव झाला असून भविष्यातही अधिक जोमाने, निष्पक्षपातीपणे आणि समजहिताची भूमिका जपत कार्य करण्याची प्रेरणा मिळाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.हा पुरस्कार त्यांना उपमुख्यमंत्री शिंदे यांचे ओ.एस.डी. मंगेशजी चिवटे यांच्या हस्ते तर दैनिक चालू वार्ता च्या कार्यकारी संपादिका सोनाली कबाडे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत देण्यात आला.त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे सहकारी, पत्रकार,विविध क्षेत्रातील मान्यवर,वाचकवर्ग,तसेच हितचिंतकाकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.आपल्या निर्भीड आणि समजहिताच्या पत्रकारितेला अशीच उत्तरोत्तर भरभराट लाभो तसेच भविष्यात अनेक मानाचे पुरस्कार आणि यश आपल्या वाट्याला येवो अशा शुभेच्छा अनेकांनी व्यक्त केल्या.




### पी.आर.पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थिनीचे यश

**अमरावती-**पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूलची विद्यार्थिनी सौम्या पाटील हिने इंटर-स्कूल स्तरावरील इंग्लिश स्टोरी रायटिंग स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.सौम्याने आपल्या कल्पकतेचा, उत्कृष्ट इंग्रजी भाषाशैलीचा आणि प्रभावी लेखनकौशल्याचा उत्कृष्ट आविष्कार सादर करत हे यश संपादन केले. तिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेचे प्राचार्य सचिन दुर्गे, उपप्राचार्या सोनल निस्ताने, तसेच सर्व शिक्षकांनी तिचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



### महाविद्यालयात लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती

**कुऱ्हा-**श्रीराम शिक्षण संस्था धामणगाव रेल्वे द्वारा संचालित कला व विज्ञान महाविद्यालय येथे लोकमान्य टिळक पुण्यतिथी आणि अण्णाभाऊ साठे जयंतीचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. अजय अभ्यंकर हे होते त्या प्रमुख मार्गदर्शिका प्रा.हर्षा कांबे या होत्या. कार्यक्रमाची सुरुवात हारार्पण आणि प्रतिमा पूजन करून झाली. स्मरण लोकमान्य टिळकांचे आणि अण्णाभाऊ साठेंचे या विषयावर प्रा.हर्षा कांबे यांनी मार्गदर्शन करताना दोन्ही महामानवांच्या कार्याची महती सांगितली.तर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. अजय अभ्यंकर यांनी आपल्या मनोगतामधून परतंत्र अवस्थेतील भारतीयांमध्ये ब्रिटिश सत्तेबद्दल त्यांनी जो असंतोष निर्माण केला.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. स्मिता जाधव यांनी केले.कार्यक्रमाची सांगता राष्ट्रवंदना आणि वंदेमातरम या गीतांनी झाली.याप्रसंगी विद्यार्थी प्राध्यापक वृंद,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



### विलास डाखोळे यांचा सेवानिवृत्ती सत्कार

**तिवसा-**जिल्हा परिषद शाळा वरूडा येथील मुख्याध्यापक विलास डाखोळे यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त आयोजित सत्कार सोहळा व शिक्षण परिषद उत्साहात आणि भावपूर्ण वातावरणात झाली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच सुनंदा डोळस उपस्थित होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. नितीनजी उंडे,चंद्रशेखर रामटेके, अतुल देशमुख, सुषमा पाटील, उपसरपंच दिनेश तंवर,पोलीस पाटील सुदेश तंवर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रोशन नेवारे, उपाध्यक्षा चंचल मातीखाये तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य उपस्थित होते. यावेळी ग्रामपंचायत सदस्य, वरूडा येथील ग्रामस्थ, अंगणवाडी सेविका,आशा सेविका, सातरगाव केंद्रातील सर्व शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षकवृंद, तालुक्यातील विविध शिक्षक, डाखोळे सरांचा मित्रपरिवार तसेच कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन अविनाश गंजीवाले यांनी केले. प्रास्ताविक व आभार संदीप खडेकार यांनी करून उपस्थित मान्यवर, शिक्षक, ग्रामस्थ आणि सर्व उपस्थितांचे आभार मानले.हा सेवानिवृत्ती सत्कार सोहळा व शिक्षण परिषद उपस्थितांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संस्मरणीय ठरला.

# अमरावती मनपाची ७ ऑगस्टला 'झाडाझडती'

## खा.डॉ.अनिल बोंडे, आ.प्रवीण पोटे पाटील यांची मॅरेथॉन बैठक

**अमरावती/का.प्र.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना अभिप्रेत असलेल्या गतिमान शासन, पारदर्शी प्रशासन या संकल्पनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यसभा खा.डॉ. अनिल बोंडे व विधानपरिषद आ.प्रवीण पोटे पाटील यांच्या पुढाकाराने शुक्रवार,७ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्त दालनात मनपाच्या विविध कामकाजाचा सर्वंकष आढावा घेण्यासाठी मॅरेथॉन बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

या बैठकीला महापौर श्रीचंद तेजवानी, महानगरपालिकेचे आयुक्त गोंदवले, वरिष्ठ अधिकारी तसेच संबंधित पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.अमरावती व बडनेरा शहरातील नागरिकांकडून प्राप्त झालेल्या तक्रारींचे



निराकरण, विविध नागरी समस्यांवरील उपाययोजना, महानगरपालिकेचे उत्पन्न वाढवून आर्थिक सक्षमता निर्माण करणे तसेच प्रलंबित विकासकामांचा आढावा घेणे, या प्रमुख विषयांवर चर्चा होणार आहे.

बैठकीत शहरातील स्वच्छता व्यवस्था, उघड्यावर होणारी मांसविक्री



रोखणे, हॉकर्स झोन निश्चित करून विक्रेत्यांची नोंदणी, पादचारी मार्ग अतिक्रमणमुक्त करणे, वाहतूक व्यवस्थेत सुधारणा, चौकांतील ट्रॅफिक सिग्नलचा कालावधी वाढविणे,मेडिकल वेस्टचे संकलन व विल्हेवाट,हॉटेल्स व लॉन्समधील उरलेल्या अन्नाची शास्त्रोक्त विल्हेवाट,कचरा संकलन व्यवस्था, वृक्षतोडीवर नियंत्रण, मनपा मालकीच्या मोकळ्या जागा, सार्वजनिक मैदाने व रिकाम्या भूखंडांची स्वच्छता, पावसाळ्यात साथीचे आजार रोखण्यासाठी उपाययोजना, सार्वजनिक उद्यानांची देखभाल, अतिक्रमण विभागाची कार्यपद्धती, शहर सौंदर्यीकरण व देशी वृक्ष लागवड आदी विषयांवर सविस्तर चर्चा केली जाणार आहे.

याशिवाय मनपा कर्मचाऱ्यांच्या अडचणी, मनुष्यबळाची उपलब्धता,कंत्राटी कर्मचाऱ्यांची व्यवस्था, मंजूर व प्रलंबित विकासकामांची गुणवत्ता, खर्चाचे परीक्षण तसेच खासगी कंत्राटदारांकडून होणाऱ्या बाह्य मनुष्यबळ पुरवठ्याचाही आढावा बैठकीत घेतला जाणार आहे.

शहर अधिक स्वच्छ, सुंदर व नागरिकाभिमुख करण्यासाठी लोकप्रतिनिधी, अधिकारी आणि कर्मचारी यांच्यात समन्वय निर्माण करून गतिमान व पारदर्शक प्रशासनाची कार्यपद्धती विकसित करणे हा बैठकीचा मुख्य उद्देश असल्याचे आ.प्रवीण पोटे पाटील यांनी सांगितले.

या बैठकीत जनहिताच्या प्रत्येक विषयावर सखोल चर्चा करून अंमलबजावणीतील अडचणी दूर करण्यासाठी कृती आराखडा तयार केला जाईल.

रखडलेल्या विकासकामांना गती देणे, नागरिकांना दर्जेदार मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे तसेच राज्य शासनाच्या स्तरावर पाठपुरावा करावयाच्या विषयांचे संकलन करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे अधिकाधिक निधीसाठी पाठपुरावा करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

ही बैठक केवळ औपचारिकता किंवा दिखावा नसून, शहराच्या सर्वांगीण विकासासाठी ठोस निर्णय आणि प्रभावी अंमलबजावणीची दिशा देणारी ठरेल, असा विश्वासही आ.प्रवीण पोटे पाटील यांनी व्यक्त केला.

## अखिल भारतीय मारवाडी महिला संमेलन शाखेतर्फे शालेयपयोगी वस्तूंचे वितरण



**अचलपूर-**दरवर्षी विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन अखिल भारतीय मारवाडी महिला संमेलन अचलपूर शाखेतर्फे केले जाते.यामध्ये वृक्षारोपण,आरोग्य शिबीर,रक्तदान शिबीर,विद्यार्थ्यांना शालेयपयोगी वस्तूंचे वितरण आदी सामाजिक उपक्रमाचा समावेश आहे.याच अनुषंगाने अचलपूर शहरातील राष्ट्रीय प्राथमिक शाळेला अखिल भारतीय मारवाडी महिला संमेलन अचलपूर शाखेतर्फे भेट देण्यात आली.यात विद्यार्थ्यांशी संवाद ही त्यांनी साधला.आणि ७० विद्यार्थ्यांना वही,पेन, पेन्सिल ड्रॉइंग बुक, कलर बॉक्स चे वितरण करण्यात आले.यावेळी विद्यार्थी वर्गात आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.यावेळी शाळेचा वतीने महिला मंडळी चे स्वागत करण्यात आले.

यावेळी प्रांतीय उपाध्यक्ष सुमन चौधरी,शाखाध्यक्ष सीमा रावत, उपाध्यक्ष ज्योति तांबी,सचिव शारदा पुरोहित, कोषाध्यक्ष अनीता अग्रवाल,सदस्य राजकुमारी अग्रवाल, मीरा ककरानिया, संध्या ककरानिया, सीमा अग्रवाल, मंजू पटवारी, मालती खुटेटा आदी सदस्य उपस्थित होते.

## नशामुक्त युवा फॉर विकसित भारत संकल्प अभियानाचा शुभारंभ

### ४७५ रासेयो स्वयंसेवकांसह कार्यक्रम अधिकाऱ्यांचा सहभाग

**अमरावती/का.प्र.**

युवा व खेल मंत्रालय, भारत सरकार यांच्यावतीने आयोजित 'नशामुक्त युवा फॉर विकसित भारत संकल्प अभियान' या देशव्यापी उपक्रमाचा शुभारंभ आभासी पध्दतीने करण्यात आला. देशभरातील १२५ निवडक केंद्रांवर हा कार्यक्रम एकाच वेळी आयोजित करण्यात आला होता. महाराष्ट्रातील सात केंद्रांपैकी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत ब्रिजलाल बियाणी महाविद्यालय, अमरावती येथे या अभियान शुभारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाला ब्रिजलाल बियाणी शिक्षा समितीचे माजी अध्यक्ष ॲड. अशोक राठी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दीपक धोटे, विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ.



निलेश कडू, अमरावती जिल्हा माहिती तंत्रज्ञान अधिकारी मनीष कुमार प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

अभियानाचा शुभारंभ पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या हस्ते आभासी पध्दतीने झाला. यावेळी पंतप्रधान मोदी यांनी युवकांनी व्यसनमुक्त जीवनशैली स्वीकारून विकसित भारताच्या उभारणीत सक्रिय योगदान देण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी युवा व खेल मंत्रालयाचे मनसुख मालविया यांनी अभियानाची उद्दिष्टे, व्यसनमुक्त भारताची संकल्पना आणि युवकांची जबाबदारी याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. आभासी उद्घाटन सोहळा संपल्यानंतर उपस्थित सर्व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांना नशामुक्तीची सामुहिक शपथ देण्यात आली. प्राचार्य डॉ. दीपक धोटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना व्यसनमुक्त जीवनशैलीचे महत्त्व अधोरेखित केले. विकसित भारताच्या निर्मितीसाठी प्रत्येक युवकाने परिवर्तनाची सुरुवात स्वतःपासून करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाला शहरातील विविध महाविद्यालयांचे ४७५ राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक, २० कार्यक्रम अधिकारी यांनी सहभागी घेतला. शपथविधीनंतर सर्व स्वयंसेवकांनी माय भारत पोर्टलवर ऑनलाइन नशामुक्तीची शपथ नोंदवून ई-प्रमाणपत्र प्राप्त केले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या लक्षगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. व्यसनमुक्त,सुदृढ आणि विकसित भारताच्या निर्मितीसाठी युवकांनी सक्रिय सहभाग नोंदविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त केला. संचालन डॉ. मनीषा गोलच्छा यांनी, तर आभार विवेक पनपालिया यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.गजानन राऊत,डॉ.मनीषा गोलच्छा,विवेक पनपालिया यांनी परिश्रम घेतले.

## मुसळधार पावसामुळे २५० मधील हेक्टर पिकांचे नुकसान

# पावसाच्या पाण्याने शेतजमीनी निघाल्या खरडून

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

मुसळधार पावसामुळे परिसरातील एकूण २२ गावातील २५० हेक्टर मधील विविध पिकांचे नुकसान झाले असून जमिनीवरील माती पिकासगट पावसामुळे खरडून निघाली.परिसरातील पार्डी (देवी), उदखेड, अऱ्हाड-कुऱ्हाड, वडगाव जिरे, भानखेड,मोगरा, कस्तूरा, भानखेड खुर्द, हातला,इंदला, मासोद, वळद, टिमटाळा, खिरसाना-निरसाना, निभोंरा इ. ठिकाणी मुसळधार पावसामुळे जमिनीतील पिकांचे नुकसान झाले आहे एकूण जमिनीचा आराखडा लक्षात घेता २५० हेक्टर जमिन जणू पडीत पडली आहे.

यंदा परिसरातील पेरणी प्रकीया उशीर झाल्याने बरिच पिके अध्याप जमिनीतच होती. तर काही पिके थोड्या प्रमाणात वर आलेली, तर काही



रोपट्याच्या स्वरूपात उभी होती. पिकांनी आपली मुळेही अद्याप जमिनीत पक्की केलेली नव्हती यातच आलेल्या मुसळधार पावसामुळे शेतजमीन मातीसकट खरडून निघाल्याने जमिनीतील बियाण्यापासून ते रोपट्यापर्यंत सर्वच पिके वाहून गेली. यामुळे २५० हेक्टर जमीन ओसाड पडली आहे. हे शेतकऱ्यांचे भारी नुकसान असुन यासाठी बळीराजाने स्वतः जवळील सर्व पैसा पेरणी, फवारा, निंदन इ.कामात खर्च केला व पिक वाढीच्या आशेवर स्तब्ध झाला. एकाएकीच आलेल्या मुसळधार पावसाने शेतकऱ्यांला आर्थिक दृष्ट्या कमजोर केल्याने ओसाड पडलेल्या जमिनीची दुबार पेरणी करण्यासाठी पैसा कुठून आणावा हा बिकट प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे.

परिसरातील ९० टक्के शेतकऱ्यांनी पिकांचा 'पिक विमा' काढला नसल्याने कोणत्याच प्रकारच्या नुकसान भरपाईची हमी शासन देणार नाही हे मात्र निश्चित यामुळे आता महसूल व कृषी विभाग हीच एक आशेची किरण शेतकऱ्यांकडे बाकी आहे.

**शेतजमिनीला तलावाचे स्वरूप**

शेत शिवारातील नाले तुडुंब भरून त्यातील पाणी संपुर्ण शेतात शिरल्याने शेतजमिनी तलावाचे स्वरूप आले आहे तसेच बागायती शेतीही पाण्याने तुडुंब भरल्याने शेतकऱ्यांच्या फळभाज्या, सोयाबीन, कपाशी इ. नगदी पिकांचे नुकसान झाले आहे.गावातील संपूर्ण पावसाचे पाणी येथील शेतकरी महादेव चकुले आशिष दानखडे व अनु कदम यांच्या शिरल्याने पिकांचेतर नुकसान झालेच याऊलट संपूर्ण शेतजमीन जलमय झाली आहे. महसूल विभागाने याकडे जातीने लक्ष देत शेतजमीनींची पाहणी करून संबंधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी असे शेतकरी वर्गामध्ये बोलल्या जात आहे.

## श्री क्षेत्र कौंडण्यपूर येथे श्री.संत शिरोमणी नामदेव महाराज पुण्यतिथी महोत्सव

**कुऱ्हा/वार्ताहर**

श्री क्षेत्र कौंडण्यपूर येथील रुक्मीणी मातेचे माहेर अशा प्राचीम असलेल्या श्री. अंबिका देवी मंदीरामध्ये दरवर्षी प्रमाणे याही वर्षी १० ऑगष्टला श्री संत शिरोमणी नामदेव महाराज यांचा ६७६ वा पुण्यतिथी महोत्सव सोहळा साजरा करण्यात येणार आहे.



९ ऑगष्टला दुपारी १२ वा कलश स्थापना, सायंकाळी ४ ते ६ वा. महिला मंडळ भजनाचा कार्यक्रम व रात्री ८ ते १० गावकरी भजनी मंडळाचे भजन होईल. १० ऑगष्ट रोज सोमवार स.१० वा. श्री चार अभिषेक हस्ते विजयराव डहाके कुऱ्हा तर स. ११ ते १.३० वा. ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज पातशे यांच्या प्रमुख उपस्थितीत ह.भ.प. पकंज महाराज महल्ले (आळंदीकर) कौंडण्यपूर यांचे काल्याचे किर्तन होईल. नंतर दु. १ ते १.३० वा. मान्यवरांचा सत्कार समारंभ सत्कार मुर्ती राजेश वानखडे आमदार तिवसा विधानसभा, दुपारी १.३० ते २.३० वा. श्री पालखी ची गांव प्रदक्षिणा अरुण भोयर, सुधाकर मलवार, गुणवंत उघडे, ह.भ.प. विकास महाराज काळे, गुडु वाळके, विलास बोरेकर, प्रभाकर सुकलकर यांचे हस्ते होईल.तरी कार्यक्रमाला आवर्जून उपास्थित राहण्याचे आवाहन विनीत राजुभाऊ फिरके, संयोजक श्रीसंत शिरोमणी नामदेव महाराज पुण्यतिथी उत्सव समिती कौंडण्यपूर, श्री संत शिरोमणी नामदेव महाराज वारकरी पंधरवाडी एकादशी समिती कौंडण्यपूर अध्यक्ष श्री अंबिका देवी मंदीर कौंडण्यपूर यांनी केले आहे.

# सीताबाई संगई विद्यालयात सेवापूर्ती सत्कार सोहळा उत्साहात

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

येथील सीताबाई संगई हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात संस्थेचे ज्येष्ठ, कर्तव्यदक्ष, विद्यार्थीप्रिय व आदर्श शिक्षक प्रशांत वसंतराव सातपुते यांच्या सेवापूर्तीनिमित्त आयोजित करण्यात आलेला सन्मान व सत्कार सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य राकेश डोणगावकर होते. प्रमुख उपस्थितीमध्ये उपमुख्याध्यापक राजेश वैद्य, पर्यवेक्षक डॉ. निलेश डाहाळे, सातपुते यांच्या धर्मपत्नी प्रतिभा सातपुते, तसेच उत्सव प्रमुख विशाल भेलांडे,



प्रीती अळसपुरे आणि स्वाती खाडे यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते विद्येची अधिष्ठात्री देवी माता सरस्वती यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. त्यानंतर कार्तिकी संगई यांनी प्रशांत सातपुते यांच्या प्रदीर्घ शैक्षणिक सेवाकाळाचा आढावा घेतला.

या नंतर मान्यवरांच्या हस्ते श्रीफळ, सन्मानचिन्ह, शाल, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन प्रशांत सातपुते यांचा यथोचित सेवापूर्ती सन्मान करण्यात आला.या वेळी सन्मानपत्राचे प्रभावी वाचन विशाल भेलांडे यांनी केले. मनोगतात सातपुते सरांच्या आदर्श कार्याचा गौरव करत त्यांच्या निवृत्तीनंतरच्या आनंदी, निरोगी व समाधानपूर्ण आयुष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. सत्काराला उत्तर देताना प्रशांत सातपुते यांनी संस्थेने दिलेल्या सेवासंधीबद्दल संस्थाचालकांविषयी कृतज्ञता व्यक्त केली. तसेच या प्रसंगी उपमुख्याध्यापक राजेश वैद्य यांनी सातपुते यांच्या शैक्षणिक, सामाजिक व संस्थेप्रती असलेल्या निष्ठावान सेवाभावाचे कौतुक करत त्यांच्या निवृत्तीनंतरच्या आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य राकेश डोणगावकर यांनी सातपुते सरांच्या समर्पित, प्रामाणिक व कर्तव्यनिष्ठ सेवेला उजाळा देत त्यांच्या कार्याचा आदर्श प्रत्येक शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे संचालन व आभार गीतांजली मेमनकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी उत्सव प्रमुख विशाल भेलांडे, प्रीती अळसपुरे आणि स्वाती खाडे यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच सेवानिवृत्त प्रशांत सातपुते यांना सीताबाई संगई एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष, डॉ.उल्हास संगई, उपाध्यक्ष, विवेक संगई, उपाध्यक्ष भरत संगई, सचिव, प्रसाद संगई, सहसचिव, अजय संगई, सहसचिव, प्रसन्न संगई, कार्यकारी सदस्य, अविनाश संगई, ज्येष्ठ सदस्य,अशोक संगई, मुकुंद संगई सदस्य आशिष संगई, विनय संगई, अनुप संगई व सर्व संचालक-संचालिका त्यांना सेवानिवृत्तीच्या व पुढील आयुष्य निरोगी आनंदी जावो या करिता शुभेच्छा दिल्या.

# मुथूट फिनकॉर्प शाखेत कोट्यवधीचा गोल्ड लोन घोटाळा उघड

## व्यवस्थापक फरार; सोने-रोख अडकल्याने ग्राहकांचा संताप




**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील बसस्थानक रोडवरील विमाको टॉवर्समध्ये असलेल्या मुथूट फिनकॉर्प शाखेतील व्यवस्थापक कोट्यवधी रुपयांचे सोने व रोख रक्कम घेऊन बेपत्ता झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकारामुळे शाखेतील ग्राहक व गुंतवणूकदारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, मंगळवारी मोठ्या संख्येने नागरिकांनी शाखेसमोर गर्दी करून संताप व्यक्त केला. या घटनेच्या अनुषंगाने ४० ते ५० ग्राहकांनी सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली आहे.

प्राथमिक माहितीनुसार, अनेक ग्राहकांनी मुथूट फिनकॉर्पमध्ये सोने गहाण ठेवून कर्ज घेतले होते, तर काहींची आर्थिक गुंतवणूकही शाखेत होती. मात्र, शाखा व्यवस्थापक अचानक संपर्काबाहेर गेल्याने व्यवहार ठप्प झाले. त्यानंतर सोने आणि रोख रकमेबाबत संशय निर्माण झाल्याने ग्राहकांनी शाखेत धाव घेतली. तेथे समाधानकारक उत्तर न मिळाल्याने संतप्त ग्राहकांनी शाखेबाहेर ठिय्या आंदोलन करत संबंधितांवर कठोर कारवाईची मागणी केली. घटनेची ☞(पान २ वर)

# मायेचे अनोखे दानः सासूच्या किडनीमुळे जावयाला मिळाले नवजीवन

## अमरावती सुपर स्पेशालिटीत ७५ वी यशस्वी किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया




**अमरावती/प्रतिनिधीः-** येथील विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयात (सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल) ७५ वी किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वी पार पडली. सासूने स्वतःची एक किडनी देऊन जावयाला नवजीवन दिल्याने या घटनेची परिसरात विशेष चर्चा होत आहे.

पारडी (ता. अचलपूर) येथील रहिवासी देवानंद किसन चव्हाण (वय ४०) यांची दहा वर्षांपूर्वी मुंबई येथे किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया झाली होती. मात्र, काही काळानंतर ती किडनी निकामी झाल्याने ते गेल्या काही महिन्यांपासून डायलिसिसवर होते. जावयाचा त्रास आणि मुलीचे भविष्य लक्षात घेऊन सासू रंजना श्रीराम सोळंके (वय ५५) यांनी स्वतःची किडनी देण्याचा अत्यंत धाडसी व संवेदनशील निर्णय घेतला.

ही गुंतागुंतीची आणि दुसऱ्यांदा करावी लागलेली शस्त्रक्रिया रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टरांच्या चमूने यशस्वीरीत्या पार पाडली. 'आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजने'अंतर्गत संपूर्ण उपचार पूर्णपणे विनामूल्य करण्यात आले. वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे आणि विशेष कार्य अधिकारी डॉ. मंगेश मेंढे यांच्या मार्गदर्शनाखाली☞(पान २ वर)

# लोतवाडा येथे कौशल्य विकासाच्या नावाखाली लाखोंचा गैरव्यवहार

**येवदा पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल**

## बेरोजगारांची स्वप्ने धुळीस, शासनालाही आर्थिक फटका



**खल्लार/प्रतिनिधीः-** राज्य शासनाच्या कौशल्य विकास योजनेंतर्गत सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींना रोजगारक्षम बनविण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या प्रशिक्षण उपक्रमात कथित गैरव्यवहार उघड झाल्याचा प्रकार लोतवाडा येथे समोर आला आहे. नागपूर येथिल पुष्पांचल फाउंडेशन या संस्थेच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या प्रशिक्षणाबाबत गंभीर अनियमिततेचे आरोप समोर आल्याने कौशल्य विकास योजनांच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दर्यापूर तालुक्यातील स्वर्गीय बाळाभाऊ काळे स्किल सेंटर, लोतवाडा येथे १५ ते ४५ वयोगटातील सुमारे ४८० युवक-युवतींना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देण्याचे नियोजन करण्यात आले होते. मात्र, प्रत्यक्षात प्रशिक्षण न देता ३६० प्रशिक्षणार्थ्यांची ऑनलाइन नोंदणी करून प्रशिक्षण सुरू असल्याचे कथितरित्या दाखविण्यात आले. या आधारे शासनाकडून ३४ लाख ५७ हजार रुपयांचा पहिला हप्ता संबंधित संस्थेच्या खात्यात वर्ग करण्यात आला. सदर प्रकरणाची गंभीर दखल घेत अमरावती विभागाचे ☞(पान २ वर)

# विश्वकर्मा योजनेच्या नावाने कोट्यवधींचा गंडा

## शेकडो महिलांची फसवणूक, मुख्य आरोपी महिलेला अटक



**अंजनगाव सुर्जी /प्रतिनिधीः-** केंद्र शासनाच्या बहुचर्चित विश्वकर्मा योजनेतून कर्ज आणि भरघोस सबसिडी मिळवून देण्याचे आमिष दाखवून शेकडो महिलांची लाखो रुपयांनी आर्थिक फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार अंजनगाव सुर्जी तालुक्यात उघडकीस आला आहे. या प्रकरणी अंजनगाव सुर्जी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून मुख्य आरोपी महिलेला पोलिसांनी अटक केली आहे. या प्रकरणात सारिका श्रीकांत राऊत, रा. येवता ता. अचलपूर, ह.मु. मिल कॉलनी, परतवाडा हिच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. आरोपीविरोधात आधीच तक्रार दाखल असताना दि. ४ ऑगस्ट रोजी २० ते २५ फसवणूकग्रस्त महिला थेट पोलीस स्टेशनवर धडकल्याने या फसवणुकीचा आकडा लाखोंवरून कोट्यवधींवर जाण्याची शक्यता वर्तविली जात आहे.या प्रकरणातील मुख्य फिर्यादी फुलवंती राजकुमार तोटे (वय ३९, रा. निमखेड बाजार, ता. अंजनगाव सुर्जी) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दि. १२ मार्च च्या दरम्यान आरोपी सारिका राऊत ही तिच्या पतीसह ग्राम सावरपाणी येथे विश्वकर्मा योजनेबाबत माहिती देण्यासाठी आली होती. तिने महिलांना केवळ ६००० रुपयांत वॉशिंग मशीन, शिलाई मशीन यांसारख्या गृहोपयोगी वस्तू देण्याचे आणि वस्तू मिळाल्यावर १८,००० रुपये शासकीय अनुदान मिळवून देण्याचे आमिष दाखवले. सुरुवातीला काही महिलांना प्रत्यक्ष वस्तू दिल्यामुळे महिलांचा ☞(पान २ वर)

# घराच्या पाठीमागे लावलेली गांजाची ५ झाडे जप्त

## आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल



**मोर्शी/प्रतिनिधीः-** पोलीस स्टेशन मोर्शीच्या पथकाने दिनांक ०४ ऑगस्ट २०२६ रोजी गोपनीय माहिती मिळाल्यानुसार अनिल रामजी पंधरे,(वय ३७ वर्षे, रा. वॉर्ड क्र. १५, गाडगेनगर, मोर्शी) याने राहत्या घराच्या पाठीमागे आमली पदार्थ गांजा (Cannabis) ची लागवड केल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार राजपत्रित अधिकारी, पंच व न्यायसहायक वैज्ञानिक पथक यांच्या उपस्थितीत ☞(पान २ वर)

# मनपा आयुक्तांच्या नावाने व्हॉट्सअॅपवर आर्थिक फसवणुकीचा प्रयत्न

## -नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन




**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिका आयुक्त यांच्या नावाचा गैरवापर करून अज्ञात व्यक्तीकडून नागरिकांकडे पैशांची मागणी करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे. यासाठी +६६६२४२७८१०० या व्हॉट्सअॅप क्रमांकाचा वापर केला जात असल्याची माहिती समोर आली आहे.

महानगरपालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, आयुक्तांच्या नावाने कोणत्याही प्रकारे व्हॉट्सअॅप किंवा इतर माध्यमातून आर्थिक मदतीची अथवा पैशांची मागणी केली जात नाही. त्यामुळे अशा प्रकारचे संदेश किंवा कॉल प्राप्त झाल्यास त्यावर विश्वास ठेवू नये आणि कोणत्याही परिस्थितीत पैसे पाठवू नयेत.

टासा`चा +६६६२४२७८१०० किंवा अशाच प्रकारच्या इतर कोणत्याही संशयास्पद क्रमांकावरून आयुक्तांच्या नावाने संदेश ☞(पान २ वर)

# घरफोडीच्या गुन्ह्यातील फरार आरोपी ताब्यात



**मोर्शी/प्रतिनिधीः-** पोलीस स्टेशन वरूड येथील घरफोडीच्या गुन्ह्यातील फरार आरोपीस मोर्शी पोलिसांनी गाडीसह मोठ्या शिताफीने जेरबंद केले.

पोलीस स्टेशन मोर्शी येथील डीबी स्क्वाड मधील पोलीस अधिकारी व अंमलदार हे रामजी बाबा यात्रेदरम्यान पेट्रोलिंग करीत असताना त्यांना गोपनीय बातमीदाराकडून खात्रीशीर माहिती मिळाली की पोलीस स्टेशन वरुड येथील चोरीच्या गुन्ह्यातील फरार आरोपी हा मोर्शी परिसरात आलेला आहे. अशा माहितीवरून डीबी स्कॉड चे पोलिसांनी सतर्कता दाखवून पोलीस स्टेशन वरूड येथे दाखल असलेल्या अप. क्र. ४५५/२०२६ मधील घरफोडीच्या गुन्ह्यातील फरार आरोपीस सापळा रचुन शोध घेऊन जेरबंद केले.

सदर आरोपीस ताब्यात घेतले असून पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी आरोपीस पोलीस स्टेशन वरूड यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.सदरची कारवाई पोलीस अधीक्षक, निकेतन कदम अप्पर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड व उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक राहुल☞(पान २ वर)

# राज्य माहिती आयोगात तीन अतिरिक्त आयुक्त

## प्रलंबित अपीलाचा जलद निपटारा होणार

**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्य माहिती आयोगाकडे प्रलंबित असलेल्या अपीलांचा जलद निपटारा करण्यासाठी बृहन्मुंबई, नाशिक आणि अमरावती खंडपीठांमध्ये तीन वर्षांच्या कालावधीसाठी तीन अतिरिक्त राज्य माहिती आयुक्तांची नियुक्ती करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

या निर्णयानुसार, प्रत्येक खंडपीठासाठी एक उप सचिव आणि एक कक्ष अधिकारी अशी प्रतिनियुक्तीवरील पदे निर्माण करण्यात येणार आहेत. तसेच एक लघुलेखक, एक लिपिक-टंकलेखक आणि एक शिपाई ही पदे बाह्य यंत्रणेमार्फत कंत्राटी पद्धतीने भरली जाणार आहेत. अशाप्रकारे तीनही खंडपीठांसाठी एकूण १८ पदे निर्माण करण्यात येणार आहेत.

प्रलंबित अपीलांची संख्या कमी झाल्यास आवश्यकतेनुसार अतिरिक्त ☞(पान २ वर)

# BHMS-CCMP डॉक्टरांच्या MMC नोंदणीला विरोध

## IMA अमरावतीचे २४ तास सेवा बंद आंदोलन




**अमरावती/प्रतिनिधीः-** BHMS डॉक्टरांना CCMP कोर्स पूर्ण केल्यानंतर महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल - MMC मध्ये नोंदणी देण्याच्या प्रस्तावाविरोधात भारतीय वैद्यकीय संघटना IMA अमरावती शाखेने आक्रमक भूमिका घेतली आहे. IMA अमरावती, MARD, ASMI आणि इतर विविध विशेषज्ञ वैद्यकीय संघटनांच्या पाठिंब्याने आज सकाळी ६ वाजल्यापासून २४ तास वैद्यकीय ☞(पान २ वर)

# नियमभंग करणाऱ्या दोन आस्थापनांवर १० हजारांचा दंड



**अमरावती/प्रतिनिधीः-** मंगळवारी (दि.४) झोन क्र.२ अंतर्गत राजापेठ परिसरातील नमुना व बालाजी प्लॉट भागात प्लास्टिक जप्ती व डस्टबिन तपासणी विशेष मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेदरम्यान एकूण २० आस्थापनांची तपासणी करण्यात आली. तपासणीत काही ठिकाणी घनकचरा व्यवस्थापन व प्रतिबंधित प्लास्टिक वापरासंदर्भातील नियमांचे उल्लंघन आढळून आल्याने संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. सिंध प्लाय डेकोर☞(पान २ वर)

# मनपा कर्मचारी संघटनेचे सरचिटणीस प्रल्हाद कोतवाल यांचे निधन



**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिका कर्मचारी संघटनेचे सरचिटणीस अभ्यासू नेते प्रल्हाद कोतवाल (वय ७४) यांचे दुःखद निधन झाले आहे. त्यांच्या निधनाने अमरावती महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांसह राजकीय व सामाजिक वर्तुळात तीव्र शोक व्यक्त केला जात आहे.

त्यांची अंतिम यात्रा बुधवार, दिनांक ०५ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता त्यांच्या राहत्या घरून, महावीर नगर, अमरावती येथून निघणार आहे. त्यांच्या निधनाने महापालिका कर्मचारी वर्गात शोक व्यक्त होत आहे.

महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांचे विविध प्रलंबित प्रश्न, न्याय्य मागण्या आणि वेतनविषयक☞(पान २ वर)

# मालमत्ता कर वसुलीला अधिक गती द्या - आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले



**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांनी आज मंगळवार (दि. ४ ऑगस्ट) महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागाच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. या बैठकीत चालू आर्थिक वर्षातील मालमत्ता कर वसुलीची सद्यस्थिती, विभागनिहाय उद्दिष्टपूर्ती, प्रलंबित थकबाकी, मोठ्या करदात्यांकडील वसुली, कर संकलनातील अडचणी तसेच महसूल वाढीसाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनांवर सखोल चर्चा करण्यात आली. बैठकीत आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांनी मालमत्ता कर हा महापालिकेच्या महसुलाचा प्रमुख स्रोत असल्याचे सांगत, निर्धारित उद्दिष्ट वेळेत पूर्ण करण्यासाठी सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी नियोजनबद्ध आणि परिणामकारक पद्धतीने काम करण्याचे निर्देश दिले. प्रत्येक विभागाने दैनंदिन व साप्ताहिक वसुलीचे उद्दिष्ट निश्चित करून त्याचा नियमित आढावा घ्यावा, तसेच प्रत्येक अधिकाऱ्याने आपल्या कार्यक्षेत्रातील प्रलंबित कर वसुलीकडे☞(पान २ वर)

# तरुणीची गळफास घेऊन आत्महत्या



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील साईनगर परिसरातील स्टेट बँक कॉलनीत एका २५ वर्षीय तरुणीने राहत्या घरात गळफास घेऊन जीवन संपवल्याची दुर्दैवी घटना मंगळवारी पहाटे उघडकीस आली. आकांक्षा उमेशराव मनोहरे (वय २५ वर्ष राहणार, ताज नगर, चांदूरबाजार) असे मृतक मुलीचे नाव आहे. या घटनेने परिसरात शोककळा पसरली असून आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप समोर आलेले नाही. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित तरुणीच्या वडिलांना एका युवकाचा फोन आला. मुलगी गळफास घेत ☞(पान २ वर)

# प्रेमभंगातून झालेल्या आत्महत्या प्रकरणी चौघांवर गुन्हा



**अमरावती/प्रतिनिधीः-** ओम कॉलनी परिसरात १७ जुलै रोजी गळफास घेऊन आत्महत्या केलेल्या तरुणाच्या मृत्यूप्रकरणी गाडगेनगर पोलिसांनी महत्त्वाची कारवाई केली आहे. घटनास्थळी मिळालेली सुसाईड नोट आणि मृताच्या वडिलांनी दिलेल्या तक्रारीच्या आधारे एका तरुणीसह चौघांविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, अजय भास्कर वाढोकर याचे २०१९ पासून नात्यातील एका तरुणीसोबत प्रेमसंबंध होते. सुरुवातीला दोन्ही कुटुंबांनी विवाहाला संमती दर्शविली होती. मात्र, नंतर संबंधित तरुणीचे दुसऱ्या युवकासोबत संबंध जुळल्याने परिस्थिती बदलली. त्यातून ☞(पान २ वर)